


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





नेतृत्वाची चमक.. कर्तृत्वाची धमक..दूरदृष्टीची प्रगती..
अन् विकासाची गती.. वाढत राहो आपली किर्ती!
आमचे मार्गदर्शक
मा.श्री.संदीपदादा कोतकर मा.महापौर, अहमदनगर मनपा
जन्म:दिनाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा..!
अध्यक्ष-संदीपदादा कोतकर युवा मंच



भुषण अशोक गुंड । रोहित शिंदे



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२() | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २३.०१.२०२५ | अंक नं. २७३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020


# नगर शहरातील 'सीनानदी' पुलाखाली रात्रीच्यावेळी नागरिकांना दिसला बिबट्या

**काटवन खंडोबा रोड परिसरात रहिवाशी भयभीत, वन विभागाने केली पाहणी**

नगर – नगर शहराजवळ आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील सीनानदी पुलाखाली २२ जानेवारीला रात्री ९.३० ते १० वाजण्याच्या दरम्यान काही युवकांना बिबट्या दिसला, त्यामुळे या रोड परिसरात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. काही नागरिकांनी याबाबत वन विभागाच्या अधिकारी – कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे नागरिक रात्रभर भीतीच्या छायेखाली होते.

आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील सीनानदी पुलावर काही युवक रात्री कचरा टाकण्यासाठी गेले असता त्यांना पुलाखाली बिबट्या दिसला. या युवकांनी तात्काळ परिसरातील नागरिकांना फोन करून याची माहिती देत सावध केले. अनेकांनी यावेळी वन विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांचा संपर्क होऊ शकला नसल्याचे प्रत्यक्षदर्शी युवकांनी सांगितले. या परिसरातील नागरिकांना सावध करण्यासाठी प्रत्यक्षदर्शी युवकांनी सदर माहितीचे व्हिडिओ तयार करून ते सोशल मिडीयावर व्हायरल केले होते. त्यामुळे शहर परिसरात सर्वत्र बिबट्याची माहिती पोहचली. या परिसरातील नागरिक रात्रभर भीतीच्या छायेखाली होते.

त्यानंतर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी २३ जानेवारीला सकाळी या परिसरात पाहणी केली. यावेळी त्यांनी बिबट्याचे पायाचे ठसे कुठे मिळतात का? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र या परिसरात कुठेही बिबट्याच्या पायाचे ठसे आढळून आले नसल्याचे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले.

## बिबट्या आढळल्यास घ्यावयाची दक्षता

जिथे बिबट्या दिसतो त्या परिसरात त्या काळात शक्यतो समूहाने बाहेर जावे-यावे. बिबट्या उजेडाला दचकतो, यामुळे रात्रभर घराबाहेर लाइट चालू ठेवावेत. संध्याकाळच्या वेळेस राहत्या घराच्या अंगणात किंवा परिसरामध्ये लहान मुलांना एकटे सोडू नये. बिबट्या समोर आल्यास जोरात आरडा ओरड करावी व त्याला पळवून लावावे. त्यावेळी घाबरून न जाऊ नये तसेच खाली वाकू नये. खाली वाकल्यास तो हल्ला करु शक्यतो. रात्री उघड्यावर झोपू नये. शेतकऱ्यांनी शेतात पाणी देण्यासाठी रात्री जाताना सहकाऱ्यांसोबत जावे. अशावेळी मोबाइल किंवा रेडिओ असल्यास मोठ्या आवाजात गाणी चालू ठेवावी. शक्यतो घुंगराची काठी जवळ बाळगावी.

## बिबट्याला डिवचण्याचा प्रयत्न करु नये

रस्त्यावरून जाताना अचानक बिबट्या रोड ओलांडताना दिसल्यास घाबरून जाऊ नये, शांत राहण्याचा प्रयत्न करावा, त्यास त्याच्या मार्गाने जाऊ द्यावे, त्यास डिवचण्याचा प्रयत्न करु नका. कधीही बिबट्याचा पाठलाग करु नये. कारण, तो घाबरून उलटा हल्ला करु शकतो. बिबट्या शक्यतो मानवी वसाहतीत राहत नाही, पण त्यास डिवचण्याचा प्रयत्न केल्यास तो प्राणघातक हल्ला करु शकतो. कुत्रे, डुकरे, बकरी खाण्यासाठी कधी कधी बिबटे मानवी वसाहतीत येतात. बिबट्या सहसा आपल्या नजरेच्या आतील प्राण्यांची शिकार करतो.

## बिबट्या संदर्भात अफवा पसरु नये

बिबट्या संदर्भात अफवा पसरु नये, किंवा अफवांवर विश्वास ठेवू नका. बिबट्या आढळल्यास किंवा त्याने जीवितहानी केल्यास त्या बाबतची माहिती तत्काळ वनविभागाला कळवावी. बिबट्याने केलेल्या जीवितहानीसाठी सानुग्रह अनुदान किंवा नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्यात आली आहे. नुकसानभरपाई मिळण्यासाठी वनविभागाकडे लेखी अर्ज करावा. बिबट्याची समस्या सोडविण्यासाठी जबाबदारी वनविभाग प्रमाणे आपल्या सर्वांची आहे. यामुळे या कामात स्थानिक लोकांनी वनविभागाला आवश्यकतेनुरुप सहकार्य करावे, असे आवाहन वन विभागाने केले आहे.


फेब्रुवारी- मार्च पैसा वसूल टूर्स
VEENA WORLD
गर्दी कमी, पैसे कमी!
सीजन मस्त, आनंद जास्त!
चलो बॅग भरो.. निकल पडो...

| | |
|---|---|
| हनिमून स्पेशल शिमला मनाली 30,000/- ६ दिवस | शिमला मनाली 30,000/- ६ दिवस |
| सिक्कीम दार्जिलिंग गंगाटोक 62,000/- ७ दिवस | वाराणसी अयोध्या लखौन 60,000/- ८ दिवस |
| कुर्ग म्हैसूर बेंगळुरू 30,000/- ६ दिवस | हायलाईटस् ऑफ काश्मिर 50,000/- ६ दिवस |
| आसाम अरुणाचल मेघालय 1,02,000/- १२ दिवस | नैनिताल मसुरी हरिद्वार 40,000/- ६ दिवस |
| भुतान 75,000/- ९ दिवस | थायलंड 50,000/- ४ दिवस |
| बँकॉक पटाया फुकेत क्राबी 1,12,000/- ०८ दिवस | सिंगापुर मलेशिया थाय 1,60,000/- १० दिवस |
| बेस्ट ऑफ दुबई अबुधाबी 1,25,000/- ७ दिवस | स्विस पॅरिस 2,55,000/- ८ दिवस |

वीणा वर्ल्ड प्रेफर्ड सेल्स पार्टनर
राजलक्ष्मी हॉलिडेज्
कालिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०६, लालटाकी रोड, अहमदनगर.
प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432
7083709473

दर्जेदार व माफक दरात
फ्लेक्स प्रिंटींग
9403232323



उपवासाच्या
सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी
ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा,
स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN
राजमोती
RAJ MOTI
साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर,गुरुवार दि.२३.०१.२०२५ | अंक नं. २७३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

स्पेशल OFFER
STOCK CLEARANCE
ONLY ON SELECTED RANGE
20 - 50 % DISCOUNT
जरीवाला
कापड बाजार,अहमदनगर
यशोदानगर, पाईपलाईन रोड ,अ.नगर

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

जीवनाच्या रंगमंचावर
आरोग्याची भूमिका
ताकतवर व सुदृढ असेल तरच
जीवनाचे नाट्य
सुंदर सप्तरंगी होईल...
सर्व नाट्य रसिक व नगरकरांना
१००व्या विभागीय
नाट्य संमेलनास
सहर्ष हार्दिक निमंत्रण !



डॉ. बापुसाहेब कांडेकर
• स्वागताध्यक्ष •
सर्व पदाधिकारी व नाट्यकर्मी
आता शुक्रवार व शनिवार
मोफत तपासणी उपचार
✲ अत्यंत अद्ययावत सेवा सुविधा ✲ सर्व प्रमुख कंपन्यांसाठी कॅशलेस सुविधा
नगर जिल्ह्यातील सर्वप्रथम, प्रशस्त व परिपूर्ण आरोग्य मंदिर
एशियन
नोबल हॉस्पिटल प्रा लि.
प्रेमदान चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर
0241 - 2421290-91-92, 0241 - 2421911-12-13
मोफत उपचार अधिक माहितीसाठी संपर्क : 86055 52266
Dishan

ऑफर... ऑफर... ऑफर...!
26 जानेवारी निमित्त अभय सेल्स
घेऊन आले आहेत



गॅस गिझर
फक्त- ₹3500 पासून पुढे
3 ली. लाईट गिझर
फक्त- ₹2500 पासून पुढे
5 ली. लाईट गिझर
फक्त- ₹3500 पासून पुढे
10 ली. लाईट गिझर
फक्त- ₹3950 पासून पुढे
ऑफर फक्त 31 जानेवारी पर्यंत उपलब्ध त्वरा करा...
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilya,Nagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

फर्निचर विकणे आहे
रॅक्स विथ ग्लासचे फर्निचर सर्व प्रकारच्या
व्यवसायासाठी उपयुक्त असे सुस्थितीत असलेले
9860773696, 8329124680

|| पुण्यस्मरण ||



स्व. गोविंददास गोपाळदास नेवासकर
स्व. दि. २३ जानेवारी १९९६

आपल्या पुण्यस्मरणदिनी
भावपूर्ण श्रध्दांजली

हेमंत, मिलींद व नेवासकर कुटूंबिय, अहमदनगर.
सौ. चारुशिला हेमेंद्र शहा, पुणे.

24 जानेवारी





RUTIK GORVE | +91 7620301489
तू राजा है राजा ही रहेगा
तेरे शराफत के आगे दुश्मन
भी झूकेगा...!
मा.महापौर
मा.श्री.संदीप
दादा कोतकर
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक हार्दिक शुभेच्छा...!!
•शुभेच्छुक:
श्री.निलेश (बाप्पू)सातपुते (संचालक- कृषी उत्पन्न बाजार समिती अहिल्यानगर)
मा.संकेत (मोनू) सातपुते (सातपुते ट्रेडिंग कंपनी / भुती ट्रेडिंग कंपनी)
कृषी उत्पन्न बाजार समिती नेप्ती, आहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## कौशल्य जनगणना आवश्यक

आपला भारत तरुणांचा देश आहे. अभ्यासकांच्या आवडत्या 'डेमोक्रेटिक डिव्हीडंड' या संज्ञानुसार या तरुणांना योग्य रोजगार, संस्कार, वळण मिळण्याची नितांत आवश्यकता आहे. आपण राजकारणात जाऊ इच्छित नाही पण 'त्यांना' जातीय जनगणनेत स्वारस्य आहे! सामान्यांना जातीपातीपेक्षा गुणवत्तेवर आधारित, कौशल्यावर प्रमाणित समाजाची आवश्यकता वाटते.

जातीय जनगणनेपेक्षा 'कौशल्य जनगणना' महत्त्वाची आहे व त्यावर गांभीर्याने लक्ष द्यायला पाहिजे. कौशल्य जनगणना म्हणजे एका विशिष्ट प्रदेशाची किंवा देशातील लोकसंख्येची कौशल्य पातळी आणि क्षमतांची मोजणी करणे. या कौशल्य जनगणनेत तेथील व्यक्तींकडे असलेल्या कौशल्यांची माहिती सर्वेक्षणाद्वारे गोळा केली जाते.

याचे हेतू काय तर कौशल्य पातळीचे मूल्यांकन करणे, त्यांची कमतरता,








उपयोगिता व उद्योगांशी त्यातील गरजांशी जुळणारे क्षेत्र ओळखणे, कौशल्य विकास व व्यावसायिक प्रशिक्षणासाठी लाक्षित धोरणे विकसित करणे, उत्पादन व रोजगार क्षमता वाढवणे.

तरुणांच्या भारतात जगाच्या तिसऱ्या अर्थव्यवस्थेवर यायचंय. देशाची ५ ट्रिलीयन तर महाराष्ट्राची १ ट्रिलीयन अर्थव्यवस्था करण्यासाठी कौशल्याधारित उत्पादन, रोजगार व कौशल्ये बाळगणारा युवा ही काळाची गरज आहे. आता अर्थसाक्षरतेसह कौशल्य साक्षरता अत्यावश्यकच.






धरणे आंदोलनानंतर शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांना निवेदन देताना राज्याध्यक्ष जयवंत भाबड, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, रूपाली कुरुमकर, रामराव काळे यांनी निवेदन दिले.

# शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर असंतोष धरणे आंदोलन

### दोषीवर कारवाई केली जाईल आयुक्तांनी दिले आश्वासन

नगर - माध्यमिक व उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात व पुणे विभागीय उपसंचालक कार्यालयातील भ्रष्ट कारभारा संदर्भात पुणे शिक्षण आयुक्त कार्यालय समोर असंतोष धरणे आंदोलन आयोजित केले होते, याची दखल घेऊन शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य संपत सूर्यवंशी यांनी सर्व मागण्या व्यवस्थित ऐकून घेतल्या व प्रत्येक मागणीनुसार संबंधितांना तात्काळ सूचना देऊन सोडवल्या जातील असे सकारात्मक आश्वासन सांगितले व संघटनेने देखील समस्या निर्माण होऊ नये यासाठी संघटने कडून मते मागवली. यावेळी पुणे, सोलापूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील काही पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

यावेळी शालार्थ आय.डी. तात्काळ देण्यात देण्यासाठी संचालक पातळीवर ऑनलाइन स्वरूपात देण्याविषयी चर्चा झाली, वाढीव पदांच्या मान्यता व समायोजन त्वरित व्हाव्यात, डी.सी.पी.एस., एन.पी.एस. हिशोब पावत्या त्वरित द्याव्यात, भ्रष्ट व मग्रूर कनिष्ठ लिपिक यांच्यावर दप्तर दिरंगाई कायद्यांतर्गत अंतर्गत कार्यवाही केली जाईल, अर्धवेळ ते पूर्णवेळ मान्यता त्वरित देण्यात येईल, अर्धवेळ शिक्षकांना सेवा शाश्वती दिली जाईल, संच मान्यता प्रचलित पद्धतीने केले जातील वेतन निश्चिती तालुका निहाय शिबिर लावले जाईल, शाळाबाह्य शिक्षकांना कामे देऊ नये या संदर्भात शासनास प्रस्ताव पाठवला जाईल, अतिरिक्त शिक्षक व रिक्त जागा यांची माहिती उपसंचालक कार्यालयातील फलकावर लावली जाईल, वाढीव पदांची राहिलेली यादी फलकावर लावली जाईल, वाढीव पदांच्या राहिलेल्या मान्यता याची माहिती संघटनेने घेऊन पुराव्यानिशी दाखल करण्यास सूचना संचालक यांनी दिल्या तसेच उपसंचालक, शिक्षणाधिकारी कार्यालयात विविध प्रस्ताव दाखल करण्यासाठी पडताळा सूची देण्यात येईल, नागरिकांची सनद शिक्षण विभागातील प्रत्येक कार्यालयात लावण्याचे आदेश दिले जातील, आदिवासी दुर्गम भागातील कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतन श्रेणी देण्याच्या आदेश उच्च न्यायालय व कक्षा अधिकारी मंत्रालय मुंबई यांनी दिले आहेत त्यांना तात्काळ मान्यता देऊन वेतन निश्चिती केली जाईल, तसेच उच्च न्यायालयाने दिलेले एक स्तर संदर्भातील आदेश यांचे मार्गदर्शन प्रस्ताव मंत्रालय पाठवले जाईल. यावेळी शिक्षण आयुक्तांनी दोषी कर्मचारी अधिकारी यांना बडतर्फ, निलंबित केले जाईल असे आश्वासन दिले. या धरणे आंदोलना वेळी छात्रभारती संघटना यांनी देखील पाठिंबा दर्शवला व अनुदान टप्पा शिक्षक यांना दिला तर विद्यार्थ्यांची फी देखील कमी होईल अशी माहिती छात्रभारती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

यावेळी शिक्षक भारती विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीचे राज्य अध्यक्ष जयवंत भाबड, महिला अध्यक्ष रूपाली कुरुमकर, शिक्षक भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष रामराव काळे, सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष शाहू बाबर, तालुकाध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, रूपाली, बोरुडे, अकिल फकीर, राजेंद्र नवले, सोलापूर, अहिल्यानगर, पुणे जिल्ह्यातील पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी अन्य शाळेत जाण्यास शिक्षकांचा विरोध

नगर - कॉपीमुक्त परीक्षा अभियानाचा भाग म्हणून राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यावर्षीपासून दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये मुख्याध्यापक आणि शिक्षकांना अन्य शाळांमध्ये केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक म्हणून काम करावे यासाठीचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. मात्र, शिक्षण मंडळाच्या या निर्णयाला काही शिक्षक संघटनांकडून विरोध होत आहे. हा निर्णय म्हणजे शिक्षकांवर अविश्वास दाखवण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळेशिक्षकांची प्रतिमा मलीन होईल, असा आरोप केला जात आहे. अशी माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली.

बारावीची प्रात्यक्षिक परीक्षा २४ जानेवारीपासून तर दहावीची ३ फेब्रुवारी रोजी सुरु होणार आहे. शिक्षक स्वतःच्याच शाळांमध्ये पर्यवेक्षक असल्यास अभियान राबवण्यास अडचणी येतात, असे मंडळाचे निरीक्षण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्याच शाळेत परीक्षा केंद्र मिळाले तर मुख्याध्यापक आणि शिक्षकांना त्या शाळेत परीक्षेचे पर्यवेक्षण करता येणार नाही. दुसर्या शाळेत पाठवले जाईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत प्रतिक्रियेसाठी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी तीन दिवसांपासून संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु, त्यांनी प्रतिसाद दिला नाही, अशी माहिती शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, सचिव विजय कराळे, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर, कैलास जाधव, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिकचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा सचिव म हेश पाडेकर, कार्याध्यक्ष किशोर डोंगरे, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, सोमनाथ बोंतले, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी दिली.

केवळ पंधरा दिवसांत एका ठिकाणचे कर्मचारी दुसर्या ठिकाणी पाठवणे शक्य होणार नाही. प्रत्येक केंद्रातील विद्यार्थीसंख्या आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संख्येत फरक असतो, भौतिक सुविधेत तफावत असते. प्रवासामुळे शिक्षकांचे वेळेचे नियोजन कोलमडते. मंडळाने शिक्षकांवर गैरविश्वास दाखवून त्यांची केंद्रे बदलण्याचा निर्णय घेतला आहे. ही गंभीर बाब आहे.

# महाराष्ट्राच्या भविष्यातील पिढीला एनर्जी ड्रिंक्सच्या विळख्यातून वाचवा : आ. सत्यजीत तांबे

नगर - सरकारने ड्रग्ज मुक्त महाराष्ट्र मोहीम हाती घेतली असताना किराणा माल आणि शाळा कॉलेजच्या आसपास असलेल्या दुकानात कमी किंमतीत उपलब्ध होणारे एनर्जी ड्रिंक हे एखाद्या ड्रग्ज येवढेच घातक आहे. त्यामुळे शाळा परिसरात कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी घालून योग्य कार्यवाही करावी. याबाबत संबधित अधिकाऱ्यांसोबत एक बैठक घेण्यात यावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याकडे केली आहे. त्यांच्या मागणीनुसार मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मंगळवारी तातडीने बैठकीचे आयोजन केले आहे.

जाहिरातींचे अनुकरण करून तरुण वर्गात दिवसेंदिवस एनर्जी ड्रिंकच्या नावाखाली कॅफेनयुक्त थंड पेय सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. या पेयामुळे आरोग्याला मोठा धोका निर्माण होत आहे. शाळा परिसरात एनर्जी ड्रिंकची सहज विक्री असल्याने शाळेतील मुलांना सहज उपलब्ध होत आहे. तरुण वर्गासोबतच लहान मुले देखील याकडे आकर्षित होत आहेत. शाळा व महाविद्यालय परिसरात कॅफेनयुक्त पेय (एनर्जी ड्रिंक्स) सहज उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे आ. तांबे यांनी सांगितले.

### घोषणा करूनही अद्याप कारवाई नाही

राज्यामध्ये शाळा परिसरातील कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी आणा, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी जुलैच्या पावसाळी अधिवेशनात केली होती. आमदार सत्यजीत तांबेंनी मांडलेल्या मुद्यावर तत्कालीन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी शाळा परिसरात ५०० मीटर अंतरावर कॅफेनयुक्त पेयांच्या विक्रीवर बंदी घालण्याचे जाहीर केले होते मात्र अद्याप कोणतीही कारवाई नाही.

### एनर्जी ड्रिंक्समुळे होणारे दुष्परिणाम कोणते?

कॅफेनचे जास्त सेवन केल्यामुळे नशा येऊन मेंदू, किडनी, मज्जारज्जू यावर विपरीत परिणाम होतो. अस्वस्थता, निद्रानाश, प्रजनन समस्या, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि चिडचिडेपणा या व्याधींचा धोका निर्माण होतो.

### वय वर्ष १८ खालील मुलांसाठी विक्री नाही

स्टिंग आणि इतर काही एनर्जी ड्रिंक्सची किराण मालाच्या दुकानात मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. वस्तूता हे एनर्जी ड्रिंक्स १८ वर्षाखालील मुलांनी सेवन करू नये असे लिहिण्यात आलेले असते. मात्र विक्रेते याकडे साफ दुर्लक्ष करून सरसकट वयातील मुलांना याची विक्री करतात.

# दिव्यांगाचा हक्काचा ५% निधी येत्या ८ दिवसात वाटप करावा अन्यथा जिल्हा परिषदेच्या आवारात जागरण गोंधळ करणार

नगर - अनेक वर्षापासून बऱ्याच ग्राम पंचायतींनी, शासन निर्णय २०१६ नुसार मिळणारा दिव्यांगांचा हक्काचा ५ टक्के निधी आजतागायत वाटप केलेले नाही. २६ जानेवारी पूर्वी दिव्यांगांच्या हक्काचा असणारा ५ % निधी वाटप करावा, अन्यथा जिल्हा परिषद आवारात भारतीय जनता पक्ष दिव्यांग विकास आघाडी अहिल्यानगर जिल्हाचे सर्व दिव्यांग बंधू वा भगिनींना बरोबर घेऊन पदाधिकारी जागरण गोंधळ आंदोलन करण्यात येईल असे निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांना भाजपा दिव्यांग विकास आघाडी जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे, महिला जिल्हा अध्यक्षा आशाताई गायकवाड, जिल्हा संघटक गणेश लष्करे, संदीप शिंदे तसेच सर्व पदाधिकारी यांच्या वतीने देण्यात आला.




२६ जानेवारी पूर्वी दिव्यांगांच्या हक्काचा असणारा ५ % निधी वाटप करावा, या मागणीचे निवेदन जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांना देण्यात आले.

२०१६ नुसार मिळणारा दिव्यांग हक्काचा ५ % दिव्यांग निधी मिळण्यासाठी संघटनेचे पदाधिकारी यांनी वारंवार पत्र व्यवहाराच्या माध्यमातून आपल्या कार्यालयाशी संपर्क केला असता, आम्हाला लेखी स्वरूपाची आश्वासने देऊन फक्त सहानभूती दाखवण्याचे काम करण्यात आले. प्रत्यक्षात दिव्यांगांना ना ग्रामीण भागात ग्रामपंचायत कार्यालय असो अथवा तलाठी कार्यालय, कोणत्याही प्रकारचा मान सन्मान मिळत नसल्याची खंत आजही जाणवते. गेले अनेक वर्ष आम्ही फक्त पत्र व्यवहारांच्या माध्यमातून आम्हाला कधी न्याय मिळेल तेच समजत नसल्याने, तसेच आमच्या दिव्यांग बंधू व भगिनींकडे नेहमीच दुर्लक्ष होत असल्याने, आम्ही नाइलाजास्तव जिल्ह्यातील दिव्यांग बंधू व भगिनी समवेत ग्रामसेवकांच्या व प्रशासनाच्या कारभरावर उदास होऊन जिल्हा परिषदेच्या कार्यालय आवारात ३ फेब्रुवारी २०२४ रोजी कोणतीही पूर्व सुचना न देता जागरण गोंधळ घालणार आहोत. आमच्या दिव्यांगांच्या जीवितास काही धोका झाल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशारा वसंत शिंदे आणि दिव्यांग संघटनेच्या वतीने इशारा देण्यात आला.

यावेळी आशिष येरेकर यांनी निवेदन बाबत सकारात्मक चर्चा केली व सदर निवेदनावर संबंधित ग्रामपंचायतींना अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात येतील व दिव्यांगाचा नेहमीच सन्मान केला जात आहे, जर कोणत्याही कार्यालयात दिव्यांगांना व्यवस्थित वागणूक मिळत नसेल तर तशी तक्रार आमच्याकडे करावी, संबंधितांवर कारवाई केली जाईल. अश्या प्रकारचे आश्वासन दिले त्याबद्दल आम्ही साहेबांच्या सकारात्मक चर्चेबाबत समाधानी आहोत.

# गणेशनगर येथे २०० के.व्ही.ची नवीन डिपी बसविण्यात यावी

नगर - गणेशनगर येथे सध्या १०० केव्ही ची डिपी बसविणेत आली आहे. परिसरात नवीन घरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आणि नवीन वीज कनेक्शन देण्यात येत आहे. नविन घरांचे बांधकाम चालू आहे. वारंवार वीज खंडित होत असल्याने घरात टीव्ही, पंखे, इले.मोटार, मिक्सर, फ्रिजी इ.उपकरणामध्ये बिघाड होतो आहे. सध्या गणेशनगरमध्ये २५० घरे आहेत तरी महावितरण वीज कंपनीकडून व आमदार विकास निधीतून २०० के. व्ही.ची नवीन डिपी मिळावी. व विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा. या मागणीचे निवेदन कल्याण रोड येथील गणेशनगर येथील नागरिकांनी आमदार संग्राम जगताप व एमएससीबीचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांना निवेदन देण्यात आले आहे.



कल्याण रोड येथील गणेशनगर येथे २०० के.व्ही. ची नवीन डिपी बसवावी या मागणीचे आ. संग्राम जगताप यांना नागरीकांनी निवेदन दिले.

याप्रसंगी भृंग महाऋषी गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन गणेश शिंदे, नाना देवतरसे, रुपेश लोखंडे, उमेश गोरे, अमोल भांबरकर, रुपेश लोखंडे, राजू तेल्ला, संजय वागस्कर, अनिल राऊत, संजय ढेरे, अनिल सोनवणे, राजू वाळके, महेश रसाळ, गणेश मंचिकटला, शंकर गायकवाड, सुनील वाघमारे, प्रदीप कोकणे, राजेंद्र ताकपेरे, दीपक भैरी, मयूर मिसाळ, किसन जंगम आदी उपस्थित होते.

## शकुंतला बोरुडे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - बोरुडेमळा येथील रहिवासी शकुंतला बबनराव बोरुडे (वय ८०) यांचे २३ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, १ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुधीर बबनराव बोरुडे यांच्या त्या मातोश्री होत.

## किशोर गांधी यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - पुणे येथील रहिवासी किशोर कांतीलाल गांधी (कौडगावकर, वय ६५) यांचे २३ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगी, १ मुलगा, २ भाऊ, १ बहीण, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## शांताबाई भोसले यांचे वृद्धाकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील शांताबाई दिनकर भोसले (वय ९०) यांचे वृद्धाकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बेलापूर ग्रामपंचायतचे माजी सदस्य व पत्रकार रविंद्र भोसले, अरुण भोसले व शरद भोसले यांच्या मातोश्री, सुविध, रोहित, निखिल, सुरज, किरण व साई भोसले यांच्या आजी होत.



# अतिक्रमणाच्या नावाखाली झोपडपट्टीतील रहिवाश्यांना बेघर करण्याचा प्रयत्न

### नागरिकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, तीव्र आंदोलन करण्याचा दिला इशारा

नगर - महापालिकेकडून अतिक्रमणाच्या नावाखाली झोपडपट्टीतील रहिवाश्यांना बेघर करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची तक्रार स्टेशन रोडवरील इंदिरानगर झोपडपट्टीतील रहिवासी नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. हा प्रकार त्वरित न थांबविल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

या निवेदनात म्हंटले आहे की, इंदिरानगर झोपडपट्टी येथे बऱ्याच वर्षापासुन लोकवस्ती आहे व यापूर्वीचे जिल्हाधिकारी यांनी झोपडपट्टी घोषित केली होती. तसेच या ठिकाणी राहणाऱ्या लोकांना तुमचे घरे कधीही उठणार नाहीत असे सांगितलेले आहे. परंतु महापालिकेचे अतिक्रमण विभागाचे पथक कोणत्याही प्रकारे सुचना न देता अचानकपणे अतिक्रमण काढण्याचे प्रयत्न करीत आहे. याप्रकारामुळे लोकांचे मोठया प्रमाणात हाल होत आहे. तसेच त्यांना आम्ही सांगितले असता ते आम्हांला असे म्हणतात की तुम्हाला घरे दिलेले आहेत. तसेच ज्यांना घरे दिलेले आहेत ते तेथे राहतात परंतु त्यांचे मुला - बाळांचे काय? तसेच तेथील घरांमध्ये जागा पुरत नाही. तसेच थोड्याच लोकांना घरे मिळालेली आहेत व बऱ्याच लोकांना घरे भेटलेले नाहीत. सुमारे ३० ते ४० वर्षापासुन या ठिकाणी लोक कायमस्वरुपी रहात आहेत. तसेच त्यांचे सर्व रेशनकार्ड, कागदपत्र ओळखपत्र इ. सर्व कागदपत्रे येथीलच आहेत. तसेच ते लोक पाणीपट्टी व घरपट्टी भरीत आहेत. तसेच त्यांचेकडे पाणीपट्टी व घरपट्टी असतांना देखील अतिक्रमण विभागाने कोणत्याही प्रकारे सुचना न देता प्रत्येकांचे घरात जाऊन मोजणी करतात.



अतिक्रमणाच्या नावाखाली शहरातील इंदिरानगर झोपडपट्टीतील रहिवाश्यांना बेघर करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची तक्रार निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना निवेदन देण्यात आले.

हा कोणता न्याय. नोटीस दिल्यानंतर आम्ही कायदेशीरपणे आमचे म्हणणे मांडू, तसेच पोलीस प्रशासनाची धमकी देऊन आम्हांला घरे उठवायचे नाही. येथील सर्व नागरिक हे गोरगरीब असुन त्यांना बेघर करू नका. नाहीतर आम्हाला नाईलाजाने रस्ता रोको सह तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागेल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

यावेळी स्वप्निल शिंदे, मतीन शेख, राहुल डाके, सुरज जोशी, जितेंद्र पाडळे, आनंद चौधरी, निलेश शिंदे, संजय काळोखे, किशोर दळवी, श्रेयस काळे बाळू वाघचौरे यांच्या सह इंदिरानगर झोपडपट्टी येथील नागरिक उपस्थित होते.


# सावेडी परिसरातून अल्पवयीन मुलगा बेपत्ता

नगर - १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा घरात कोणाला काही एक न सांगता कोठेतरी निघून गेला असून तो बेपत्ता झाल्याची घटना २१ जानेवारी रोजी सावेडी परिसरातील डॉन बॉस्को कॉलनीत घडली.सदर अल्पवयीन मुलगा सायंकाळी सहा वाजण्याचे सुमारास घरातुन बाहेर गेला होता. तो परत घरी आला नाही. म्हणुन त्याच्या कुटुंबीयांनी त्याच्या मित्रांना संपर्क केला असता त्यांनी देखील तो आमचेकडे आला नाही असे सांगितले. म्हणून त्याच्या घरच्यांनी सावेडी, नगर शहर व उपनगर परिसर तसेच नातेवाईकांकडे चौकशी केली असता तो कोठेच मिळून आला नाही. त्यामुळे त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून नेले असल्याची तक्रार मुलाच्या पालकांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिली आहे. या तक्रारी वरून पोलिसांनी अज्ञात इसमा विरूध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# एमआयडीसी येथे श्रीमद भागवत महापुराण कथा सोहळा

नगर - एमआयडीसी (नागापूर) येथे १९ ते २५ जानेवारी दरम्यान माजी नगरसेवक सुभाष बारस्कर यांच्या स्मरणार्थ श्रीमद भागवत महापुराण कथा सोहळा होत आहे. वेदांत चिंतन गुरूकूल, अकोळनेरचे स्वामी अमृतानंद सरस्वती माताजी यांच्या सुश्राव्य वाणीतून हा कथा सोहळा होत आहे.



स्वामी अमृतानंद सरस्वती माताजी

रोज सायंकाळी ६.३० ते ९.३० या वेळेत कथा होत असून रात्री साडेनऊ ते साडेदहा या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. कथा सोहळ्याची सांगता २६ जानेवारी होणार आहे. सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत एल ॲण्ड टी कॉलनी, जिमखाना, एमआयडीसी येथे काल्याचे किर्तन होणार आहे. श्रीमद भागवत महापुराण कथा सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बारस्कर परिवार तसेच नागापूर, नवनागापूर, बोल्हेगाव आणि सावेडी परिसरातील ग्रामस्थांनी केले आहे.





अ फर्स्ट स्टेप प्री-प्रायमरी स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

# अ फर्स्ट स्टेप प्री-प्रायमरी स्कूलच्या स्नेहसंमेलनात बालकांनी घडविले कश्मीर ते कन्याकुमारीचे दर्शन

### सांस्कृतिक कार्यक्रमात मुलांसह मातांचा देखील सहभाग

नगर - केडगाव येथील अ फर्स्ट स्टेप प्री-प्रायमरी स्कूलच्या स्नेहसंमेलनात बालकलाकारांनी आपल्या अदाकारीने व सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. शाळेचे चौथे वार्षिक स्नेहसंमेलन केडगाव देवी रोड येथील ऊर्जा रंगभवन येथे उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व गणेश वंदनेने करण्यात आली. स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सचिन आहेर, महावितरण शहर उपविभाग दोनचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाऊसाहेब कुमावत उपस्थित होते.

डॉ. सचिन आहेर यांनी मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासंदर्भात पालकांना मार्गदर्शन केले. शाळेच्या संचालिका मोनिका रविंद्र कुसळकर यांनी मुलांसाठी खेळातून शिक्षणासोबतच डिजिटल शिक्षणाची सांगड घालून मुलांच्या शिक्षणातील उत्साह वाढविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली.


अतिरिक्त कार्यकारी अभियंता कुमावत यांनी मुलांसाठी पालकांनी वेळ द्यायला हवा. त्यांना सोशल मीडियापासून लांब ठेवून त्यांचा मानसिक, बौध्दिक व शारीरिक विकास साधण्यासाठी त्यांच्यात वाचन, मैदानी खेळाची आवड निर्माण करण्याचे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमासाठी सुलक्षणा आडोळे, रुपाली टाकते आणि वैजंता कातोरे यांचे सहकार्य लाभले. स्नेहसंमेलन यशस्वीतेसाठी वर्गशिक्षिका दिपाली बनकर, अर्चना केदार, उर्मिला ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात मुलांनी विविध गीतांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. सांस्कृतिक आणि आधुनिक जगाचे मेळ घालून विठ्ठल भक्ती, राधा कृष्णाचे प्रेम तर लक्ष्मीकांत बर्डे आणि अशोक सराफ यांच्या गाण्यावर ताल धरला होता. तर बॉलीवूडच्या धमाकेदार गीतांनी कार्यक्रमात रंग भरला. सोशल मीडियाचे दुष्परिणाम दर्शवणारी विद्यार्थ्यांनी नाटिका सादर केले. तसेच आपल्या भाषणातून चिमुकल्यांनी वक्तृत्वाचे कौशल्य देखील दाखवले.

मोनिका कुसळकर यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या मातांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी घागरा घालून ८ गाण्यांच्या फ्युजनवर महिलांनी नृत्याचे सादरीकरण केले. आपल्या चिमुकल्यांचे कलागुण पाहण्यासाठी आई-बाबांबरोबर आजी-आजोबा देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालकांच्या या कलागुणांना त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. कार्यक्रमाची सांगता मुलांनी भारत देशातील कश्मीर ते कन्याकुमारी अशा विविध प्रदेशातील लोकांच्या वेशभूषा परिधान करुन विविध भाषेतील गाण्यांच्या कडव्यांवर ठेका धरत रॅम्प वॉक केला. कला, क्रीडा, शैक्षणिक व विविध स्पर्धेत नैपुण्य मिळवणाऱ्या गुणवंतांचा पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# अहिल्यानगरमध्ये २६ ते ३० जानेवारी दरम्यान लोकशाही उत्सवाचे आयोजन




नगर - देश संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना भारताच्या लोकशाहीपुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. राजकीय व व्यावहारिक पातळीवर अनेक अंगाने लोकशाहीला कमजोर करण्याचे काम सुरु आहे. देशपातळीवर राजकीय अंगाने भांडवलदारी व्यवस्थेचे उदात्तीकरण सुरु आहे. अशावेळी हुकुमशाही, राजेशाही व्यवस्थेला नाकारणारी व सर्वहारा वर्गाला समता, बंधुता आणि सामाजिक न्याय देण्यास कटिबद्ध असलेली लोकशाही टिकली पाहिजे व ती तळागाळात झिरपली पाहिजे हा हेतू समोर ठेऊन नगरमध्ये सन २०२२ पासून लोकशाही उत्सवाला सुरुवात झाली. शहरातील वेगवेगळ्या पुरोगामी व समविचारी संघटनांनी एकत्रित येऊन हा उत्सव सुरू केला. या वर्षी २५ ते ३० जानेवारी या दरम्यान लोकशाही उत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लोकशाही उत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. प्रशांत शिंदे यांनी दिली.

हा लोकशाही उत्सव दरवर्षी प्रजासत्ताक दिन ते महात्मा गांधी हौतात्म्य दिन या दरम्यान आयोजित करण्यात येतो. यावर्षी २५ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता विद्या कॉलनी, कल्याण रोड येथे पारुनाथ ढोकळे, आनंद शितोळे यांच्या सहकार्याने रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २६ जानेवारी रोजी वास्तवपटकार वरुण सुखराज यांच्या 'टू मच डेमॉक्रसी' या शेतकरी आंदोलनाच्या वास्तव पटाचे प्रदर्शन व चर्चेचे आयोजन शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, धोत्रे, ता. पारनेरला करण्यात आले आहे. तर २७ व २८ जानेवारीला डॉ. प्रशांत शिंदे, अशोक सब्बन व डॉ. बापू चंदनशिवे हे वेगवेगळ्या महाविद्यालयात जाऊन लोकशाहीवर व्याख्याने देणार आहेत. २९ जानेवारीला नगरमध्ये शिवाजी नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली संविधानाचा प्रचार प्रसार करणारे पथनाट्याचे सादरीकरण होणार आहे. तर ३० जानेवारी रोजी संध्याकाळी पाच वाजता रावसाहेब पटवर्धन स्मारक, सावेडी येथे प्रा. सुभाष वारे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण कार्यक्रम व उर्दू कवयित्री कमर सुरूर यांच्या अध्यक्षतेखाली बहुभाषिक काव्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या कविसंमेलनात प्रतिमा अहिरे (कन्नड), मुसेब आझमी (आझमगढ, उत्तर प्रदेश), नोमान सिद्दीकी (गोरखपूर, उत्तर प्रदेश), प्रकाश घोडके (पुणे) आणि बिलाल अहेमदनगरी सहभागी होणार असल्याची माहिती लोकशाही उत्सवाच्या निमंत्रक सोनाली देवढे-शिंदे, संध्या मेढे, ॲड. विद्या जाधव-शिंदे, प्रमिला कार्ले, सुरेखा आडम आणि समृद्धी वाकळे यांनी दिली.

या सर्व उपक्रमात लोकांनी सहभागी व्हावे असे आवाहन खजिनदार अशोक सब्बन यांनी केले आहे.

# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे ३० जानेवारीला आयोजन

नगर - जिल्ह्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रात नव्याने निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ३० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता के.जे. कॉलेज ऑफ आर्टस ॲंड कॉमर्स अहिल्यानगर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुकांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन संधीचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सुर्यवंशी यांनी केले आहे.

या रोजगार मेळाव्यामध्ये जिल्ह्यातील नामांकित कंपन्यांचे उद्योजक सहभागी होऊन प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करणार आहेत. सर्व शाखेतील पदवीधर, आयटीआय ट्रेड व वैद्यकीय (नर्सिंग), इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, संगणक आदी क्षेत्रामध्ये पदविका, पदवी प्राप्त उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर तसेच https://forms.gle/3S1DHFW2Q6FQ1Mbi9 या लिंकवर नोंदणी करुन पात्रतेनुसार उद्योजकांकडे अर्ज करावा.

याबाबत अधिक माहितीसाठी वसीमखान प्रमाणध्वनी क्र. ९४०९५५५४६५, मच्छिंद्र उकिरडे ९५९५७२२४२४, संतोष वाघ ८८३०२१३९७६, बद्रीनाथ आव्हाड ९४२०७२५२८०, योगेश झांजे ९५८८४०८८९० अथवा कार्यालयाच्या ०२४१-२९९५७३५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# १०० व्या विभागीय मराठी नाट्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी निनादणार

### नगरच्या १०० कलावंतांची 'नांदी' आणि १०० कलावंतांचा नृत्याविष्कार; रविवारी सायंकाळी ४ वाजता नाट्य दिंडी आणि नेत्रदीपक कार्यक्रमाचे आयोजन




नगर - नगरमध्ये २६ व २७ जानेवारी रोजी आयोजित अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या संमेलनानिमित्त नगरच्या कलाकारांनी नांदी आणि स्वागतगीताची निर्मिती केली आहे. पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात संमेलन स्थळी १०० कलाकार नांदी सादर करणार आहेत. २६ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता नाट्य दिंडीही काढण्यात येणार आहे. प्रोफेसर कॉलनी चौक, प्रेमदान चौक, माऊली सभागृह ते पेमराज सारडा महाविद्यालय प्रांगण संमेलन स्थळी ही नाट्य दिंडी दाखल होईल.

नांदी म्हणजे ईश्वराचे स्तवन, मंगलाचरण असणारी एक प्रकारची लोककला आहे. नाटकाचा प्रयोग सुखरूप पार पडावा म्हणून नाट्यारंभी नांदी म्हटली जाते. १०० व्या विभागीय मराठी नाट्य संमेलनासाठी नगरच्या मंगल पाठक लिखित आणि ऋतुजा पाठक यांनी संगीतबद्ध केलेली विशेष नांदी २६ जानेवारी रोजी पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात सायंकाळी ६ वाजता संमेलन उद्घाटनप्रसंगी निनादणार आहे. संमेलनप्रमुख क्षितिज झावरे यांची संकल्पना असलेले सुप्रिया ओगले दिग्दर्शित स्वागतासाठी १०० नृत्यांगनांचा नृत्याविष्कार यावेळी पहायला मिळेल.

संमेलनाचे उद्घाटन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या मध्यवर्तीचे विश्वस्त व उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, नाट्य परिषदेच्या मध्यवर्तीचे विश्वस्त व ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, ज्येष्ठ अभिनेते मकरंद अनासपुरे, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक आदींची उपस्थिती राहील.

उद्घाटनानंतर सायंकाळी ७ वाजता अभिनेत्री मानसी नाईक, माधवी निमकर, विशाखा सुभेदार, सुरेखा कुडची, गायिका सन्मिता धापटे - शिंदे, गायक राहुल सक्सेना व चंद्रशेखर महामुनी, अभिनेते कमलाकर सातपुते, झी सारेगम फेम संदीप उबाळे, मयूर पालांडे, कविता जावळेकर हे कलाकार संगीत रजनी सादर करणार आहेत. नगरच्या या ऐतिहासिक नाट्य संमेलनात रसिकांनी सहभागी होण्याचे आवाहन स्वागताध्यक्ष डॉ.बापूसाहेब कांडेकर, निमंत्रक आमदार संग्राम जगताप, संमेलन प्रमुख क्षितिज झावरे, उपनगर शाखेचे अध्यक्ष -प्रसाद बेडेकर, प्रमुख कार्यवाहक चैत्राली जावळे, मध्यवर्ती कोषाध्यक्ष सतीश लोटके, मध्यवर्ती नियामक मंडळ सदस्य संजय दळवी, अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, कोषाध्यक्ष जालिंदर शिंदे, मार्गदर्शक पी. डी. कुलकर्णी आदींनी केले आहे.

# स्व.कृष्णाभाऊ जाधव स्मरणार्थ साई क्रिकेट क्लब आयोजित प्रीमियर लीग स्पर्धेत साईद्वारका क्लबने पटकावले विजेतेपद



स्वर्गीय कृष्णाभाऊ जाधव यांच्या स्मरणार्थ साई क्रिकेट क्लब आयोजित प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. (छाया - लहू दळवी)

नगर - न्यू आर्ट्स कॉलेजच्या मैदानावर स्वर्गीय कृष्णाभाऊ जाधव यांच्या स्मरणार्थ साई क्रिकेट क्लब आयोजित प्रीमियर लीग स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेचा अंतिम सामना साईद्वारका क्रिकेट क्लब विरुद्ध रायझिंग स्टार संघामध्ये अटीतटीचा झाला. यामध्ये साईद्वारका क्रिकेट क्लब ने १० षटकामध्ये ११७ धावांचे आव्हान रायझिंग स्टार संघाला १११ धावापर्यंतच मजल मारली आणि साईद्वारका क्रिकेट क्लबने विजेतेपद पटकावले असून मॅन ऑफ द मॅच अविनाश दातरंगे, मॅन ऑफ द सिरीज हर्षल डोमकावळे, बेस्ट फिल्डर आकाश पिस्का, बेस्ट बॉलर संतोष बनधरे, बेस्ट बॅट्समन विकास गोरे यांना सन्मानित करण्यात आले. स्पर्धा २० दिवस सुरु होती. यामध्ये १० टीम सहभागी झाल्या होत्या आणि साखळी पद्धतीने खेळविण्यात आली असून या स्पर्धेमध्ये सुमारे १६० खेळाडू सहभागी झाले असल्याची माहिती साईद्वारका सेवा ट्रस्टचे अध्यक्ष धनंजय जाधव यांनी दिली

स्वर्गीय कृष्णाभाऊ जाधव यांच्या स्मरणार्थ साई क्रिकेट क्लब आयोजित प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, ॲड.विश्वासराव आठरे पाटील, निखिल वारे, राजेंद्र बलदोटा, राजूमामा जाधव, चैतन्य जाधव, दत्ता गाडळकर, पंडित वाघमारे, राजेंद्र बोगा, जितेंद्र लांडगे, आनंद पुंड, राजेंद्र गुगळे, रिकी बक्षी, प्रताप काळे, मितेश शहा, सागर फुलसौंदर, छगन मोहिते,राहुल मुथा, सोमनाथ जाधव, आयोजक साई क्रिकेट क्लबचे गणेश गायकवाड, सनी दातरंगे, पंकज सावंत, राज कोंडके, गणेश भिसे, सर्वेश देशमुख, सौरभ येणारे, गौतम गायकवाड आदी उपस्थित होते

स्वर्गीय कृष्णाभाऊ जाधव यांनी नेहमीच शहरातील जनतेचे प्रश्न मांडण्याचे काम केले त्यांच्या नावाने गेल्या ४ वर्षापासून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करीत खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले गेले असल्यामुळे खेळाडूमध्ये नवचैतन्य निर्माण झाले क्रिकेट खेळामध्ये दिवसेंदिवस बदल होत चालले असून ५० षटकाचा सामना आता २० षटकापर्यंत आला आहे त्यामुळे पारितोषिक देखील वाढले आहे आता खेळाडूंना देखील क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या संधी उपलब्ध झाल्या असल्याचे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले

कोणतेही अपयश कायम नसते त्यासाठी जिद्द, चिकाटी मेहनतीची खरी गरज असून प्रयत्नांवर विश्वास ठेवला पाहिजे स्वर्गीय कृष्णाभाऊ हे संघर्षशील नेतृत्व होते त्यांनी निमित्त सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी आवाज उठविला होता खेळाला आता चांगले दिवस आले असून सरकार देखील खेळाडूंचे कौतुक करत मोठ्या प्रमाणात मानधन देत आहे त्याचबरोबर खेळाडूला शासकीय नोकरीमध्ये देखील सामावून घेतले जात असल्याची माहिती अभय आगरकर यांनी दिली.

जगामध्ये खेळाला खूप महत्त्व आले आहे आपली खो-खो ची टीम जागतिक स्तरावर जाऊन आपल्या देशाचे नावलौकिक केले त्यामुळे आपले भारतीय खेळ जगाच्या पाठीवर गेले आहे आपल्या जीवनामध्ये खेळ हा महत्त्वाचा घटक झाला आहे पालकांनी देखील आपल्या पाल्याला खेळाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे त्याच्या आवडीच्या खेळासाठी प्रोत्साहित केले पाहिजे नगर शहराला खेळ संस्कृती लाभली आहे आणि ती वाढवण्यासाठी काम केले पाहिजे असे मत विश्वासराव आठरे पाटील यांनी केले.

# डॉ.पी.ए.इनामदार विद्यालयात बाल आनंद मेळावा साजरा

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यवहारीक ज्ञान देणे महत्वाचे : सतिश लंके

नगर - डॉ. पी. ए. इनामदार प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल, तपोवनरोड अहिल्यानगर यांचा संयुक्त बालआनंद मेळावा उत्साही वातावरणात पार पडला. मेळाव्याचे अध्यक्षस्थान वस्तू व सेवा कर महाराष्ट्र राज्य मुंबई उपायुक्त सतिश लंके यांनी भूषविले. त्याचप्रमाणे कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन अनिल साळुंके, संस्थेचे अध्यक्ष एन.ए. पठाण, देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, समीर पठाण, महाराष्ट्र कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शुभम टेमकर, डॉ. पी.ए.इनामदार विद्यालयाच्या शिल्पा शिंदे, गुरुकुल इंग्लिश मिडियम स्कूल च्या प्राचार्या दीप्ती कराळे उपस्थित होते.



डॉ.पी.ए.इनामदार विद्यालयात बाल आनंद मेळावा साजरा झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सतिश लंके यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानाबाबत मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यवहारीक ज्ञानाचे महत्व कार्यक्रम चे अध्यक्ष सतिश लंके यांनी विद्यालयातील सांगितले.

विद्यालयाचे चेअरमन अनिल साळुंके यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक ज्ञानबरोबरच व्यवहारिक ज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांचे व विद्यालयाचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष एन.ए.पठाण यांनी संस्थेच्या प्रगतीची माहिती दिली. चेअरमन अनिल साळुंके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सबा शेख यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शितल कडूस, अमोल निमसे, अभिजित गवारे, सबिहा शेख, ममता कोरी, राधा चौधरी, योगिता मोहिते, गायत्री शेळके, फातिमा शेख, मुबीना बागवान, दुर्रे शहवार बागवान, संजीवनी वणवे, वैशाली तागड, अश्विनी चौधरी, अनिता कुमावत, शितल रहाणे, वैशाली कर्डिले, इरशान शेख, जैनब शेख, शहला पटेल, आसमा बेग, सलमान पठाण, आसिफ पठाण, विमल पोतखुले, ज्योती मुर्तडकर यांनी परिश्रम केले.



## मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांना ध्यानधारणेची पुस्तके देण्यात आली भेट

पुण्यामध्ये मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव आले असताना जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकवणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन ब्रह्माकुमारी डॉ. त्रिवेणी यांच्या हस्ते ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली. यावेळी बीके डॉ. दीपक हरके व बीके आशा उपस्थित होते.

# अंबिका उद्योग समूह आयोजित टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत के.जी. सरकार संघ विजेता

### उत्कृष्ट खेळाडूंना रोख पारितोषिके



अंबिका उद्योग समूह आयोजित टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत के.जी. सरकार संघ विजेता ठरला.

नगर - नगरमधील अंबिका उद्योग समूह संचलित अंबिका क्रिकेट क्लबच्या आयोजित टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत के. जी. सरकार (अ.नगर) संघ विजेता ठरला. उपविजेतेपदाचा मान आनंद बडे इलेव्हन (धुळे) यांना मिळाला. तृतीय पदावर वैभव भगत इलेव्हन (शेंडी) व चौथ्या क्रमांकावर ग्रामीण क्रिकेट क्लब (भोकरदन, जालना) यांना समाधान मानावे लागले. के. जी. सरकार व आनंद बडे इलेव्हन (धुळे) यांच्यात झालेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यात के. जी. सरकार संघाने ट्रॉफीवर आपले नाव कोरले. श्री रेणुकामाता मंदिराजवळ, एमआयडीसी जिमखाना मैदानावर झालेल्या या स्पर्धेचे हे पाचवे वर्ष होते. प्रथम विजेत्या संघास १ लाख, उपविजेत्या संघास ७१ हजार, तृतीय विजेत्या संघास ५१ हजार व चौथ्या संघास ३१ हजारांचे रोख पारितोषिक देण्यात आले. याबरोबरच मॅन ऑफ द सिरीज व बेस्ट बॅटसमन अक्षय जराड (नेवासा), बेस्ट बॉलर पॅरिस कांबळे (दौंड) आणि बेस्ट क्षेत्ररक्षक अतुल मगर (निंबळक) यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले.

# गृहिणी

## आरोग्य

### तुळशीचा चहा प्या निरोगी रहा

तुळशीमध्ये अँटिऑक्सिडेंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करतात. सर्दी, खोकला, ताप आणि इतर संक्रमणांपासून संरक्षण करण्यासाठी हे उपयुक्त आहे. तुळशीमध्ये ॲडप्टोजेनिक गुणधर्म असतात जे तणाव पातळी कमी करण्यास मदत करतात. हे तुमचा मूड सुधारण्यास, चिंता आणि नैराश्य कमी करण्यास मदत करते. तुळशीचा चहा प्यायल्याने तुम्हाला शांत आणि ताजेतवाने वाटते. तुळस पचन सुधारण्यास मदत करते. अपचन, बद्धकोष्ठता आणि पोटदुखीपासून आराम मिळण्यास मदत होते. तुळशीच्या चहामध्ये असलेले दाहक-विरोधी गुणधर्म पचनसंस्थेला शांत करतात आणि पचन प्रक्रिया सुरळीत करतात.

## पाककला

### मटार मशरुम

**साहित्य :** तेल तीन टेबलस्पून, आले पेस्ट २/३ टीस्पून, हिरवी मिरची एक, लसूण पेस्ट २/३ टीस्पून, कांदा एक, टोमॅटो तीन, मशरूम २०० ग्रॅम, धणेपूड एक टीस्पून, मटार २/३ कप गोठलेले, तिखट १/२ टीस्पून, चवीनुसार मीठ

**कृती :** एका पॅनमध्ये तेल गरम करा. नंतर त्यात बारीक चिरलेला कांदा घालून परतवून घ्या. यानंतर त्यात आले-लसूण पेस्ट घालावी. आता चिरलेला टोमॅटो आणि हिरवी मिरची घालून परतवून घ्यावे. तसेच हळद, तिखट आणि धणेपूड घालावी. यानंतर, हे सर्व चांगले मिक्स करून त्यात चिरलेले मशरूम आणि मटार घालावे. नंतर गरजेनुसार पाणी घालून मिक्स करावे व मीठ घालून शिजू द्यावे. आता पॅन वर झाकण ठेवावे. मटार मऊ होईपर्यंत शिजवा. नंतर त्यात गरम मसाला घालावा.

## वास्तू

### ऑफिसचे प्रवेशद्वार

✲ ऑफिसचे प्रवेशद्वार पश्चिम दिशेस असणे अत्यंत प्रतिकूल व अशुभ मानले जाते. खूप चांगली मेहनत घेऊन सुद्धा चांगले यश या ठिकाणी मिळत नसते. या ठिकाणी मार्केटींग विभाग असणे चांगले असते.

✲ कॉन्फरन्स हॉल पश्चिम वायव्य या ठिकाणी असणे योग्य आहे

## सल्ला

भजी करताना बेसन पिठासोबत थोडे तांदळाचे पीठ घालून भजी केली तर छान कुरकुरीत होतात.

## सौंदर्य

त्वचा तेलकट असेल तर बेसन, हळद, लिंबू रस आणि दही घालून पेस्ट बनवून चेहऱ्याला लावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, अनुराधा ३१।०८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** काळजीपूर्वक कार्य करावे. नोकरीत असलेल्या व्यक्तींनी कार्यात सहकार्य घेऊन चालल्याने लाभ होईल. मागील उधारी वसुल होईल.

**वृषभ :** संभाषणात सावधगिरी न बाळगल्याने वाद संभवतात. देवाण-घेवाण काळजीपूर्वक करावे. दिवस चांगला जाणार नाही.

**मिथुन :** कार्यात विलंब झाला तरी यश मिळेल. नोकरदारांनी इतर व्यक्तींची मदत घेऊन कामे करावी लागतील. नोकरदार वर्गाची कामाची नवीन जबाबदारी वाढेल.

**कर्क :** आजचा दिवस चांगला नाही आणि कार्य करण्यासाठी कष्ट घ्यावे लागतील. कोणत्याही कार्यात बेपर्वाईने वागणे नुकानदायक ठरेल.

**सिंह :** कौटुंबिक विषयांमध्ये आशादायक काळ आला आहे. घरगुती वातावरण चांगले राहील. खर्च अधिक होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**कन्या :** शत्रू प्रभावहीन होतील. कार्यक्षेत्रात नवीन प्रोजेक्टची सुरुवात करण्यापूर्वी यथायोग्य विचार केल्यास लाभ संभवतो.

**तूळ :** व्यापार व्यवसायात आशादायक परिणाम मिळतील. दिवस चांगला जाईल. समाजमाध्यमांद्वारे प्रतिष्ठा वाढेल. आरोग्य उत्तम राहील.

**वृश्चिक :** जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळावी. आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल. व्यवसायातील नफा चांगला असेल. आर्थिक लाभ होईल.

**धनु :** आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घ्या. महत्त्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील. मातृचिंता सतावेल. हितशत्रू डोके वर काढतील.

**मकर :** वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. मित्रांचा पाठिंबा मिळेल.

**कुंभ :** भावनात्मकतेमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. मागील उधारी वसुल होईल. नोकरदार वर्गाचा रुबाब वाढेल.

**मीन :** स्वाक्षरी करण्यापूर्वी कागदपत्रे वाचून घ्यावी लागतील. आजच्या दिवसाचा उपयोग नाती-संबंधात नवीन उर्जा भरण्यासाठी करा.


**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### विचित्र पत्र

ऑफिसच्या पत्यावर एकाला आपल्या बायकोचे पत्र आले. तिने ते माहेरून पाठवले होते. तो पाकिट फोडत असतांना शेजारचा मित्र डोकावून पाहत होता. तेव्हा त्याने पत्र त्याला दिले व म्हणाला 'वाच' पत्र पाहून मित्र आश्चर्यचकित झाला कारण तो फक्त कोरा कागद होता. 'आजकाल आमचं भांडण आहे. बोलाचाली बंद आहे. म्हणून माहेरहून तिने असे विचित्र पत्र पाठवले आहे.' पतिराजांनी मित्राला स्पष्टीकरण दिलं.

## फिल्मीचक्कर क्र. ११७३ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :** - १) ++ ++ +++ दीवाना है राम (गाणे) ४) ++ एक मंदिर (चित्रपटाचे नाव) ६) 'दो कलीयाँ, हिमालय की गोद में, गीत, आँखें' आदी चित्रपटांची नायिका ८) प्रसिद्ध दिवंगत पार्श्वगायक १०) प्रसिद्ध दिवंगत गीतकार - ++++ जयपुरी १२) राज कपूर, वैजयंतीमाला, राजेंद्रकुमार यांचा गाजलेला एक चित्रपट १३) या चित्रपटात अमिताभ बच्चनची तिहेरी भूमिका आहे १४) ++ धुपिया (अभिनेत्रीचे नाव)

**उभे शब्द :-** १) ++ ++ और दर्द लिया (चित्रपटाचे नाव) २) देव आनंद, नूतन यांच्या यात भूमिका आहेत ३) 'श्यामची आई' या मराठी चित्रपटात आईची भूमिका करणारी अभिनेत्री ५) ++ फरिश्ता (चित्रपटाचे नाव) ७) 'दिलवाले दुल्हनीया ले जायेंगे' चित्रपटात काजोलचे नाव ९) 'शोले' चित्रपटातील हेमामालिनीचे नाव १०) ++ किसीसे कम नहीं (चित्रपटाचे नाव) ११) एक दिवंगत चरित्र अभिनेता - बलराज +++

# ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲ मुलांचे विश्व ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** वारसा हा वस्तुंचा नसतो तर विचारांचा असतो.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### सकाळ पेक्षा रात्री रक्तदाब जास्त वाढतो का?

आजच्या धावपळीच्या जीवनात, उच्च रक्तदाब ही एक सामान्य समस्या बनली आहे. मोठ्या संख्येने लोक उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत. बऱ्याचदा लोक दिवसा त्यांचा रक्तदाब तपासतात. पण तुम्हाला माहिती आहे का की रात्रीच्या वेळीही रक्तदाब वाढू शकतो? आपण जाणून घेऊया की सकाळच्या तुलनेत रात्री रक्तदाब वाढण्याची शक्यता जास्त आहे का आणि त्यामागील कारण काय आहे. तसेच, ते रोखण्यासाठी कोणते उपाय करावेत हे आपण जाणून घेऊ.

साधारणपणे लोकांना असे वाटते की रात्री शरीर विश्रांती घेते, म्हणून रक्तदाब कमी असावा. पण कधीकधी असे होते की रात्री रक्तदाब वाढतो. याची अनेक कारणे असू शकतात, जसे की: स्लीप एपनिया ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये झोपेच्या दरम्यान श्वास थांबतो. यामुळे रक्तदाब वाढू शकतो. दिवसाचा ताण रात्रीपर्यंतही राहू शकतो, ज्यामुळे रक्तदाब वाढू शकतो. काही औषधे रात्रीच्या वेळी रक्तदाब वाढवू शकतात. झोपण्यापूर्वी कॅफिन किंवा अल्कोहोलचे सेवन केल्याने देखील रक्तदाब वाढू शकतो. रात्री उशिरा जेवल्याने रक्तदाब वाढू शकतो. रात्री वारंवार जागे होणे, श्वास घेण्यात अडचण होणे, डोकेदुखी होणे, जलद हृदयाचा ठोका रात्रीच्या वेळी रक्तदाब वाढल्याने हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि मूत्रपिंडाचा आजार यासारख्या गंभीर समस्या उद्‌भवू शकतात.

रात्रीच्या वेळी रक्तदाब वाढणे ही एक गंभीर समस्या असू शकते. म्हणून, जर तुम्हाला रात्रीच्या वेळी रक्तदाबाची समस्या असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या. निरोगी जीवनशैलीचा अवलंब करून आणि काही खबरदारी घेऊन तुम्ही रात्रीच्या वेळी रक्तदाब नियंत्रित करू शकता.

## परावलंबन

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. चांदनगरजवळ एक जंगल होते. व त्या जंगलात एक मोठे वडाचे झाड होते. ज्यावर एक कावळा आणि एक कोकिळ दोघेही राहत होते. एका रात्री जंगलात वादळ सुरु झाले, पाऊस सुरु झाला. व जंगलातील सर्व काही नष्ट झाले. दुसऱ्या दिवशी कावळा आणि कोकिळेला त्यांची भूक भागवण्यासाठी काहीही सापडले नाही. मग कोकिळा कावळ्याला म्हणाली, ''आपल्याकडे खायला काही नाही. मग मी घातलेले अंडे खाऊन तुझी भूक का भागव आणि जेव्हा तू अंडे घालशील तेव्हा मी ते खाऊन माझी भूक भागवीन.''

कावळा कोकिळेच्या बोलण्याशी सहमत झाला. कावळ्याने पहिले अंडे दिले आणि कोकिळेने आपली भूक भागवण्यासाठी ते खाल्ले. मग कोकिळेने अंडी घातली. कावळा कोकिळेचे अंडे खाणार कोकिळेने त्याला थांबवले. कोकिळा म्हणाली, ''तुझी चोच स्वच्छ नाहीये. तू जाऊन ते धुवून घे मग अंडे खा.'' कावळा नदीकाठी गेला. तो नदीला म्हणाला, ''मला पाणी दे. मी माझी चोच धुवून कोकिळेचे अंडे खाईन.''

नदी म्हणाली, ''ठीक आहे तू पाण्यासाठी भांडे आण.'' आता कावळा पटकन कुंभाराजवळ पोहोचला. तो कुंभाराला म्हणाला, ''मला भांडे दे. मी त्यात पाणी भरेन आणि माझी चोच धुवून कोकिळेचे अंडे खाईन.''

कुंभार म्हणाला, ''तू मला माती आण मी तुझ्यासाठी भांडे बनवतो.'' हे ऐकून कावळा पृथ्वीमातेकडून माती मागू लागला. तो म्हणाला, ''पृथ्वीमाते मला माती दे.'' मी त्यापासून बनवलेले एक भांडे घेईन आणि त्या भांड्यात पाणी भरून माझी चोच स्वच्छ करेन. मग मी माझी भूक भागवण्यासाठी कोकिळेचे अंडे खाईन''

पृथ्वीमाता म्हणाली, ''मी तुला माती देईन, पण तुला कुदळ आणावा लागेल. त्याचा वापर करून माती काढली जाईल.'' कावळा लोहाराजवळ पोहोचला. तो लोहाराला म्हणाला,

''मला तो कुदळ दे. मी त्यातून माती काढून कुंभाराला देईन आणि भांडे घेईन. मग मी भांड्यात पाणी भरेन आणि त्या पाण्याने माझी चोच धुवून कोकिळेचे अंडे खाईन.'' लोहाराने गरम कुदळ कावळ्याला दिला. कावळ्याने ते पकडताच त्याची चोच जळून गेली आणि कावळा वेदनेने मरण पावला. अशाप्रकारे कोकिळेने हुशारीने आपली अंडी कावळ्यापासून वाचवली.

तात्पर्य : कधीही इतरांवर पटकन विश्वास ठेवू नये. यामुळे फक्त स्वतःचेच नुकसान होते.



## रहमते दर्शन (भाग - १)

### वे दुःख भंजन थे

उसने यह बातें ध्यान से सुनी और दिल्ली रवाना हो गया। दिल्ली पहुँच कर उत्तमसिंह सीधा कृपाल आश्रम पहुँचा और निश्चित समय पर महाराज जी से मिला। महाराज जी से उसने वही बातें की, जो मैंने उससे कही थीं। महाराज जी ने उसे कहा, आप फ़िक्र न करो, आपका ऑपरेशन ठीक-ठाक हो जायेगा। यह प्रसाद लो। इसके बाद महाराज जी ने स्वयं बहुत सारा प्रसाद बीकानेर की संगत के लिए भी दिया, जिसे बाद में उत्तम सिंह ने हमें दे दिया।

इसके बाद उत्तमसिंह अस्पताल आया। अ.भा. आ. संस्थान में ऑपरेशन की तिथि कई महीनों बाद मिलती है, परन्तु उत्तमसिंह को तीसरे की दिन की तारीख मिल गई और सबसे अच्छी और आश्चर्य जनक बात तो यह थी कि अब उसे कोई डर नहीं लग रहा था।

ऑपरेशन के दिन उसे ऑपरेशन थियेटर पहुँचाया गया। ऑपरेशन में उसके दो वाल्व बदले जाने थे और ऑपरेशन ८ घंटे तक चला। उत्तम सिंह ने बताया कि जब तक ऑपरेशन चला यानी इंजेक्शन लगाने से अंत तक, वह सब कुछ देख रहा था और विशेष बात यह थी कि अति नूरानी चेहरे वाला एक सिक्ख डॉक्टर, जिसने डॉक्टरों की ही वर्दी पहन रखी थी, पूरे ऑपरेशन में उसकी नजरों के सामने रहा।

ऑपरेशन के बाद जब उत्तमसिंह को होश आया, तो सभी डॉक्टर बारी-बारी से उसका हाल-चाल पूछने आये, परन्तु वह सरदार डॉक्टर नहीं आया। उसके पूछने पर वहाँ उपस्थित डॉक्टरों ने उसे बताया कि सरदार डॉक्टर तो उस समय पूरे अस्पताल में भी नहीं था।

कुछ ही दिनों में उत्तमसिंह चलने फिरने योग्य हो गया। जब वह वापिस ड्यूटी पर आया, तो सब हैरान थे कि वह इतनी जल्दी कैसे बिल्कुल स्वस्थ हो गया क्योंकि इस प्रकार के मरीज़ को ठीक होने में कम से कम ६ महीने लगते हैं।

बाद में वह दिल्ली जाँच के लिए जाता रहा। जाँच में सभी परीक्षणों में वह सही पाया गया। इस घटना से गुरुवाणी की यह तुक बिल्कुल सही लगती है दुःख भंजन तेरो नाम जी, दुःख भंजन तेरो नाम। दयाल पुरुष वास्तव दुःख भंजन ही थे और हम पापी जीवों के लिए, हमारे अनन्त जन्मों के दुःख दूर करने के लिए इस धरा पर आये थे। धन्य हैं वे जीव जिनका परोक्ष या अपरोक्ष रूप से दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज से सम्बन्ध रहा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### दिमाग की शक्ती

काम जिसे आप समझते है कि करने से आप का जीवन बेहतरीन बनेगा, उसे एक साल तक लगातार करें। ऐसा करने से वह काम आप की आदत बन जाएगा। आप चाहते है, परमात्मा के प्यार की अनुभुति होती रहे। परमात्मा आप प्यार के सागर है इस गुण का एक साल तक सिमरन करते रहे तथा भगवान का बिंदू रूप या इष्ट को मन में देखते भी रहें।

जब भी परमात्मा की याद आए एक साल तक इसी गुण को मन में दोहराते रहें। खाना खाते, पढ़ते, लिखते, मुरली सुनते या साधना में जब भी बैठें बस यही सिमरन करना है भगवान आप प्यार के सागर है। इस दौरन कोई भूल हो जाए तो पछतावा नहीं करना बस तुरंत कहना है भगवान आप प्यार के सागर है। जरा भी गलती हो जाए मन से या तन से तो तुरंत दूसरे लोगों की मन से सेवा करो। अडोसी पड़ोसी या विश्व के दूसरे लोगों को मन में सामने देखें और कहें आप स्नेही हैं स्नेही हैं और भगवान आप प्यार के सागर हैं। एक साल बाद आप के मन से अपने आप निकलता रहेगा भगवान आप प्यार के सागर हैं। आप अपनी मंजिल तो रातोंरात प्राप्त नहीं कर सकते। लेकिन अपनी मंजिल तय करने की दिशा तो रातो रात बदल सकते हैं। भगवान को याद करना और दूसरों को मन से प्यार की तरंगे देना आप के जीवन की सही दिशा है। दिमाग का विकास और लीक लोगोंने ही लीक पर चलने की प्रवृति है। जिसे हम लकीर का फकीर कहते हैं। लकीर अर्थात एक आसान ढर्रे में जिसे हम परंपरा, रीति रिवाज, कुल की मर्यादा, धार्मिक मर्यादा, समाज की मर्यादा कहते हैं। अति साधारण भाषा में इसे हम आज्ञा कहते हैं। परिवार का मुखिया, समाज का मुखिया, धर्म का मुखिया जो कहता है उसे ही हमें मानना है और उसी अनुसार चलना है। यही लकीर का फकीर है। बस लकीर के नाम पर जिंदगी गुजरने लगती है। यह प्रक्रिया मरते दम तक कभी खत्म नहीं होती। युगों से हम लकीर पर चलते आ रहे हैं जिस से हमारे जीवन का विकास नहीं हुआ। विकास रुक गया है। लीक के नाम पर बड़ी मछली छोटी मछली को खा रही है। मर्यादा रूपी लीक के नाम पर पति पत्नी का शोषण कर रहा है, विभागाध्यक्ष अपने कर्मचारियों का शोषण कर रहा है, धर्म प्रमुख अपने शिष्यों का शोषण कर रहा है और राजा सविधान के नाम पर प्रजा का शोषण कर रहा है। अगर आप शारीरिक या मानसिक या आध्यात्मिक विकास करना चाहते हैं तो अपने को लीक में न फंसने दें। यह उम्मीद नहीं करनी चाहिए कि लीक पर चलते चलते आप का विकास अपने आप हो जाएगा। यह गांठ बांध लो कि विकास अपने आप नहीं होता और न ही कोई दुसरा आप के विकास के बारे सोचेगा। आप को अपने विकास के लिये खुद ही कोशिश करनी होगी। आप अपने को कणाद ऋषि समझो। कणाद ऋषि जमीन पर गिरे हुए दाने चुग कर खाने का प्रबंध करता था क्योंकि उसका राजा धोर विरोधी था। उस महान ऋषि ने ही विश्व को एटम बॉम्ब की थ्योरी दी। हमारा मानसिक विकास न होने के बड़े कारण नहीं हैं, हमारे छोटे छोटे विचार हैं। हम प्रायः सोचते हैं मेरा विकास अपने आप हो जाएगा, जब तक जिंदा हैं, बस हर रोज मुरली सुनते रहो, मन्दिर या गुरुद्वारे में माथा टेकते रहो। मुझे पता नहीं कि मेरा विकास कैसे होगा। यह सही समय नहीं हैं। मैं गलती से डरता हूं। करो तो सही करो, परंतु गलती नहीं होनी चाहिए। इस काम को करने का मन नहीं होता। दूसरे लोग मेरे से बेहतरीन हैं। मैने सोचा था कि यह आसान होगा, परंतु यहां तो मरना पड़ता है। इन विचारों को बदलने की योजना बनाए।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

## नवजात बालकाची परिचर्या

आईच्या उदरातून जन्म घेताना बाळ थकलेले असते; त्यामुळे त्याचा वातप्रकोप होतो. बलायुक्त बेबी ऑईल अंगाला लावून सुगंधित औषधीद्रव्याने अंघोळ केल्यामुळे वातशमनाचे काम चांगले होते व बाळाला आलेला थकवा जाऊन बाळाला झोप देखील चांगली येते. अंघोळ झाल्यानंतर बाळाला कोरड्या सुती कापडाने हलकेसे पुसून मऊ, सुती, सैल झबली घालावात लस टोचणे :

बाळाचा जन्म प्रसूतिगृहात झाला असेल, तर घरी जाण्यापूर्वी बाळाला बी. सी. जी व पोलिओ हे डोस द्यावेत. बी. सी. जी. लस खांद्यावर देत असतात. एक महिन्यात त्या जागी फोड आला नाही, तर परत ही लस टोचून घ्यावी. बी. सी. जी. ही लस जन्मापासून ते १ महिन्याच्या कालावधीत द्यावी. पोलिओची लस ही तोंडावाटे २ थेंब देतात. पोलिओची लस दिल्यानंतर अर्धा तास बाळाला स्तनपान करू नये. बाळ १ महिन्याचे झाल्यानंतर त्याला डी.पी.टी. व पोलिओ ही लस द्यावी. प्रत्येक महिन्याच्या अंतराने असे ३ महिने डी.पी.टी. व पोलिओ लस द्यावी. लसीकरणामुळे बाळामध्ये क्षयरोग, पोलिओ, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात या रोगांविरुद्ध लढण्याची प्रतिकारशक्ती निर्माण होते. अशा वेळेला डॉक्टरांच्या सल्ल्याने बाळाला ताप आल्यानंतर कोणते औषध द्यावे हे लिहून घ्यावे. आईच्या उदरातून आईच्या उदरातून ... नऊ महिन्याचे झाल्यावर गोवर द्यावी. बाळ दीड ते दोन वर्षांचे झाल्यावर डी.पी.टी. व पोलिओचा बुस्टर डोस द्यावा. डोस दिल्याने वरील सर्व लसी बाळाला द्याव्यात. बाळ जर आजारी असेल, तर आजार काळात वरील लसी देऊ नये. लसीकरणाच्या वेळापत्रकात ७ ते ८ दिवसांचा फरक चालेल पण बाळ आजारातून बरे झाल्यावर ७ ते ८ दिवसांनी लस द्यावी. सध्या मेंदूज्वर, टायफॉईड, कांजण्या (Chicken - Pox), कावीळ यांच्याही लसी उपलब्ध आहेत. त्यांच्याबद्दल डॉक्टरांकडे माहिती विचारून लसीकरण करून घ्यावे. तसेच डी.पी.टी., कावीळ व मेंदूज्वर यांची एकत्र लस देखील बाजारात उपलब्ध आहे. या लसीमुळे बाळाला वारंवार टोचावे लागत नाही; म्हणून डॉक्टरांना या लसीबद्दलची माहिती विचारावी.

**स्तनपान :** बाळाच्या विकासासाठी शारीरिक, बौद्धिकवाढीसाठी मातेचेदूधश्रेष्ठअसते; म्हणूनमातेने दुसरे कुठलेही दूध न पाजता स्वतःचेच दूध बाळाला पाजावे. जन्मानंतर बाळाची अंघोळ झाल्यावर पूर्व दिशेला तोंड करून प्रसन्न मनाने स्तनपान करावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**


दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# धम्माल मनोरंजन

## मनोरंजक शब्दकोडे

**आडवे संकेत**

१) दु:खीतांचा आक्रोश
५) ज्या भूमिकेत काम करीत आहे अशांची ओळख करुन देणे
८) टवाळखोर, टोणगा
१०) किनारा ११) श्रीकृष्ण
१४) राजाचे घर १६) जाफरी (कलाकार)
१८) श्री विष्णू १९) अरुंद मार्गावरुन जात असताना दुसऱ्यास जाण्याकरीता दिलेली जागा २३) ओळख, कृतज्ञता
२५) राजीव कपूर व मंदाकिनी यांचा गाजलेला चित्रपट
२६) नवीन २७) लग्नाची पत्नी
२९) पाठीवर उठलेला माराचा गळू ३०) एक मानवी पदवी
३२) गोड, मधूर
३३) शतृघ्न सिन्हाचा डबल रोल असलेला एक चित्रपट
३५) वक्रतुंड महाकाय समप्रभ ३७) आवळा (हिं.)
३८) पावसाचे थेंब पडण्याचा आवाज ३९) चरबी, वंश
४२) वडील बहिण ४३) ठरावपत्र
४६) नऊ अठरा
४८) जोखीम, जिम्मा
४९) एक हिंदी चित्रपट
५०) आठवड्यातील एक दिवस



**उभे संकेत**

१) नेसावयाचे उची रेशमी वस्त्र २) श्रीमंत, ख्यातनाम
३) धोका ४) पती
५) सणाचा दुसरा दिवस
६) पद्धतशीर
७) अंथरी, हतरी
९) मधुर आवाज
१२) मुसलमानी प्रार्थना
१३) पाऊस पडे सारखा यमुनेला ही पुर.
१५) जाल, खेळण्याची पाळी १७) ये-जा
२०) छाया२१) शुभ्र वर्णाची
२२) निरुपयोगी वस्तू
२३) हिंस्त्र पशु
२४) लोकांचे शासन
२५) निशा, रजनी
२८) कुश
३१) पर्यटन करणारे
३३) गेरु, तांबळी माती
३४) कलावतीची आई
३५) धान्य पाखडावयाचे साधन ३६) नव्वद अंशाचे ठिकाण
३७) पूर्वीचे आपण
३८) शंभराचा एक भाग, पैसा ४०) साष्टांग नमस्कार विनंती विशेष
४१) वाईट वर्तन
४२) अमंगळ, बीभत्स
४४) निशा ४५) गोमा
४७) गोसाव्याजवळची आगटी



## सु विचार

दुसऱ्यांची अंतःकरणे उघडण्याची किल्ली म्हणजे सहानुभूती.

तात्पर्य: दुसऱ्याच्या सुख- दुःखांत मनापासून सहभागी होणे, म्हणजे सहानुभूती दुसऱ्याच्या आनंदात आपणही आनंद मानला आणि दुसऱ्याच्या दुःखाच्या वेळी त्याची विचारपूस करुन त्याला योग्य ती मदत केली, तर दुसऱ्या माणसाचा आपल्यावर विश्वास बसतो आणि ती माणसे आपल्याशी मनमोकळेपणाने वागतात.

## दिनविशेष २४जानेवारी२०२५

१९२४: तत्त्वचिंतक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे यांचा जन्म. (मृत्यू: २८ डिसेंबर २००० - मुंबई)

* १९२४: मराठी व हिन्दी चित्रपट अभिनेत्री रतन साळगावकर ऊर्फ हंसा वाडकर यांचा जन्म. (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७१)

*१९४३: हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक सुभाष घई यांचा जन्म.

*१९५३: दक्षिण कोरिया देशाचे १९वे राष्ट्राध्यक्ष - मून जे-इन

*१९४१: इस्त्रायली रसायनशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पुरस्कार - डॅन शेटमन

*१९४०: जर्मनी देशाचे ११वे अध्यक्ष - जोकिम गौक

*१९२४: बिहारचे ११वे मुख्यमंत्री - कापुरी ठाकूर (मृत्यू : १७ फेब्रुवारी १९८८)

*१९२४: मराठी हिंदी चित्रपट अभिनेत्री - हंसा वाडकर (मृत्यू : २३ ऑगस्ट १९७१)

*१९१६: व्हेनेझुएला देशाचे ६५वे राष्ट्राध्यक्ष - राफेल कॅल्डेरा (मृत्यू : २४ डिसेंबर २००९)

*१९०७: फ्रान्स देशाचे पंतप्रधान - मॉरिस कुवे डी मुरविले (मृत्यू : २४ डिसेंबर १९९९)

*१७१२: प्रशिया देशाचे राजा - फ्रेडरिक द ग्रेट (मृत्यू : १७ ऑगस्ट १७८६)

*७६: रोमन सम्राट - हॅड्रियन (मृत्यू : १० जुलै ०१३८)

२४ जानेवारी मृत्यू

*संपूर्ण दिनविशेष दिनदर्शिका: येथे क्लिक करा आणि लगेच डाऊनलोड करा आपल्या मोबाईल / कॉम्पुटर मध्ये. (७५% उळीलॅपीं)

*१९६५: दुसर्या महायुद्धकाळातील ब्रिटनचे पंतप्रधान, साहित्यिक, वृत्तपत्रकार, थोर राजकारणी आणि नोबेल पारितोषिक विजेते विन्स्टन चर्चिल यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १८७४)

*१९६६: एअर इंडियाचे कांचनगंगा हे विमान युरोपातील आल्प्स पर्वतात कोसळुन भारतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा मृत्यूमुखी पडले. (जन्म: ३० ऑक्टोबर १९०९)

*२००५: गोवा मुक्तिसंग्राम अनुताई लिमये यांचे निधन.

*२०११: शास्त्रीय गायक स्वरभास्कर पण्डित भीमसेन जोशी यांचे निधन. (जन्म: ४ फेब्रुवारी १९२२)

*२००८: बर्मीमध्ये जन्मलेल्या भारताच्या पहिल्या महिला - उषा नारायणन

*१९८२: बोलिव्हिया देशाचे ५६वे राष्ट्राध्यक्ष - अल्फ्रेडो ओवांडो कँडिया (जन्म: ६ एप्रिल १९१८)

*१९७१: अल्कोहोलिक्स एनोनिमसचे सह-संस्थापक, अमेरिकन कार्यकर्ते - बिल डब्ल्यू. (जन्म: २६ नोव्हेंबर १८९५)

*१९३९: स्विस चिकित्सक, मुस्लीचे निर्माते - मॅक्सिमिलियन बिर्चर-बेंनेर (जन्म: २२ ऑगस्ट १८६७)

*१९१९: अल्बेनिया देशाचे पहिले पंतप्रधान - इस्माईल क्यूम्ली (जन्म: १६ ऑक्टोबर १८४४)

*१८७२: रग्बी फुटबॉलचे निर्माते - विल्यम वेबल एलिस (जन्म: २४ नोव्हेंबर १८०६)

* ४१: रोमन सम्राट - कॅलिगुला (जन्म: ३१ ऑगस्ट ००१२ इ.स.पू.)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब | द | क | | गो | रा | गो | म | टा | | रो | ह | न |
| ळ | | म | म | ता | | र | ज | | ना | ग | री | क |
| वं | | ता | क | | रा | ज | कु | मा | र | | चा | ला |
| त | ब | क | डी | | | मु | र | ळ | | इ | ला | का |
| | न | द | | | स | हु | | | हि | ट | ल | र |
| अ | वा | | प | रा | व | र्त | न | | | बं | | |
| भ | री | त | | त | ण | | मा | ल | जा | दी | | अ |
| य | | | | बि | | आ | ज | व | र | | वि | श्व |
| | पो | थी | पु | रा | ण | | | क | | ग | ळी | त |
| | त | | रा | त | | अ | म | र | प्रे | म | | था |
| अ | दा | व | त | | | भि | ती | | म | | ज | मा |
| भ | र | क | न | | भा | मा | | ग | रो | द | र | |
| द्र | | ट | | सा | व | न | | न | ग | र | | |

### फळ व आरोग्य

**सीताफळ**

उष्णतेचा त्रास कमी करण्यासाठी सीताफळ हे उत्तम फळ आहे. शरद ऋतुत पित्ताचा त्रास होतो. अशा वेळी दुपारी उन्हाचा भर असताना एक सीताफळ खावे. वेल्डिंग लागते, बॉयलरजवळ काम करणाऱ्यांना उष्णतेची झळ लागते. लोहारकाम करणाऱ्यांनाही अग्नीजवळ बसूनच काम करावे लागते. अशा लोकांच्या घशाला कोरड पडते. सतत तहान लागणे, डोळे लाल होणे असे प्रकार नेहमी घडतात. शरीरा उष्णताही वाढते. अशा वेळी दररोज एकतरी सीताफळ खाणे आवश्यक आहे. सीताफळ खूप खंड आहे, मांसपेशींची जोपासना करणारे आहे, त्यामुळे उष्णता आणि उष्णतेची मांसपेशींना झळ लागणल्यास सीताफळ म्हणजे सुरुच्या बागेतील जणु गारवाच!

### म्हणी व अर्थ


**उडत्या पक्षाची पिसे मोजणे.**

**अर्थ:** अगदी सहज चालता- चालता एखाद्या गोष्टीचे परीक्षण करणे.

### विनोद

चिंतोपंत ऑफिसात शिरायचे, पिशवीतलं वृत्तपत्र काढायचे आणि रासवार प्रत्येकाचं भविष्य वाचून दाखवायचे. एकदा मेहंदळेसाहेब म्हणाले, पंत, रोज तुम्ही सर्वांची भविष्यं सांगता. तुमचा या भविष्यावर खरचं विश्वास आहे? चिंतापंत गभीरपणे उत्तरले, 'मुळीच नाही. साहेब, मी भविष्यावर विश्वास ठेवेनच कसा? माझी रास आहे मिथुन. मिथुन रास म्हणजे संशयी स्वभाव. या राशीच्या लोकांचा स्वतःवर विश्वास नसतो, त्यांचा भविष्यावर कुठून विश्वास असणार?'

## मनोरंजक शब्दकोडे



**आडवे संकेत**

१) फणिवर वंदना। सरळ सोंड वक्र तुंड त्रिनयना.....
८) ठीक! समजले! पुरें! पुढे!९) उष्ण१०) दृढ आलिंगनपूर्वक, आवेशाने १२) गोंद ठेवण्याचे पात्र १३) एक धान्य१४) एक हिंस्त्र पशू १५) पुन्हा आणखी तेच तेच १७) प्रभू, देव १९) जाडीभरडी एक प्रकारची रवेदार मिठाई २२) कोरा २४) बाण२५) अंदाजे वेळ, मर्यादा२७) एक पैशाचे नाणे २९) विष्णूच्या वंशापासून उत्पन्न झालेले दोन ऋषी
३१) धरती
३३) हे दाबले की तोंड उघडते
३४) निर्बुद्ध, कोरडा,पाणीविरहीत

**उभे संकेत**

१) मुलींचा एक खेळ २) एक आडनाव३) ताकदवान, शक्तिदायक
४) उत्पन्न झालेले धान्य ५) अभिनयपूर्वक नृत्य,शिवनृत्य
६) मुसलमानांचा एक सण ७) रडणे
११) खाटेला विणण्याचा कापडी पट्टा
१६) निघुन जाणे, पळून जाणे १८) माणसाच्या विष्टेचे खत
१९) कसल्या प्रकारचा
२०) तबल्याची वादी, लहान खडा २१) प्राण जाताना होणाऱ्या तीव्र वेदना २३) ऊसाचे पीक, रिकामपण २५) मद्य, मोठी सुरी २६) पत्राचा सुरुवातीचा मजकुर २८) गवत उगवलेले मैदान ३०) माडफळ ३२) एक संख्या

**मागील उत्तर**


| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सौ | | र | | कु | मा | र | सा | नु | |
| त | | स | क | ल | | ज | | | सा |
| न | र | का | सु | र | | नि | शि | गं | धा |
| | क | पू | र | | द | श | क | | र |
| | ना | री | | गु | | | व | र | ण |
| सं | | | | पि | ळ | व | णू | क | |
| त | न्हा | | पु | त | | | क | मा | ल |
| | | पे | रु | | भा | | | ला | ख |
| क | पि | ला | ष | ष्टी | चा | यो | ग | | न |

## फिल्मी शब्दकोडे

**आडवे संकेत**

१) कुछ तो है इस फिल्म का नायक.
४) सन् १९९५ में राजीव मेहरा के निर्देशन में बनी इस फिल्म में विवेक मुश्रान, जुही चावला और शाहरुख खान थे.
५) सन् २००२ में निर्देशक अब्बास मस्तान की इस फिल्म में बॉबी देओल, अमिषा पटेल और अक्षय खन्ना थे.
६) माया (फिल्म)
९) की सहेली (फिल्म)
११) गोरी है कलाईयां तू ला दे मुझे हरी हरी चुडीयां... यह गीत इस फिल्म का है.
१३) सन् १९८३ में बनी फिल्म सदमा का नायक.
१५) मेहरा (नायक)
१६) तन (फिल्म)
१८) सन् १९९६ में बनी फिल्म बेकाबू की हिरोईन. (सिर्फ नाम)
१९) जोहर (निर्देशक)
२२) जिस्म इस फिल्म की नायीका.
२३) सन् १९८८ में बनी फिल्म पाप की दुनिया की नायीका.
२७) पापी पेट का है (फिल्म)
२८) की ताकत (फिल्म)
३०) सन् १९९४ में हैरी बावेजा के निर्देशन में बनी इस फिल्म में अजय देवगन, रविना टंडन और सुनील शेट्टी थे.
३२) फिल्म लगान के निर्देशक.






**उभे संकेत**

१) रितेश देशमुख, जेनेलिया, असरानी और शक्ती कपूर अभिनीत फिल्म.
२) सन् १९९८ में निर्माता निर्देशक विधू विनोद चोपडा की इस फिल्म में बॉबी देओल और नेहा थे.
३) इस फिल्म में अमिताभ बच्चन, विनोद खन्ना और ऋषी कपूर थे.
४) सन् २००२ में बनी इस फिल्म में डिनो मारीया और बिपाशा बासू थे.
७) फिल्म गुप्त में बॉबी देओल का नाम.
८) सन् १९९६ में डेविड धवन के निर्देशन में बनी इस फिल्म में गोविंदा, तब्बू और करिश्मा कपूर थे. १०) मिथून चक्रवर्ती, रंभा, मौसमी चटर्जी और कादर खान अभिनीत एक फिल्म.
११) पास (फिल्म)
१२) निश्चल (नायक)
१४) सन् १९८८ में निर्माता निर्देशक कीर्ती कुमार की इस फिल्म में गोविंदा, निलम और अनुपम खेर थे. १७) करीना कपूर के अभिनेता पिता. (सिर्फ नाम) २०) एक मशहुर गायीका.
२१) पैदा करनेवाले की (फिल्म)
२२) हेमंत (नायक)
२४) जैकी श्रॉफ, मनिषा कोईराला, अनिल कपूर, महिमा चौधरी, माधूरी दीक्षीत, रेखा और अजय देवगन अभिनीत फिल्म.
२५) कौन कौन झूठा (फिल्म)
२६) सन् १९९० में बनी फिल्म सैलाब का हिरो. (सिर्फ नाम)
२८) सन् १९९९ में निर्माता निर्देशक ज्योतीन गोयल की इस फिल्म में संजय दत्त और जुही चावला थे.
२९) सन् १९८९ में निर्देशक के. विश्वनाथ की इस फिल्म में अनिल कपूर और विजया शांती थे.
३१) ये रहा (फिल्म)

## रुचिदा — कॉर्न डोसा



**साहित्य** : तीन मध्यम मक्याची कोवळी कणसे, दोन वाट्या बारीक रवा, २-३ हिरव्या मिरच्या, थोडी कोथिंबीर, चवीनुसार मीठ, चिमूटभर साखर, तेल.

**कृती** : प्रथम सुरीने कणसाचे दाणे काढावेत. नंतर मिक्सरमध्ये कणसाचे दाणे व हिरव्या मिरच्या, कोथिंबीर बारीक करून घ्यावे. मिश्रण एकदम बारीक करावे. नंतर रव्यात कणसाचे मिश्रण एकत्र करुन लागेल तसे पाणी वापरावे. साधारण ३ ते ४ तास अगोदर पीठ तयार करावे. थंडीच्या दिवसा ५-६ तास अगोदर पीठ तयार करावे. नंतर निर्लेप तव्यावर पातळ डोसा घालून गरमागरम डोसे चटणीबरोबर सर्व्ह करावेत



### मागील फिल्मी कोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुं | ब | ई | से | आ | या | मे | रा | दो | स्त | | दि | ल |
| | स | | | प | | | | मु | | | व्या | |
| | इ | ज्ञ | त | की | रो | टी | | सा | व | न | भा | दो |
| जी | त | | | क | | | र | फ़ी | | | र | |
| | ना | | य | स | बॉ | स | | र | वी | | ती | न |
| सं | सा | र | | म | | न | या | | र | | | ज |
| | ख्वा | ब | | | | म | | ई | | ब | हा | र |
| | ब | | जा | | जि | ते | है | शा | न | से | | के |
| ये | है | ज | ल | वा | | री | | दे | | रा | ज | |
| दि | | | | र | क्ष | क | | ओ | | | ह | त्या |
| ल | | जु | बै | दा | | स | ली | ल | चौ | ध | री | |
| गी | | ड | | त | | म | | | रा | | ले | |
| | दि | वा | ने | | क्या | | फि | ल | हा | ल | | |



वंजार गल्लीत सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामाचा शुभारंभ करताना शिवसेना शहरप्रमुख सचिन जाधव.

# कामाचे नियोजन करुन प्रभागातील मुलभूत प्रश्न सोडविण्याचे कार्य सुरु

### सचिन जाधव यांचे प्रतिपादन; वंजार गल्लीत सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामाचा शुभारंभ

नगर – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकास खाते असताना शहराला मिळालेल्या भरघोस निधीतून आजही विकास कामे सुरु आहेत. या निधीतील २ कोटी प्रभागातील विकास कामांसाठी खर्च करण्यात आला. कामाचे नियोजन करुन प्रभागातील सर्व मुलभूत प्रश्न सोडविण्याचे कार्य सातत्याने सुरु असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे शहर प्रमुख सचिन जाधव यांनी केले.

माजी नगरसेविका अश्विनी जाधव यांच्या प्रयत्नाने प्रभाग क्रमांक १० मधील वंजार गल्ली येथे सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी सचिन जाधव बोलत होते. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सुनिल क्षेत्रे, निसार जहागीरदार, सचिन पुप्पाल, इमरान शेख, बाळू पुप्पाल, अमिर खान, नीता कनोजिया, प्रशांत शिंदे, फरहान जहागीरदार, संगीता ससे, जुबेर शेख आदी उपस्थित होते.

पुढे जाधव म्हणाले की, प्रभागातील ड्रेनेज लाईन, पाण्याची लाईन व नंतर काँक्रिटीकरणाचा प्रश्न सोडविण्यात आलेला आहे. नागरिकांचा पैसा वाया जाणार नाही या दृष्टिकोनाने नियोजनात्मक काम प्रभागात सुरू आहे. अश्विनी जाधव यांच्या माध्यमातून प्रभागातील मुलभूत प्रश्न सोडविण्याचे काम सातत्याने सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुनिल क्षेत्रे म्हणाले की, स्थायी समितीच्या कार्यकाळात सचिन जाधव यांनी प्रभागातील विविध प्रश्न मार्गी लावले. समाज मंदिर पासून ते रस्त्याचे काम त्यांनी प्रामुख्याने करुन नागरिकांना सोयी–सुविधा निर्माण करुन देण्याचे काम त्यांनी केले असल्याचे सांगितले.

निसार जहागीरदार म्हणाले की, उत्कृष्ट नियोजन पद्धतीने सर्व प्रभागाचे काम करण्यात आलेले आहे. सामाजिक कार्यात योगदान देऊन जाधव दांम्पत्यांचे नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचे काम सुरु आहे.

बारा इमाम येथे काँक्रिटीकरण करून देण्याचे काम देखील त्यांच्या माध्यमातून झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# लिनेसच्या गोदातरंग मधील उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या महिला पदाधिकाऱ्यांचा गौरव

नगर – ऑल इंडिया लिनेस क्लब अंतर्गत एमएच ३ गोदातरंग मधील उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या क्लबच्या पीएसटी प्रेसिडेंट, सेक्रेटरी, ट्रेझरर व कॅबिनेट ऑफिसर यांचा गौरव करण्यात आला. लिनेस क्लबच्या माध्यमातून सामाजिक कार्यासाठी एकत्र आलेल्या महिलांचा हळदी–कुंकूचा कार्यक्रम देखील रंगला होता. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपणासाठी महिलांना वाण म्हणून रोप देण्यात आले. या डिस्ट्रिक्ट क्लब मध्ये १५ क्लब असून, ७२ अवॉर्ड देण्यात आले.



लिनेसच्या गोदातरंग मधील उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या महिला पदाधिकाऱ्यांचा पर्यावरण संवर्धनासाठी हळदी–कुंकूच्या कार्यक्रमात महिलांना रोपांचे वाण देवून गौरव करण्यात आला.

### पर्यावरण संवर्धनासाठी हळदी–कुंकूच्या कार्यक्रमात महिलांना रोपांचे वाण

हॉटेल संजोग लॉन्स येथे झालेल्या विराझी कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून चार्टर्ड बहुप्रांतीय अध्यक्षा डॉ. वर्षाताई झंवर, माजी बहुप्रांतीय अध्यक्षा अंजलीताई विसपुते, गोदातरंगच्या प्रांताध्यक्षा लतिकाताई पवार, माजी प्रांत अध्यक्षा छायाताई राजपूत, सचिव अमल ससे, खजिनदार जया भोकरे, हेमा गिरधानी आदी उपस्थित होत्या.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी गणेश वंदना सादर करण्यात आली.

प्रास्ताविकात लतिकाताई पवार म्हणाल्या की, सर्व महिलांनी एकत्र येऊन लिनेसच्या माध्यमातून सेवाकार्याची ज्योत प्रज्वलीत केली आहे. गरजूंना आधार देऊन समाजातील अंधकार दूर करण्याचे काम ही ज्योत करणार आहे. लिनेसच्या माध्यमातून सर्व गरजू व आर्थिक दुर्बल घटकांना आधार देण्याचे काम सुरु आहे. समाजकार्याबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठी व गरजू घटकातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महिलांनी उभे केलेले सामाजिक कार्य क्रांतीचे पाऊल आहे. त्यांनी उभे केलेले सामाजिक कार्य छोटे नसून, हे परिवर्तनाची नांदी ठरणार आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून देखील महिलांचे सक्षमीकरण होत असताना, सामाजिक कार्यासाठी पुढे आलेल्या सक्षम महिलांच्या माध्यमातून इतर महिलांना आधार मिळणार आहे. आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी महिला सशक्तीकरणाची गरज असून, या दिशेने राज्यसरकारचे पाऊन लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून पडले आहे. छोट्या–छोट्या सामाजिक कार्यातून मोठे कार्य घडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. वर्षाताई झंवर म्हणाल्या की, वंचितांच्या सेवेतच जीवनाचे खरे समाधान दडले आहे. सेवेतून जीवनात आनंद निर्माण होतो. या समाज कार्यात मोठ्या संख्येने महिलांना जोडून परिवर्तनाच्या दिशेने कार्य सुरु आहे. वंचितांना आधार देण्याच्या उद्देशाने विविध सामाजिक उपक्रम सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. तर उत्कृष्ट कार्याने सन्मान झालेल्या क्लबच्या महिलांचे त्यांनी अभिनंदन केले.

खजुराव येथे झालेल्या ऑल इंडिया समर्पण कॉन्फरन्समध्ये व नागपूर येथील भंडारा सन्मान सोहळ्यात उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष म्हणून लतिकाताई पवार यांना अवॉर्ड मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन नीलम परदेशी यांनी केले. आभार जयाताई भोकरे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कनोजिया परदेशी धोबी समाज सेवा मंडळाच्यावतीने हळदी–कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात

नगर – कनोजिया परदेशी धोबी समाज सेवा मंडल, भिंगार, अहमदनगर यांच्यावतीने हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये कनोजिया परदेशी धोबी समाज मंडळाच्या निलम कनोजिया, शोभा कनोजिया, मंजुला कनोजिया, रेणुका कनोजिया, राधा कनोजिया, अरुणा कनोजिया, माया परदेशी, हिरालाल परदेशी, रवि कनोजिया, राजेश परदेशी, राकेश परदेशी, उपाध्यक्ष राजेन्द्र कनोजिया, सचिव गोविंद कनोजिया, खजिनदार कुंदन परदेशी, सदस्य ठाकुरदास परदेशी, दिनेश चौधरी, महिला उपस्थित होत्या.



कनोजिया परदेशी धोबी समाज सेवा मंडल, भिंगार, अहमदनगर यांच्यावतीने हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित महिला भगिनी (छाया – समीर मन्यार)

समाजाच्या वतीने वेळोवेळी सामाजिक उपक्रम राबवले जातात समाजातील सदस्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून वर्षातून एकदा मकर संक्रांति निमित्त समाजाच्या वतीने समाजातील महिलांनी एकत्र यावे विचारांची देवाणघेवाण व्हावी यासाठी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते अशी माहिती सेवा मंडळाचे अध्यक्ष राजकुमार परदेशी यांनी दिली.

# अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उमेदवारांच्या ऑनलाईन परीक्षा शांततेत व सुरळीत

नगर – अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची विविध श्रेणीतील ७०० जागांसाठी सरळसेवा नोकरभरती अंतर्गत मे. वर्कवेल इन्फोटेक प्रा.लि., पुणे या एजन्सीमार्फत पुणे येथील वाघोली, कोंढवा, बिबवेवाडी व लोणी काळभोर या परिसरातील परिक्षा केंद्रांवर ९,१०,११,१२,१३ व १९.१.२०२५ या तारखांना उमेदवारांच्या ऑनलाईन परीक्षा शांततेत व सुरळीत पार पडल्या असल्याची माहिती बँकेचे सरव्यवस्थापक जयंत देशमुख यांनी दिली.

याबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, परीक्षा केंद्रावर व्हिडीओ शुटींगसह उमेदवारांच्या योग्य त्या तपासण्या करून परिक्षा हॉल मध्ये सी.सी. टीव्ही. बसविण्यात आले होते. सी.सी.टीव्ही सर्व्हेईलन्समध्ये ही परिक्षा घेण्यात आली. एकूण २८२१९ उमेदवारांपैकी १६८७९ उमेदवारांनी परिक्षा दिली. या परिक्षेनंतर दिनांक २०.१.२०२५ पासुन मे. वर्कवेल इन्फोटेक प्रा.लि., पुणे या एजन्सीमार्फत प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका उमेदवाराच्या लॉग ईन आय. डी. वर देण्यात आल्याची माहिती ही श्री. देशमुख यांनी दिली. उत्तरतालिकेसंदर्भात उमेदवारांच्या काही हरकती असल्यास, उमेदवारांनी २५.१.२०२५ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात पुराव्यासह समक्ष हरकती नोंदविणेबाबतही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती सरव्यवस्थापक यांनी दिली.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील ४१ परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नगर – महाराष्ट्र गट–ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा–२०२४ चे २ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत जिल्ह्यातील ४१ उपकेंद्रांवर आयोजन करण्यात आले आहे. परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये सकाळी ७ ते सायंकाळी ४ या वेळेत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामधील सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी. आय.एस.डी, फॅक्स केंद्र, ध्वनीक्षेपक, झेरॉक्स मशिन, स्कॅनिंग मशिन, मोबाईल फोन व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वस्तु कार्यान्वित ठेवण्यात येऊ नयेत. परीक्षा उपकेंद्राच्या परिघामध्ये परिक्षार्थी म्हणून घोषित केलेले उमेदवार व परीक्षा पार पाडण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीशिवाय इतर व्यक्तींना वाहनांने अथवा पायी फिरण्यास, उभे राहण्यास प्रतिबंध करण्यात आला असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# नोकरीत एकनिष्ठपणा महत्वाचा : किशोर पंधारे

नगर – विद्यार्थ्यांनी आपल्या नोकरीमध्ये एकनिष्ठपणा व प्रामाणिकपणा जपला तर निश्चितच त्यांच्यावर कंपनीतर्फे महत्त्वाची जबाबदारी टाकली जाते व त्यातूनच त्याची प्रगती होते. हे मी माझ्या स्वतःच्या अनुभवातून सांगतोय असे प्रतिपादन लोकेश मशीन्स लिमिटेड, पुणे चे मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर पंधारे यांनी भाषणात केले. देवांग कोष्टी समाजसेवा मंडळ, अहमदनगरचा ४५ वा 'विद्यार्थी कल्याण प्रतिष्ठान'चा कार्यक्रम नुकताच पार पडला त्यावेळेस ते बोलत होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पुणे येथील राजेश रमेश भागवत व कोल्हार येथील डॉ. बद्रीप्रसाद धोंडीराम महामिने यांनीही मार्गदर्शन करत यशस्वी जीवनाचा मूलमंत्र सांगितला. सावेडी येथील श्री चौंडेश्वरी शैक्षणिक संकुलात हा पारितोषिक वितरण व हळदीकुंकू सोहळा पार पडला. अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना या कार्यक्रमामध्ये बक्षीसे देण्यात आली. त्याचप्रमाणे गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदतही देण्यात आली. समाजातील गरजवंताना वैद्यकीय मदत सुद्धा देण्यात आली.



देवांग कोष्टी समाजसेवा मंडळ, अहमदनगरचा ४५ वा 'विद्यार्थी कल्याण प्रतिष्ठान'चा कार्यक्रम नुकताच पार पडला.

समाजातील विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या समाज बांधवांचा ही सत्कार यावेळेस करण्यात आला. त्यामध्ये समाजातील आदर्श उद्योजक पुरस्कार विजेते सुरज दत्तात्रय वाडेकर, लायन्स क्लब छत्रपती संभाजीनगरच्या नूतन अध्यक्षा नूतन सोमनाथ धिमते, लागोपाठ २ कवितासंग्रह प्रसिद्ध केलेल्या उषा सत्येंद्र वराडे, युवा कृषी शास्त्रज्ञ पारितोषिक विजेते निलेश रत्नाकर बिबवे, नुकतीच नोटरीपदी नियुक्त झालेले अमित विजय राशिनकर, एमएस पदवी प्राप्त केलेल्या डॉ. श्रेया राजेंद्र पंधारे, आदर्श शिक्षिका गौरी संजय बेळे व प्रियंका जयंत भागवत, सरकारी परीक्षेमध्ये प्राविण्य मिळवलेले परेश प्रशांत खराडे, तसेच एचडीएफसी बँकेच्या कृषी विभागात मॅनेजर पदावर पदोन्नती झालेले केतन शैलेंद्र तरवडे या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. जीवन गौरव पुरस्कार अनिता नंदकुमार डाके यांना प्रदान देण्यात आला. कन्यारत्न पुरस्कार दिपाली निलेश निऱ्हाळी यांना देण्यात आला.

सूत्रसंचालन सुषमा अरविंद भागवत, निलेश मंचरकर व सायली खराडे यांनी केले. दिपक डावरे यांनी आभार मानले. सुधाकर पडवळ यांनी पसायदान म्हणत कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. दत्ता पोंदे, शैलेंद्र तरवडे, निखिल लकारे, सुहास ढुमणे, उदय तरवडे, मिलिंद पंदारे, पद्माकर खराडे तसेच सर्व कार्यकारणी सदस्यांनी प्रयत्न केले.

# शहरातील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात राज्यस्तरीय 'वाचा कौशल्य चित्र वाचन व अध्यापन कौशल्य स्पर्धा' उत्साहात

### राज्यातील कर्णबधिर विद्यार्थ्यांचा सहभाग; शिक्षकांसाठी देखील पार पडली अध्यापन कौशल्य कथन स्पर्धा

नगर – शहरातील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात कै. डॉ. कलाताई जोशी स्मृती करंडक अंतर्गत कर्णबधिर क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय वाचा कौशल्य व चित्रवाचन स्पर्धा उत्साहात पार पडली. तर कर्णबधिर विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या अध्यापकांसाठी अध्यापन कौशल्य कथन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत कर्णबधिर विद्यार्थ्यांसह त्यांना अध्यापनाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यामध्ये राज्यभरातून २२ शाळांनी सहभाग नोंदवला.

सकाळच्या सत्रात स्पर्धेचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. विद्या जोशी व सचिव डॉ. ओजस जोशी यांच्या हस्ते झाले. तर दुपारच्या सत्रात स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमासाठी स्नेहालयाचे संचालक डॉ. गिरीश कुलकर्णी, जि.प. जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी संस्थेच्या डॉ. कलाताई जोशी यांच्या आठवणींना उजाळा दिला. कलाताई यांचे कार्य पाहून सामाजिक कार्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देविदास कोकाटे यांनी कर्णबधीर विद्यार्थ्याच्या शैक्षणीक प्रगतीसाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या स्पर्धेत अजून सहभाग वाढेल यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. ओजस जोशी म्हणाले की, कर्णबधिर विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन न थांबता, त्यांना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. यासाठी पालकांचा सहभाग विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे. या मुलांना वेगळे व्यासपीठ निर्माण करुन त्यांच्या पुनर्वनासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्पर्धेचे परीक्षण सदाशिव पुंडे, विक्रम मुंडे, स्वाती काटकर, प्रियांका दांडेकर यांनी केले. संस्थेच्या प्रगतीचा आढावा विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आरोटे यांनी घेतला. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ विजेत्यांना अनुक्रमे रुपये १००१, ७०१, ५०१, ३०१ रोख रक्कम, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह विद्यार्थ्यांना देण्यात आले. तर विजेत्या शिक्षकांना अनुक्रमे ९९९९, ७७७७, ५५५५ रुपये रोख रक्कम, गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



जानकीबाई आपटे मूक बधिर विद्यालयात राज्यस्तरीय वाचा कौशल्य चित्र वाचन व अध्यापन कौशल्य स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना देशमुख, सुदाम चौधरी यांनी केले. आभार कलाशिक्षक शिवानंद भागरे व सहदेव कर्पे यांनी मानले.

वाचा कौशल्य स्पर्धा – ९ ते १२ वयोगटात प्रथम– तन्मय सागर विटकर (अयोध्या चॅरिटेबल ट्रस्ट पुणे), द्वितीय– ऐश्वर्या नितीन भिसे (हडपसर कर्णबधिर विद्यालय पुणे), तृतीय– रियाज मुलानी (रोटरी कर्णबधिर विद्यालय तिळवणी इचलकरंजी), उत्तेजनार्थ– कृती अर्जुन वावरे (शापरिया कर्णबधिर विद्यालय पालघर).

१२ ते १५ वयोगटात प्रथम– तनिषा प्रवीण गोधळे (बधिर मूक शिक्षण केंद्र पुणे), द्वितीय– वेदांती विठ्ठल करपे (संस्कार विद्यालय बीड), तृतीय– वेदांत विशाल दळवी (इंडियन रेडक्रॉस पुणे), उत्तेजनार्थ– आराध्या रवींद्र बनणे (रोटरी कर्णबधिर विद्यालय इचलकरंजी तिळवणी)

१५ ते १८ वयोगटात प्रथम– दिपाली मच्छिंद्रनाथ जोरवेकर (संग्राम मूकबधिर विद्यालय संगमनेर), द्वितीय– प्राची उद्धव खोमणे (रघुनाथ केले श्रवण विकास विद्यालय धुळे), तृतीय– स्नेहल लक्ष्मण मोहोळे (निवासी मूकबधिर विद्यालय उमरगा), उत्तेजनार्थ– सिद्धी विजय शेलार (जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालय अहिल्यानगर)

चित्र वाचन स्पर्धा – ९ ते १२ वयोगट प्रथम– गहूबाई विभुते (मूकबधिर निवासी शाळा कुर्डूवाडी सोलापूर), द्वितीय– माधुरी राजेंद्र पाटील (रघुनाथ केले वाघ श्रवण विद्यालय धुळे), तृतीय– स्वरांजली सचिन लेंगरे (बधीर मूक शिक्षण केंद्र पुणे), उत्तेजनार्थ– योगेश बिभीषण कुंभार (हनुमंतराव पाटील निवासी मूकबधिर विद्यालय विटा जिल्हा सांगली),

१२ ते १५ वयोगटात प्रथम– अनुष्का धनंजय लकडे (हडपसर कर्णबधिर विद्यालय हडपसर), द्वितीय– प्रांजली लिंबराज भोजने (बधीर मूक विद्यालय बार्शी सोलापूर), तृतीय– मयूर नवनाथ भोंडवे (जानकीबाई आपटे मूक बधिर विद्यालय अहिल्यानगर), उत्तेजनार्थ– चैतन्य शिवाजी खेडकर (लायन्स मूक बधिर विद्यालय व अपंग विद्यालय कोपरगाव),

१५ ते १८ वयोगटात प्रथम– मिताली राजेंद्र धूत (जानकीबाई आपटे मूक बधिर विद्यालय अहिल्यानगर), द्वितीय– श्रावणी सुदर्शन जाधव (हनुमंतराव पाटील निवासी मूक बधिर विद्यालय विटा), तृतीय– कोमल संजय राठोड (बधिर मूक विद्यालय बार्शी), उत्तेजनार्थ– शिवकांता लक्ष्मण पलेलवाड (चिंचवड बधिरमुक विद्यालय निगडी).

अध्यापन कौशल्य कथन स्पर्धा शिक्षक गट – प्रथम – अनिता महेश औटी (बधीर मूक शिक्षण केंद्र पुणे), द्वितीय– अर्चना संभाजी मुतोन्डे ( संग्राम मूक बधिर विद्यालय संगमनेर) व तृतीय– विश्वनाथ महादेव होनमुर्गीकर (तिळवणी कोल्हापूर).

# लोकशाहीचा पाचवा स्तंभ म्हणजे सामाजिक संस्था

## डॉक्टर सुरेश पठारे यांचे प्रतिपादन; शहरात सामाजिक संस्था क्षमता बांधणी कार्यशाळा उत्साहात

नगर – लोकशाहीचा पाचवा स्तंभ म्हणजे सामाजिक संस्था आहे. हा पाचवा स्तंभ मध्यभागी चारही स्तंभांना सम तोल राखण्याचे काम करत आहे. देशाच्या जडणघडणीसाठी सामाजिक स्वयंसेवी संस्थांचा मोठा वाटा आहे. स्वयंसेवी संस्थांनी सकारात्मक सेवाभाव व बांधिलकी टिकवून समाजकार्य करण्याचे आवाहन सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी केले.

ज्ञानरचना सोशल फाउंडेशन, गुरु साई फाउंडेशन, आजीवन अध्ययन, विस्तार विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय सामाजिक संस्था क्षमता बांधणी कार्यशाळेच्या उद्‌घाटनाप्रसंगी डॉ. पठारे अध्यक्षीय भाषणात बोलत होते. याप्रसंगी ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या संचालिका सुप्रिया चौधरी, प्रवीण साळवे, गुरु साई फाऊंडेशनचे संचालक तथा कार्यशाळेचे मार्गदर्शक सीए शंकर अंदानी, मार्गदर्शक सीए प्रसाद भंडारी, कवयित्री सरोज आल्हाट, नॅशनल पोस्टल एम्प्लॉईज असोसिएशनचे कार्याध्यक्ष संतोष यादव, पत्रकार अनिल हिवाळे, मदत सोशल फाउंडेशनच्या ॲड. मोनाश्री अहिरे, सिंधी पंचायतचे महेश मध्यान आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुढे डॉ. पठारे म्हणाले की, सरकारला शक्य नाही, ते काम सामाजिक संस्था करत असतात. समाजातील अत्याचार, अन्याय दूर करण्यासाठी सातत्याने त्यांचा पुढाकार असतो. सामाजिक कार्य करण्याची इच्छा प्रत्येकाच्या मनात असते. मात्र त्याला सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दिशा मिळते. सेवाकार्य धंदा होऊ नये, यासाठी कायद्यानुसार नियमावली करुन त्या संस्था रजिस्टर करण्यात आल्या आहेत. स्वयंसेवी संस्थांना काम करण्यास मोठी संधी व आव्हान देखील असल्याचे त्यांनी सांगितले.

कठोर नियमावली असल्याने मनमानी पद्धतीने सामाजिक संस्थेचे चालू शकत नाही.



एक दिवसीय सामाजिक संस्था क्षमता बांधणी कार्यशाळेच्या उद्‌घाटनाप्रसंगी बोलताना डॉ. पठारे.

रजिस्टर करणे, शासनाच्या योजना पदरात पाडून घेणे, विविध फंड मिळवणे यासाठी सखोल ज्ञान आवश्यक असून, या कार्यशाळेच्या माध्यमातून या संदर्भात दिशा मिळणार आहे. स्वयंसेवी संस्थांनी जे करतो ते कशासाठी करतो? संस्थेच्या कार्याचे स्पष्ट उद्देश व ध्येय समोर ठेवून कार्य केले पाहिजे. शासनाच्या नवनवीन गाईडलाइन व नियमावली माहिती करुन घेण्यासाठी अपडेट होण्याची गरज असल्याचे डॉ. पठारे यांनी सांगितले.

प्रास्ताविकात सुप्रिया चौधरी यांनी सामाजिक संस्थांची माहिती देऊन ज्ञानरचना फाउंडेशनच्या माध्यमातून सुरु असलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला.

महेश मध्यान यांनी समाजापर्यंत शासकीय योजनांचा लाभ घेऊन जाण्यासाठी व संस्थेच्या माध्यमातून काम करताना त्याचे परिपूर्ण ज्ञान आवश्यक आहे. यामुळे योग्य दिशेने वाटचाल करता येणार आहे. यासाठी ही कार्यशाळा दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

सरोज आल्हाट म्हणाल्या की, समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी समाजसेवी संस्थेची गरज आहे. हे लक्षात घेऊन यामध्ये कार्य करणाऱ्या संस्थेच्या प्रतिनिधींना योग्य शिक्षण व मार्गदर्शनाची गरज आहे. या संस्था अधिक सक्षम झाल्यास ते समाजाला सक्षम करण्यासाठी कार्य करणार असल्याचे ते म्हणाले.

सीए शंकर अंदानी म्हणाले की, शासन विविध शासकीय योजना राबवीत असते, परंतु त्याचा लाभ शेवटच्या घटकांना मिळण्यासाठी शासन स्वयंसेवी संस्थांची मदत घेत असते. यासाठी संस्थेला महत्त्व असून काम कसे करावे? संस्थेचे–फायदे नुकसान?, कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी ही कार्यशाळा घेण्यात आलेली आहे. संस्थेचे उत्पन्न, कामकाज, ऑडिट, शासनाच्या योजनेचा लाभ, सीएसआर फंड सरकारी व खाजगी कंपन्यांकडून कसा मिळवावा? या संदर्भात मार्गदर्शन करुन स्वयंसेवी संस्थांची बांधणी करण्याचे या कार्यशाळेचे उद्दीष्ट त्यांनी स्पष्ट केले.

सीएसआरडीच्या सभागृहात झालेल्या या कार्यशाळेला जिल्हाभरातील सामाजिक संस्थेच्या प्रतिनिधींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पाहुण्यांचे स्वागत प्रवीण साळवे यांनी केले. यामध्ये इन्कट टॅक्स कायदे, धर्मदाय आयुक्तांकडे संस्था नोंदणी प्रक्रिया व कायदे, संस्थांच्या विविध नोंदणी, सेक्शन ८ कायदा माहिती, सीएसआर निधी संकलन यावर मार्गदर्शन करण्यात आले. तर संस्थांच्या प्रतिनिधींच्या विविध प्रश्न व शंकांचे निरसन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या स्वयंसेविका उषा तांबे, प्रियंका देवतरसे, सुजाता अंगारखे, कविता हजारे, योगिता काळे, सीएसआरडी कॉलेजचे प्राध्यापक सॅम्युअल वाघमारे, प्रदीप जारे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषा तांबे यांनी केले. आभार प्रवीण साळवे यांनी मानले.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच आरोग्याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे

### डॉ.शिल्पा नरसाळे यांचे प्रतिपादन

नगर – सध्या स्पर्धेचे युग आहे सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढत आहे. शैक्षणिक व्यावसायिक स्पर्धेत टिकण्यासाठी मुलांच्या बौद्धिक आणि मानसिक क्षमतांचा पूर्ण विकास झाला पाहिजे. त्यासाठी अभ्यास खूप महत्त्वाचा असल्याने मुले तणावात असतात. त्याचा परिणाम आहारावर होऊन मग आरोग्य बिघडते. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच आरोग्य कडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सकस आहार हवा फास्टफूड टाळा आरोग्य चांगले असेल तर बौद्धिक विकास होतो. असे प्रतिपादन डॉ. शिल्पा नरसाळे यांनी केले.



सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सबलोक प्राथमिक, सुचासिंगजी माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक समारंभ प्रसंगी डॉ.शिल्पा नरसाळे, डॉ. अश्विनी भोईटे, मुख्याध्यापिका अंजली शिरसाठ, मीरा नराल, राम बुचकुल, दादासाहेब भोईटे, शैक्षणिक संकुलाचे सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक उपस्थित होते. (छाया – विजय मते)

## सूच्चासिंगजी व सबलोक विद्यालयाचा पारितोषिक वितरण

अहिल्यानगर येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे १०८ श्री महंत पंडित सुचासिंगजी महाराज माध्यमिक विद्यालय व मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालय यांचा संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.शिल्पा नरसाळे, डॉ. अश्विनी भोईटे, मंडळाचे उपाध्यक्ष राम बुचकुल, खजिनदार दादासाहेब भोईटे, बाळकृष्ण सिद्दम, प्राचार्य रेखाराणी खुराणा, अनुराधा चव्हाण, डॉ.सुचित्रा डावरे, सविता सानप, मुख्याध्यापिका अनिता सिद्दम, प्राचार्य भरत बिडवे, संदीप कांबळे आदी उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ.नरसाळे यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व सांगून मोबाईल पासून दूर रहा. आरोग्य सुदृढ राहीले तर स्पर्धेत यशस्वी होताल.असे सांगितले.

डॉ.अश्विनी भोईटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की पारितोषिक समारंभ म्हणजे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया असतो. प्रत्येक विद्यार्थ्याने सर्वोत्तम गुण हा सुप्त गुण असतो तो आत्मसात करून स्नेहसंमेलनात दिसायला पाहिजे. आपण जे बोलतो ते कसं घडत याचे प्रात्यक्षिक मुलांकडून प्रयोगाद्वारे डॉ.भोईटे यांनी करून घेतले सर्व विद्यार्थ्यांनी त्याला दाद दिली.

यावेळी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका मीरा नराल माध्यमिक च्या मुख्याध्यापिका अंजली शिरसाठ यांनी आपापल्या विद्यालयात शैक्षणिक उपक्रम, विविध स्पर्धा, वार्षिक पारितोषिक मिळविलेल्या यश, विद्यार्थ्यांच्या यशाची माहिती शैक्षणिक अहवालातून दिली. हस्तलिखितांचे अनावरण प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात मंडळाचे उपाध्यक्ष राम बुचकुल, खजिनदार दादासाहेब भोईटे यांनी आपल्या भाषणातून सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या कामाची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सर्वतोपरी सहकार्य करीत असते. संस्थेच्या सर्व विद्या लयात अद्यावत अशा सोयी सुविधा असल्याने विद्यार्थी देखील स्वतःच्या नावाबरोबर शाळेचे नाव विविध स्पर्धा परीक्षेतून अव्वल येऊन उंचावत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया नवले यांनी केले तर चेतन कदम यांनी आभार मानले.



सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिरात शेकडो भाविकांनी मकर वीलक्कु उत्सवात ६० दिवस रोज महाप्रसादचा लाभ घेत आहेत.

# अय्यप्पा मंदिरात मकर वीलक्कु उत्सवात भाविकांनी घेतला महाप्रसादचा लाभ

नगर – सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिरात शेकडो भाविकांनी मकर वीलक्कु उत्सवात ६० दिवस रोज महाप्रसादचा लाभ घेतल्याची माहिती अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली.

१६ नोव्हेंबरला सुरु झालेल्या उत्सवाची सांगता १४ जानेवारीला मकर वीलक्कु उत्सवाने झाली आहे. दक्षिण भारतीयासह राज्यातील भाविकाची श्रद्धा असलेले अय्यप्पाचे मंदिर केरळ मधील शबरीमळा येथे असून त्या उत्सवाचा धर्तीवर नगर मध्ये उत्सव केला जातो. यामध्ये रोज अनेक भाविकांनी अन्नदान केले आहे, रोज रात्री हा महाप्रसाद होत होता

या मंदिराला चारही बाजूने ओवऱ्या असून मध्यभागी अयप्पा स्वामींचे मंदिर असून एका बाजूला गणपती व दुसऱ्या बाजूला सरस्वतीचे मंदिर आहे, तीनही मंदिरातील मुर्त्या प्रसन्न आहेत बाहेरील बाजूस स्वतंत्र स्वयंपाक गृह असून महाप्रसादासाठी हॉल आहे व जेवणाला बसण्यासाठी स्टीलचे खुर्च्या व टेबल आहेत तसेच येथील मोकळ्या जागेत बुफे पद्धतीने जेवण देण्यात येते दर शनिवारी व रविवारी भाविक दर्शनाला येतात व दर शनिवारी व रविवारी महाप्रसाद वर्षभर चालतो. अनेक भाविक अन्नदान किंवा महाप्रसादासाठी येथे मदत करतात अधिक माहिती साठी अयप्पा सेवा समिती, रेणावीकरनगर येथे मंदिरात संपर्क साधावा.



हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी विभागात शेकोटी कार्यक्रम झाला.

# हिंद सेवाच्या विद्यार्थ्यांनी शेकोटीबरोबर हुरड्याच्या मेजवानीचा आनंद लुटला

नगर – हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी विभागात शेकोटी कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे उषाताई देशमुख यांच्या हस्ते शेकोटीचे प्रज्वलन करण्यात आले. शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी सर्वांचे स्वागत केले.

मकर संक्रांतीचा सणा निमित्त सर्व विद्यार्थ्यांना स्वीटकॉन, सुरती हुरडा, गुळभेंडी हुरडा, हरभरा शेकोटीवर भाजून देण्यात आला. रात्रीच्या अंधारात शेकोटीचा लालसर प्रकाश व इमारतीवर केलेल्या आकर्षक लाईटींग, विविध रंगाच्या पतंगानी व रेखाटलेल्या रांगोळ्यांनी सजलेले व्यासपीठ यामुळे कार्यक्रमात नाविण्य जाणवत होते. या कार्यक्रमात मुलांसाठी खेळ घेण्यात आले. विद्यार्थी, पालक, शिक्षक सर्वांनी हुरड्याच्या मेजवानीचा स्वाद घेतला. हळदी कुंकवाचा कार्यक्रमात माता पालक सहभागी झाले होते. सर्व मुलांना तिळगुळ वाटप करण्यात आले.

सुनिल कुलकर्णी यांनी ’साताऱ्याचा म्हातारा शेकोटीला आला’ हे गीत मुलांकडून म्हणून घेत कार्यक्रमाची रंगत वाढविली कब–बुलबुल छात्रांना शपथ देण्यात आली. याप्रसंगी उषाताई देशमुख यांनी शेकोटीच्या ज्वाला जशा वरच्या दिशेने झेपावतात तसे आपणही नेहमी वरच्या दिशेने झेप घेऊन यश संपादन करावे. असे आवाहन विदयार्थ्यांना केले.

या कार्यक्रमास संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, कार्यकारणी सदस्य डॉ.पारस कोठारी, विष्णू सारडा, अनंत देसाई, सौ.ज्योती कुलकर्णी, सौ.स्मीता सारडा, सौ.विजया निसळ, प्राचार्य सुनिल सुसरे, बाळासाहेब कुलकर्णी यांनी उपस्थित राहून मुलांना शुभेच्छा दिल्या.

शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे यांच्या कल्पनेतून हा कार्यक्रम संपन्न करण्यासाठी शाळेतील शिक्षिका सौ.अंजली सासवडकर,सौ. अरुणा घाडगे, सौ.मनिषा साळी, सौ.विद्या पोतदार, सौ.सोनाली मच्चा, कु.माधुरी धायतडक, सौ.अर्चना वाकचौरे, सौ.अर्चना परभाणे, सौ. सोनाली केसभट, सौ.सपना धोत्रे, सौ.दिपाली कोल्हे, सौ.अर्चना देवतरसे, संदिप कळसकर यांनी परीश्रम घेतले.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिर व्यक्तिमत्व विकासासाठी उपयुक्त

### प्रा.डॉ.सय्यद रज्जाक यांचे प्रतिपादन

नगर – शिबिरा दरम्यान होणाऱ्या योगासने, प्राणायाम याद्वारे व्यक्तीचे मानसिक आरोग्य संतुलित राहण्यास मदत होते, श्रमदान मध्ये शोष खडडे तयार करणे, कचरा गोळा करणे गावातील साफ सफाई करणे या गोष्टीचा समावेश यात होतो. त्यामुळे स्वयंसेवकाच्या मनात प्रत्येक श्रम करणार्या व्यक्ती बद्दल आदरभाव निर्माण होतो. जनजागृती बौद्धिक खेळामुळे व्यक्तीच्या बुद्धिमत्तेचा विकास होतो. जो व्यक्ती विकासासाठी व समाज विकासासाठी आवश्यक आहे. तसेच रात्रीच्या वेळी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन वेगवेगळ्या सामाजिक सांस्कृतिक थीम देऊन घेतले जातात, त्यामुळे आपल्या देशाच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीची माहिती विद्यार्थ्यांना होते. स्वयं मूल्यमापनाच्या माध्यमातून आपण कोठे कमी पडतो. आपल्या मजबूत बाबी कोणते आहोत, स्वयंसेवकांना स्वयंममूल्यमापनाची सवय लागते आणि त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास पोषक वातावरण निर्माण होते. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर महत्वपूर्ण आहेत असे विनाअनुदानित विभागाचे प्रा.डॉ. सय्यद रज्ज़ाक यांनी केले.



राष्ट्रीय सेवा योजनेतील विशेष हिवाळी शिबीराच्या समारोपाप्रसंगी प्रा. डॉ. सय्यद रज्ज़ाक बोलत होते. याप्रसंगी प्रा.डॉ.सय्यद रज्ज़ाक यांचा सत्कार करण्यात आला.

## विशेष हिवाळी शिबीराच्या समारोप

राष्ट्रीय सेवा योजनेतील विशेष हिवाळी शिबीराच्या समारोपाप्रसंगी प्रा. डॉ. सय्यद रज्ज़ाक बोलत होते. यावेळी पांडुरंग म्हस्के व स्वयंसेवक खुशी बोरा, पंचायत समिती माजी सभापती आशोक दरेकर, घोसपुरी सरपंच किरण साळवे, उपसरपंच संतोष खोबरे आदी उपस्थित होते.

शिबिर काळातील विशेष उपक्रम गाव स्तरावर शोष खडडे पाझर खड्डे तयार करणे, बालविवाह रोखण्यासाठी समाज प्रबोधन, गावातील किशोरवयीन मुला – मुलींचे हा (अनेमिया) रक्तशय तपासणी, लिंगभाव संवेदनशीलता जनजागृती, नदी स्वच्छता / जलस्त्रोत स्वच्छता व वृक्षारोपण, लोकशाहीतील सहभाग आणि मतदार जनजागृती, प्रधानमंत्री जन –धन व विमा योजना, ऐतिहासिक स्थळे संवर्धन व स्वच्छता अभियान, अन्नसुरक्षा जनजागृती, अपारंपारिक ऊर्जा / अक्षय ऊर्जा पर्यावरण, जैवविविधता व अधिवास संवर्धन, मृदा व जलसंवर्धन आणि लोकसंख्या नियंत्रण जनजागृती या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी शिबीर दरम्यान काळात करण्यात आली.

तसेच शिबीर दरम्यान काळात डॉ. गोकुळदास गायकवाड इतिहास लेखन, डॉ. प्रीतमकुमार बेदरकर लिंगभाव संवेदनशीलता जाणीव जनजागृती, डॉ. विलास नामदेव लोकशाहीतील सहभाग आणि मतदार, डॉ. माधव शिंदे यांनी प्रधानमंत्री जन – धन व विमा योजना, डॉ. अभिजीत कुलकर्णी बदलती जीवनशैली व पर्यावरण, डॉ. शरद बोरुडे लोकसंख्या नियंत्रण जनजागृती या वक्त्यांनी सदरील विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

या दरम्यान पांडुरंग म्हस्के व स्वयंसेवक खुशी बोरा, पंचायत समिती माजी सभापती आशोक दरेकर, घोसपुरी सरपंच किरण साळवे, उपसरपंच संतोष खोबरे यांनी मनोगत व्यक्त केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी उपप्रचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, उपप्राचार्य डॉ. प्रीतमकुमार बेदरकर, उपप्राचार्य डॉ. नोएल पारगे, पीटर चक्रनारायण, प्रभारी प्रबंधक सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. सचिन मोरे यांचे सहकार्य लाभले. बाळासाहेब दरेकर, रोडे महाराज, सुधीर दरेकर, दत्ता कवडे योग शिक्षक, बाळासाहेब विटेकर, गोपाळ क्षिरसागर आणि अक्षय निमसे इ. घोसपुरी ग्रामस्थाचे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. भागवत परकाळ विद्यार्थी विकास अधिकारी, प्रास्ताविक प्रा. डॉ. पोपट सिनारे कार्यक्रमाधिकारी राष्ट्रीय सेवा योजना तर आभार प्रा. डॉ. रवींद्र मते सहाय्यक कार्यक्रमाधिकारी राष्ट्रीय सेवा योजना यांनी मानले.

# नाथ संप्रदाय आनंदी जीवनाचा मार्ग दाखवणारा : प्रवचनकार मिलिंद चवंडके

नगर – भगवान विष्णूंच्या आदेशावरून नवनारायणांनी नवनाथ म्हणून अवतार धारण केले. नवनाथांचा हा नाथ संप्रदाय आनंदी जीवनाचा मार्ग दाखवणारा आहे, असे प्रतिपादन नाथ संप्रदायाचे संशोधक तथा प्रवचनकार मिलिंद चवंडके यांनी केले.

चनई येथील सिध्दी विनायक कॉलनीमधील श्रीगुरूपादुका मठात प्रथमच आयोजित केलेल्या प्रवचन सोहळ्यात ’नाथांची दत्तभक्ती’ या विषयावर ते बोलत होते. श्रीगुरूपादुका मठाचेवतीने औक्षण करत शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ व श्रीफळ देवून मिलिंद चवंडके यांना सन्मानित करण्यात आले.

प्रवचन करताना मिलिंद चवंडके पुढे म्हणाले, आजच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या वातावरणात प्रत्येक जण आनंदाचा शोध घेत आहे. नवनाथांचा नाथ संप्रदाय आपल्यास शाश्वत आनंदी जीवनाचा मार्ग दाखवताना जीवन कृतार्थ कसे करता येते? याचे गूज सांगतो. नाथ संप्रदायातील गूढ तत्वज्ञानाचा बारकाईने अभ्यास करताना नवनाथांनी कलीयुगातील भाविकांच्या कल्याणासाठी घेतलेले अथक परिश्रम डोळ्यांसमोर उभे रहातात. आदिनाथ भगवान शंकर परमात्म्याकडून मिळालेले दिव्यज्ञान मच्छिंद्रनाथांनी भगवान श्रीदत्तात्रेयांकडून अनुग्रह मिळाल्यानंतर आपल्या नाथ संप्रदायाच्या माध्यमातून जनसामान्यांच्या पुढ्यात ठेवले. गुरू गोरक्षनाथांनी हेच दिव्यज्ञान गहिनीनाथांना दिले. गहिनीनाथांकडून निवृत्तीनाथांनी हेच आत्मज्ञान ज्ञानेश्वर माऊलींना प्रदान केले. माऊलींनी नाथ संप्रदायाकडून आलेले हे दिव्य ज्ञान ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या माध्यमातून घरोघरी पोहोचवले. हे ज्ञान म्हणजे नाथांच्या दत्तभक्तीमधून प्रगटलेले दिव्यदर्शनच होय.



आदिनाथ भगवान शंकर परमात्म्यापासून ज्ञान आणि भगवान श्रीदत्तात्रेयांचा उपदेश ही ज्ञानोत्तर भक्ती होय. गुरूभक्ती, योगसाधना व ज्ञान यांचा त्रिवेणी संगम नवनाथ भक्तिसार ग्रंथात झाला आहे. नवनाथांनी केलेल्या चमत्कारांची गाथा म्हणजे नवनाथ भक्तिसार ग्रंथ आणि श्रीनृसिंह सरस्वतींच्या चमत्कारांची गाथा म्हणजे श्रीगुरूचरित्र ग्रंथ आहे.

आपल्या देहाच्या साहाय्याने परम पदाची प्राप्ती करून घ्यायची असल्याने देहाचे उत्तम रक्षण करावे. उत्तम आरोग्य सांभाळावे. देह शुध्द ठेवण्यासाठी शुध्द शाकाहारी आणि निर्व्यसनी असावे. शुध्द आचरण व चारित्र्य संपन्नता आपणास भगवंतापर्यंत घेऊन जातेच. सद् गुरु भेटले की अध्यात्म मार्गावर चालण्याचा मार्ग प्रशस्त होत जातो. आपण परगावी जाण्याची जशी जय्यत तयारी करतो तशी तयारी भगवंताकडे पोहोचण्यासाठी केली पाहिजे. भगवंताकडे जाण्याची तयारी करण्यासाठी गुरूभक्ती उपयुक्त ठरते. गुरू आपल्या शिष्यास भगवंतास आवडेल असेच वागण्याचा सल्ला देताना या जन्माचे सार्थक कसे करायचे? हे नेमकेपणाने सांगतात, असे मिलिंद चवंडके यांनी विविध दाखले देत निरूपण करताना सांगितले.

प्रवचन सोहळ्यास सर्वश्री शशिकांत भास्करे, समीर भास्करे, श्रध्दा भास्करे, संगिता सौदागर, शशिकुमार पंडीत, विष्णू शिंदे, प्रवीण बासटवार, नायब तहसीलदार बालाजी कचरे, संजय उडगे, शंकर कुलथे, प्रथमेश घोडके, गोपाल खांडेकर यांच्यासह श्रीगुरुपादुका मठाम धील भक्त परिवार उपस्थित होता.

नाथांची दत्तभक्ती या विषयावर प्रथमच प्रवचन ऐकायला मिळाले, असे श्रोत्यांनी आयोजक समीर भास्करे यांना खास भेटून सांगितले. प्रवचन करताना मिलिंद चवंडके यांनी उच्चस्वरात केलेला नाथांच्या नावांचा गजर वातावरण मंत्रमुग्ध करून टाकणारा आणि उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभा करणारा ठरला.

# एमआयडीसीतील कंपनीतून ६० किलो कॉपर वायरची चोरी

नगर – नगर एमआयडीसी परिसरातील समर्थ हायड्रोलिक पॉवर सिस्टिम डी ४ या कंपनीतून एकाने वेळोवेळी नजर चुकवून ५५ हजार रुपये किमतीची ६० किलो कॉपर वायर चोरून नेल्याची घटना ७ ते २१ जानेवारी दरम्यान घडली.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात विजय प्रभाकर जुंदरे (वय ५७, समर्थ हायड्रोलिक पॉवर सिस्टीम कंपनी अ.नगर) यांनी दिलेले फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित चोरटा आदिनाथ नानासाहेब आंधळे (रा. चांदा, ता. नेवासा) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०६ अन्वये चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली अधिक तपास पोलीस हवालदार साबीर शेख करीत आहे.

# मुला-मुलींच्या आयुष्यात फक्त एकच देवी आणि देव ते म्हणजे आई-बाप

### डॉ. वसंत हंकारे यांचे प्रतिपादन

नगर - आपल्या आई-बापाला शेवटच्या श्वासापर्यंत जीव लावा, त्यांच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करा, कारण आई-बापाचा श्वास निघून गेला, तर भिंतीवरच्या फोटोतील आई-बाप कधीच तुम्हाला जीव लावायला येणार नाही. याची जाणीव ठेवा, असे विचार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्याख्याते डॉ. वसंत हंकारे यांनी मांडले.

एमआयडीसी येथील रामराव चव्हाण विद्यालयात डॉ. वसंत हंकारे यांच्या न समजलेले आई बाप.. समजून घेताना या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते. या व्याख्यानासाठी परिसरातील तब्बल ३ हजार शालेय विद्यार्थी उपस्थित होते.


एमआयडीसी येथील रामराव चव्हाण विद्यालयात डॉ. वसंत हंकारे यांच्या न समजलेले आई बाप.. समजून घेताना या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते.

### रामराव चव्हाण विद्यालयात रंगले न समजलेले आई बाप.. समजून घेताना! व्याख्यान

या कार्यक्रमाप्रसंगी रेणूका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भिमाजी कोकणे, उपाध्यक्ष कृषीभूषण सुरसिंगराव पवार, सचिव ज्ञानेश चव्हाण, सहसचिव नितीन घाडगे, विद्यालयाचे प्राचार्य शिवाजीराव घाडगे, पर्यवेक्षक दत्तात्रय दरेकर, वडगाव गुप्ताचे सरपंच विजयराव शेवाळे, भाजपाचे प्रसिद्धीप्रमुख शामराव पिंपळे, उद्योजक सागर देशमुख, उद्योजक आकाश बारस्कर, रावसाहेब घाडगे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ बोबडे, भाजपा नगर तालुका अध्यक्ष रामभाऊ घाडगे, नागापूर ग्रामपंचायत सदस्य दीपक गीते, उद्योजक कातोरे, उमेश डोंगरे, गणेश डोंगरे, उद्योजक राजेंद्र लहारे, डॉ. बापूसाहेब डोंगरे, भानुदास काळे, ताराचंद डोंगरे, बापू नाना गव्हाणे, डॉ. बापू पवार आदीं उपस्थित होते.

पुढे बोलताना हंकारे म्हणाले की, मुला-मुलींच्या आयुष्यात फक्त एकच देव आहे, तो म्हणजे आपला बाप आणि एकच देवी आहे, ती म्हणजे आपली आई. आपल्या आई-बापाला समजून घेण्याची वेळ आली आहे. आपल्या एखाद्या कृत्याने आई-बापाची मान खाली जाईल असे कृत्य आपल्या हातून घडणार नाही याची काळजी घेण्याचे सांगत त्यांना लाचार करू नका, त्यांचे नाव उज्वल करण्यासाठी चांगले संस्कार मनाशी बाळगा. भविष्यात डॉक्टर, इंजिनिअर, वकील झालात आणि लाखो रुपये कमवून ठेवले, मात्र ते पाहण्यासाठी जर आई-बाप नसतील तर तुम्हाला त्या कमावलेल्या पैश्यांचा उपयोग काय? हा प्रश्न त्यांनी विद्यार्थ्यां समोर मांडला.

आई-बाबांनी लहानपणी आपल्यासाठी काय केले आहे, हे तुम्हाला चांगले माहिती आहे, लहानपणी आपल्याला आई-बाप कळत होते. आता मात्र तुंम्ही कॉलेजला जायला लागले, तुम्हाला बंधनात ठेवले जाते, असा तुमचा समज झाला आहे. त्यामुळे मम्मी-पप्पा तुंम्हाला आता आवडत नाही. आय हेट यू, मम्मी-पप्पा अशी वाक्य मुलांच्या तोंडून येऊ लागली आहे. परत एकदा तुम्हाला तुमचे हरवलेले पूर्वीचे आई-बाप मिळण्यासाठी तुमचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याची गरज असल्याचे हंकारे यांनी सांगितले. व्याख्यानात विद्यार्थ्यांसह पालकही भावूक झाले होते. तर डोळे उघडणारे व विचार बदलणाऱ्या व्याख्यानास विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देवून आई-वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.


तपोवन रोड येथे फिनिक्स फाउंडेशन, बुधरानी हॉस्पिटल आणि तन्वीर मनियार यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले.

# मोफत शिबिरातून गरजवंत नागरिकांच्या डोळ्यांच्या आजाराच्या समस्या मार्गी लागतात

### तन्वीर मनियार यांचे प्रतिपादन; तपोवन रोड येथे मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

नगर - नागरिकांमध्ये डोळ्यांच्या आजारपणाच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती त्याकडे दुर्लक्ष करत असतात त्यामुळे एखाद्या मोठ्या आजारपणाला सामोरे जावे लागते, ज्येष्ठ नागरिकांमध्ये डोळ्यांच्या समस्या मोठ्या प्रमाणात जाणवत असतात त्यावर उपचार व्हावेत यासाठी बुधरानी हॉस्पिटल व फिनिक्स फाउंडेशन यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले जाते. या माध्यमातून २५० रुग्णांनी लाभ घेतला आहे. मोफत शिबिरातून गरजुवंत नागरिकांच्या डोळ्यांच्या आजाराच्या समस्या मार्गी लागतात. आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन होणे ही काळाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन तन्वीर मनियार यांनी केले. तपोवन रोड येथे फिनिक्स फाउंडेशन बुधरानी हॉस्पिटल आणि तन्वीर मनियार यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर झाले. यावेळी तन्वीर मनियार, जालिंदर बोरुडे, डॉ.विशाल भिंगारदिवे, डॉ.दीपक दरंदले आदीसह रुग्ण उपस्थित होते.

फिनिक्स फाउंडेशन ने नगर शहर व परिसरातील नागरिकांच्या डोळ्यांच्या आजारपणाचे प्रश्न मार्गी लागावे यासाठी बुधरानी हॉस्पिटलच्या माध्यमातून मोफत उपचार केले जात आहे. आतापर्यंत हजारो रुग्णांना दृष्टी देण्याचे काम केले आहे. चांगल्या कामाच्या माध्यमातून मनाला समाधान मिळत असते. तन्वीर मनियार दरवर्षी तपोवन रोड परिसरातील नागरिकांसाठी मोफत शिबिराचे आयोजन करत असल्याचे प्रतिपादन जालिंदर बोरुडे यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये खेळाचे महत्व अनन्यसाधारण


ज्ञानसंपदा शाळेत आंतर शालेय खो-खो स्पर्धेत १४ वर्षे वयोगटांमध्ये मुल व मुलींमध्ये प्रथम क्रमांक पाऊलबुद्धे माध्यमिक विद्यालयाने पटकाविला समवेत ज्ञानसंपदा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.शिवांजली अकोलकर, अर्जुन खेकडे, अजय जाधव, विशाल डुकरे, प्रतीक जावरे आदी (छाया - उदय जोशी)

### मुख्याध्यापिका सौ.शिवांजली अकोलकर यांचे प्रतिपादन; ज्ञानसंपदा शाळेत आंतरशालेय खो - खो स्पर्धेचे आयोजन, डॉ.ना.ज. पाऊलबुद्धे शाळा प्रथम

नगर - विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये खेळाचे महत्व अनन्यसाधारण आहे. हे विचारात घेऊन ज्ञानसंपदा शाळा विविध खेळांच्या स्पर्धेचे आयोजन करत असते, विद्यार्थ्यांना मैदानी खेळाची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांनी खेळात प्राविण्य मिळवावे, विद्यार्थ्यांचे मन, शरीर, बुद्धी तंदुरुस्त रहावे, या उद्देशाने ज्ञानसंपदा शाळेत आंतर शालेय खो-खो स्पर्धा आयोजित केल्या असे प्रतिपादन ज्ञानसंपदा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.शिवांजली अकोलकर यांनी केले.

दिल्ली येथे सुरू झालेला २०२४-२५ हा ऐतिहासिक पहिला खो - खो वर्ल्ड कप मध्ये भारतीय संघातील खेळाडूंना शुभेच्छा व प्रोत्साहन देण्यासाठी ज्ञानसंपदा शाळेत आंतरशालेय खो - खो स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांचे उपस्थितीत करण्यात आले. सौ.शिवांजली अकोलकर, पंच अर्जुन खेकडे, अजय जाधव, विशाल डुकरे, प्रतीक जावरे आदीसह उपस्थित होते.

भविष्यातही अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्याची शाळेची इच्छा असल्याचे मुख्याध्यापिका सौ.शिवांजली अकोलकर यांनी व्यक्त केले.

या स्पर्धेमध्ये पाऊलबुद्धे विद्यालय, किड्स किंगडम अॅकॅडमी, नय्यर विद्यालय, सन फार्मा विद्यालय, ज्ञानसंपदा विद्यालय, श्री साई इंग्लिश मीडियम, चक्रधर स्वामी विद्यालय आदी शाळेतील १४ वर्षे वयोगटातील मुले आणि मुली यांनी सहभाग नोंदवला व आपल्या खेळाचे उत्तम प्रदर्शन दाखवले. या स्पर्धेसाठी अर्जुन खेकडे, अजय जाधव, विशाल डुकरे, प्रतीक जावरे आदी पंचानी परीक्षण केले. स्पर्धेसाठी आलेल्या खेळाडूंनी खेळाचा मनमुराद आनंद घेतला.

१४ वर्षे वयोगटांमध्ये मुलांमध्ये डॉ.ना.ज. पाऊलबुद्धे शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला, द्वितीय क्रमांक सन फार्मा विद्यालय, तृतीय क्रमांक नय्यर माध्यमिक विद्यालय यांनी पटकावला.

मुलींमध्ये प्रथम क्रमांक पाऊलबुद्धे माध्यमिक विद्यालय, द्वितीय क्रमांक नय्यर विद्यालय, तृतीय क्रमांक किड्स किंग्डम अॅक्डमी सोनई नेवासा यांनी पटकावला. या स्पर्धेसाठी विकास परदेशी, गोरक्ष धात्रक, मच्छिंद्र साळुंखे व सर्व शिक्षक वृंदांचे सहकार्य लाभले.

# सारडा महाविद्यालयात मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन करण्याच्या दृष्टीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन

नगर - पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभागाने मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन करण्याच्या दृष्टीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. या पंधरवड्यात नावीन्यपूर्ण अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिमापूजनाने महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित आणि सारडा महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राचे संशोधक विद्यार्थी व कथाकार शीलवंत वाढवे यांच्या हस्ते झाले.


सारडा महाविद्यालयात मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन करण्याच्या दृष्टीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित आदी.

प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या, केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला. हा दर्जा मिळाल्याने ती शासनमान्य अभिजात मराठी भाषा झाली आहे. माऊली ज्ञानेश्वरांनी 'अमृतातेही पैजासी जिंके' ही दिलेली ग्वाही त्यांच्या ७५० व्या जयंती वर्षात आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षात सिद्ध झाली. प्रत्येक मराठी माणसासाठी हा आनंदोत्सवाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. संगणकादी नवे तंत्रज्ञान आल्यावरही मराठीचा वापर प्रचंड वाढला आहे. मराठी ब्लॉग्स, संकेतस्थळे वाढली आहेत. प्रसारमाध्यमांनी मराठी भाषा साचेबद्ध न ठेवता तिच्यात कालानुरूप बदल केले आहेत.

महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच विद्यापीठांनी मराठी भाषाभ्यासाला व्यावहारिक जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे अनेक क्षेत्रांत नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. भारतातील सर्वच विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकवली जाईल. बोलीभ्यास संशोधन, अनुवाद प्रक्रिया यांना गती मिळेल. ग्रंथालये सशक्त होतील. पुरातन साहित्याचे डिजिटायझेशन होईल. त्यामुळे डिजिटल माध्यमांतून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. अनेक जाती-धर्मांचे लोक मराठी भाषा बोलतात. अनेक पंथ, धर्म, प्रांत, संस्कृती यांना मराठीने आपल्या पोटात सामावून घेतले आहे. खांद्यावर माय मराठीची पताका घेतलेल्या साडे बारा कोटींची ही भाषांमाजी भाषा साजिरी आहे. प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे.

या पंधरवड्यात मराठी भाषेचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने वैविध्यपूर्ण अशा कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजित करण्यात आले होते. कथाकथन, विनोदी साहित्य लेखन या विषयांवरील कार्यशाळेत शीलवंत वाढवे, कवितालेखन या विषयाच्या कार्यशाळेत ऋता ठाकूर, ललित गद्य या विषयावरील कार्यशाळेत सुनिता कुलकर्णी, कथालेखन याविषयीच्या कार्यशाळेत सुनिता लोंढे, वारकरी कीर्तन या विषयीच्या कार्यशाळेत रामदास दराडे, लोकसाहित्य क्षेत्रीय अभ्यास या विषयावरील कार्यशाळेत सोनाली फुलशेटे, चरित्र लेखन याविषयीच्या कार्यशाळेत सोनाली शिंदे आदी सारडा महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन प्रा.संगीता शेळके यांनी केले तर आभार प्रा. भारत म्हस्के यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ प्रतीक्षा गायकवाड, डॉ. दया जेठे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रबंधक अशोक असेरी यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या उपक्रमाचे हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष अॅड.अनंत फडणीस, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी आदींनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# अलकरम हॉस्पिटलतर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन

नगर - अलकरम हॉस्पिटलच्या वतीने वर्षभर गरजूंसाठी वेगवेगळे सामाजिक आरोग्य शिबिरे आयोजित केली जाते. व समाजात कमीत कमी दरामध्ये आरोग्य सुविधा देण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून शहरातील रक्त तुटवडा भरून निघण्यास मदत व्हावी यासाठी प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी सकाळी दहा ते चार वाजेपर्यंत किंग्स गेट रोड इंगळे मेडिकलच्या मागे रामचंद्रखुंट अहमदनगर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे डॉ. जहीर मुजावर यांनी सांगितले.

या शिबिरात मोठ्या प्रमाणात आपली जवाबदारी समजून लोकांनी रक्तदान करावे असे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने तौफिक तांबोळी यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी ९८६०७०८०१६ या नंबर वर संपर्क करावे.

# साकुरी येथून डिजिटल फार्मर प्रमाणपत्र वितरण सुरू

राहाता - भारत सरकारच्या कृषी विभागा मार्फत शेतकऱ्यांना डिजिटल फार्मर प्रमाणपत्र वितरण सुरू करण्यात आला आहे या योजनेचा शुभारंभ साकुरी येथील आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत सुरू करण्यात आला आहे


साकुरी येथून डिजिटल फार्मर प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या योजनेमार्फत प्रत्येक शेतकऱ्याला एक विशिष्ट क्रमांक हा केंद्र सरकार मार्फत मिळणार असून या विशिष्ट आई डी मार्फत शेतकऱ्यांची सर्व माहिती ही केंद्र सरकार पर्यंत पोहचणार आहे शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेणे साठी हा आई डी महत्वाचा आहे

केंद्र सरकारमार्फत पीकविमा मिळविणे, प्रधान मंत्री शेतकरी मानधन योजनेचे पैसे मिळविणे तसेच केंद्र सरकारच्या अनेक योजनेसाठी भविष्यात सदरील डिजिटल आई डी प्रमाणपत्र शेतकऱ्यांना अनिवार्य होणार आहे तरी या डिजिटल प्रमाणपत्र काढण्याचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन साकुरी येथील आपले सरकार सेवा केंद्र चालक श्री. जाधव, सी एस सी जिल्हा व्यवस्थापक सतीश खरड, तहसीलदार अमोल मोरे यांनी केले आहे

# 'बालभवन' कार्यक्रमातून विविधतेतून एकतेचा संदेश; सांस्कृतिक सादरीकरणाने रसिकांची मने जिंकली

नगर - बालभवन आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण समारंभ हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी शाळेत पार पडला. या कार्यक्रमाला मुलांच्या आणि पालकांच्या भरघोस प्रतिसादाने रंगत आली. कार्यक्रमाला युनिव्हर्सल फाउंडेशनचे अध्यक्ष दिनेश मोरे, सेक्रेटरी गणेश पाटील, अल्केमिज अॅक्डमीचे तुषार अंबाडे, राजमुद्रा अॅक्डमीच्या संस्थापिका नंदाताई पांडुळे, बालभवनच्या मानंद संचालिका सौ. वैशाली चोपडा, दादा चौधरी नाईट स्कूलचे मुख्याध्यापक सुनील सुसरे, स्नेहालय संचालक हनिफ शेख व उड्डाण प्रकल्पाचे व्यवस्थापक श्री. प्रवीण कदम आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनाने झाली. सोलो डान्स, ग्रुप डान्स, देशभक्तीपर गीत, नाटक, भारूड अशा सांस्कृतिक सादरीकरणांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. शास्त्रीय व लोकसंगीतावर आधारित नृत्यांमुळे रसिकांना पारंपरिक कलेचा आनंद मिळाला, तर सामाजिक संदेश देणाऱ्या नाटकांनी उपस्थितांना विचार करायला भाग पाडले. व्यसनाधीनता आणि मनोरुग्ण आहे अंधश्रद्धा नाही या नाटकांनी विशेष लक्ष वेधले.

खेळाडूंचा सन्मान: हिवाळी स्पर्धांमध्ये ५० व १०० मीटर धावणे, बटनरिले, खो-खो, कबड्डी यासारख्या खेळांमध्ये मुलांनी उत्कृष्ट कामगिरी केली.


बालभवन आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण समारंभ हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी शाळेत पार पडला.

खो-खो (मुलं): प्रथम - ऊर्जा बालभवन, द्वितीय - उत्कर्ष बालभवन, खो-खो (मुली): प्रथम - ऊर्जा बालभवन, द्वितीय - उत्कर्ष बालभवन, कबड्डी (मुलं): प्रथम - डॉ. हळबे बालभवन, द्वितीय - उत्कर्ष बालभवन, कबड्डी (मुली): प्रथम - परिस बालभवन, द्वितीय - उत्कर्ष बालभवन

सांस्कृतिक स्पर्धांमध्ये चमक: सोलो डान्स: प्रथम - मलाला बालभवन, द्वितीय - ऊर्जा बालभवन, तृतीय - डॉ. हळबे बालभवन

नाटक: प्रथम - व्यसनाधीनता, द्वितीय - मनोरुग्ण आहे अंधश्रद्धा नाही

प्रि-स्कूल स्पर्धा: प्रथम - ये दुनिया एक दुल्हन उत्कर्ष बालभवन, द्वितीय - बम बम बोले डॉ. कलाम बालभवन, तृतीय - नाच रे मोरा परिस बालभवन

सर्व विजेत्यांना सन्मानचिन्हे व शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन कुमारी अर्चना दिनकर आणि ओम शिंदे यांनी केले.

प्रस्तावना सौ. वैशाली चोपडा यांनी सादर केली, तर पाहुण्यांचा सत्कार साजेदा शेख यांनी केला. आभार प्रदर्शन हनिफ शेख यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. उषा खोल्लम, प्रतीक्षा साळवे, संतोष बेदरकर, यास्मिन शेख, रुबिना शेख, सुनिता औटी, जयश्री शिंदे, रजिया दफेदार, विना वड्डेपेल्ली, शारदा न्यानपेल्ली, सचिन वाघ, गुलनाज शेख आणि सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.

# आदिती तटकरे यांच्या पालकमंत्री पदाची स्थगिती हटविण्यासाठी शहरात राष्ट्रवादी युवतीची निदर्शने

### महिलेला टार्गेट करणाऱ्या विकृतींचा निषेध; महिलांच्या सन्मानासाठी तटकरे यांना पुन्हा पालकमंत्रीपद मिळणे आवश्यक : अंजली आव्हाड



जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन तटकरे यांना पुन्हा पालकमंत्री पद देण्यासाठी निदर्शने करण्यात आली.

नगर – महिला व बालविकास कल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाला दिलेली स्थगिती हटविण्यासाठी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्यावतीने २३ जानेवारी शहरात निदर्शने करण्यात आली. तर एका महिलेला टार्गेट करुन त्यांच्या विरोधात अश्लील वक्तव्य व टिका करणाऱ्या विकृतींचा यावेळी निषेध नोंदविण्यात आला.

जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन तटकरे यांना पुन्हा पालकमंत्री पद देण्यासाठी निदर्शने करण्यात आली. काळ्या फिती बांधून युवती–महिलांसह युवक कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.

या आंदोलनात राज्य कार्याध्यक्षा अंजली आव्हाड, महिला जिल्हाध्यक्षा आशा निंबाळकर, विद्यार्थी सेलचे वैभव ढाकणे, साधनाताई बोरुडे, सूरज शिंदे, राष्ट्रवादी युवकचे इंजि. केतन क्षीरसागर, आशा गायकवाड, संगीता ससे, दिपाली आढाव, प्रेमा जावळे, अश्विनी शिंदे, सुजाता दिवटे, निलोफर सय्यद, नितू औशेकर, सुनंदा शिरवाळे, सुप्रिया काळे आदींसह युवती, महिला व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

अंजली आव्हाड म्हणाल्या, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आदिती तटकरे यांनी मोठी लोकप्रियता मिळवली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या खांद्याला खांदा लावून त्या काम करत आहे. विरोधकांच्या पोटात गोळा उठल्याने त्यांनी एका महिलेला टार्गेट केले आहे. या विकृतींचा सर्व महिलांच्या वतीने निषेध असून, महिलांच्या सन्मानासाठी त्यांना पुन्हा पालकमंत्रीपद मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात महिलांचा अपमान सहन केला जाणार नाही. मुख्यमंत्री यांनी त्यांच्या पदाची स्थगिती उठवावी, अन्यथा राज्यातील युवती विभागाच्या वतीने मंत्रालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला.

वैभव ढाकणे म्हणाले की, शाहू, फुले, आंबेडकर विचारांचा महाराष्ट्र आहे. शिवाजी महाराजांनी महिलांचा नेहमीच मान–सन्मान राखला, मात्र त्या महाराष्ट्रात सध्या एका महिला लोकप्रतिनिधीला अपमानित करुन त्यांच्या पालकमंत्री पदाला स्थगिती देण्यात आली आहे. महिलांविरोधात असलेल्या विकृतीचा निषेध नोंदविण्यासाठी व सन्मानाने तटकरे यांना पालकमंत्री पद मिळण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

# सराफ व्यावसायिकाची कारागीराकडून सव्वा आठ लाख रुपयांची फसवणूक

### दागिने करण्यासाठी दिलेले १०४ ग्रॅम सोने देण्यास टाळाटाळ, गुन्हा दाखल

नगर – सोन्याचे विविध प्रकारचे दागिने तयार करण्याकरीता व दुरुस्ती करता दिलेले ८ लाख ३० हजार रुपये किंमतीचे १०४ ग्रॅम सोन्याचे दागिने न बनविता तसेच ते सोने परत देण्यास टाळाटाळ करत सुवर्ण कारागिराने नगर मधील सराफ व्यावसायिकाची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी त्या सुवर्ण कारागीरावर फसवणुकीचा गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. शिवाजी भिमराव पाटील (रा. सराफ बाजार, अ.नगर) असे त्याचे नाव आहे.

याबाबत सावेडी उपनगरातील प्रोफेसर कॉलनी चौक येथील शिंगवी ज्वेलर्स या दुकानाचे मॅनेजर अमृत जिवराज रावल (वय ५१, रा. सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स, बुरुडगाव रोड) यांनी २२ जानेवारीला दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शिंगवी ज्वेलर्स या दुकानात आलेल्या ग्राहकांच्या मागणीनुसार सोन्याची दागिने बनवण्याकरिता व दुरुस्ती करिता सुवर्ण कारागिरांना सोने दिले जाते. त्यानुसार फिर्यादी रावल यांनी १९ व २० डिसेंबर रोजी सुवर्ण कारागीर शिवाजी पाटील यांना दागीने तयार व दुरुस्ती करण्याकरीता ८ लाख ३० हजार रुपये किंमतीचे १०४ ग्रॅम वजनाचे सोने दिले होते. त्या सोन्यातून ३ लाख रुपये किंमतीच्या ३८ ग्रॅम वजानाच्या दोन सोन्याचे चेन, १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या १७ ग्रॅम वजनाचे एक सोन्याचे गंठन, २ लाख ३० हजार किंमतीचे २९ ग्रॅम वजनाचे एक सोन्याचे नेकलेस, १ लाख ६० हजार रुपये किंमतीचे २० ग्रॅम वजनाचे एक सोन्याचे ब्रासलेट असे दागिने बनवून दोन चार दिवसात सोन्याचे दागीने तयार करुन परत देण्याचे ठरले होते.

परंतु त्यानंतर शिवाजी पाटील यांनी सोन्याचे दागीने तयार करून दिले नाही. त्यामुळे मॅनेजर अमृत रावल यांनी पाटील यांना फोन करुन सोन्याचे दागीने देण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी आज देतो, उदया देतो असे म्हणुन टाळाटाळ केली. त्यानंतर फोन उचलणे बंद केले. तसेच शिंगवी ज्वेलर्स या दुकानात येणे बंद केले आहे. यावरुन मॅनेजर रावल यांची खात्री झाली की शिवाजी पाटील याने विश्वासाने दिलेले सोने किंवा सोन्याचे दागीने अदयाप पर्यत आणुन न देता फसवणूक केली. त्यामुळे त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरुन पोलिसांनी शिवाजी पाटील यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६(२), ३१८ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या थकबाकीमुळे ८ मालमत्ताधारकांवर कारवाई

### ४ व्यावसायिक गाळ्यांना मनपाने ठोकले सील, चौघांचे नळ कनेक्शन तोडले; १००% शास्तीमाफीचा शेवटचा आठवडा; कारवाई तीव्र करणार : आयुक्त यशवंत डांगे





मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या थकबाकीमुळे मालमत्ताधारकांवर कारवाई करण्यात आली.

नगर – मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या थकीत वसुलीसाठी महानगरपालिकेने शास्तीमध्ये जानेवारी अखेरपर्यंत १०० % सवलत दिली आहे. तर दुसरीकडे थकबाकीदारांवर कारवाईही सुरूच ठेवली आहे. मागील आठवड्यात सावेडी प्रभाग समिती कार्यालयाने सात थकबाकीदारांवर कारवाईचा बडगा उगारला होता. आता आणखी पाच जणांवर कारवाई करण्यात आली आहे. चौघांचे व्यावसायिक गाळे सील करण्यात आले आहेत. तर, चौघांचे नळ कनेक्शन तोडून पाणी पुरवठा बंद करण्यात आला आहे. शास्तीमध्ये सवलत देण्यात आल्यावर आत्तापर्यंत ३.१९ कोटींची थकबाकी जमा झाली आहे. १०० टक्के सवलतीसाठी शेवटचा आठवडा शिल्लक आहे. मालमत्ताधारकांनी शास्तीमध्ये देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ थकीत कराचा भरणा करावा व कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

सावेडी प्रभाग समिती कार्यालयाने मालमत्ताधारक यांच्याकडे मालमत्ताकराची १ लाख ९५ हजार ५८० रुपये थकबाकी असल्याने त्यांचा गाळा सील करण्यात आला. मालमत्ताधारक यांच्याकडे गाळ्याची २ लाख ५५ हजार ६४० रुपये थकबाकी असल्याने त्यांचा गाळा सील करण्यात आला होता. कारवाई करताच त्यांनी संपूर्ण रकमेचा चेक जमा केल्याने कारवाई मागे घेण्यात आली. मालमत्ताधारक यांच्याकडे मालमत्ता कराची ३ लाख २१ हजार २५२ रुपये थकबाकी असल्याने त्यांचे नळ कनेक्शन बंद करण्यात आले. २४ जानेवारीपर्यंत पैसे न भरल्यास त्यांच्या राहत्या घराची खोली सील करण्यात येणार आहे. मालमत्ताधारक यांच्याकडे मालमत्ताकराची १ लाख ७५ हजार १३ रुपये थकबाकी असल्याने त्यांचा गाळा सील करण्यात आला. मालमत्ताधारक पतसंस्थाकडे मालमत्ताकराची २ लाख ४२ हजार ५१० रुपये थकबाकी असल्याने त्यांचे पूर्ण कार्यालय सील करण्यात आले. नागापूर उपविभाग मधील गृहनिर्माण संस्थेकडे २६ हजार ८९० रुपये शास्ती वगळून थकीत असल्याने त्यांचे नळ कनेक्शन बंद करण्यात आले.

सावेडी प्रभाग समिती हद्दीतील मालमत्ताधारक यांच्याकडे मालमत्ता कराची ९४ हजार ४३० रुपये थकबाकी असल्याने त्यांचे दोन नळ बंद करण्यात आले. तसेच, मालमत्ताधारक यांच्याकडे मालमत्ता कराची १ लाख ६८ हजार ६४१ रुपये थकबाकी असल्याने त्यांचे नळ कनेक्शन बंद करण्यात आले.

मनपा वसुलीसाठी सुरू असलेली कारवाई थांबणार नाही. थकबाकीदारांना शास्तीमध्ये सवलत देण्यात आली आहे. १०० टक्के सवलत घेण्यासाठी शेवटचा आठवडा शिल्लक आहे. त्यामुळे याचा लाभ घेऊन तत्काळ कर भरणे अपेक्षित आहे. त्यानंतर कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचेही यशवंत डांगे यांनी सांगितले आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीमध्ये विद्यमान मालक यांचा अविभाज्य सामाईकातील हक्क व हिस्सा असून, विद्यमान मालक यांच्या प्रत्यक्ष मालकीहक्कात व कब्जे वहिवाटीत मिळकत क्षेत्र आहे. नमूद मिळकतीमधील विद्यमान मालक यांच्या संपूर्ण अविभाज्य मालकी हक्काच्या हिश्याची विक्री करण्याची बोली विद्यमान मालक, त्यांचे कुटुंबिय आणि कायदेशीर वालीवारस व आमच्या अशिलात झालेली असून नमूद मिळकत क्षेत्र कायमखुष खरेदी कामी आमच्या अशिलास प्रस्ताव दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की विद्यमान मालक यांच्या मिळकत क्षेत्राबाबत कोणत्याही न्यायाधिकरणा समोर वाद चालु असल्यास अथवा कोणाही त्रयस्थ इसमासमवेत विद्यमान मालक यांनी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र नोंदणीकृत व निष्पादीत केले असल्यास आणि विद्यमान मालक यांच्या मिळकत क्षेत्राबाबत कोणत्याही न्यायाधिकरणाचा हस्तांतर करणेकामी तुर्तातुर्त अथवा निरंतर मनाई हुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्न वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर **संपुर्ण कायदेशीर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे,** जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल विद्यमान मालक यांच्या समवेत कायदेशीर रजिस्टर खरेदीखत दस्तांन्वये– विद्यमान मालक यांच्या अविभाज्य मालकी हक्काच्या मिळकत क्षेत्राचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील तद्नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णन** :- जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे **सावेडी** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| अ) | २६८ / २ब / १ | ०–३८ | १–३५ |

यापैकी विद्यमान मालक यांच्या सामाईकातील कायदेशीर अविभाज्य हिश्याची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या आणि वागणुकीच्या रस्त्यासह कोणतेही हक्क राखुन ठेविता असलेल्या संपूर्ण ० हे. २५.३३३३ आर मिळकतीबाबत.

यांसी चतु:सिमा – महसुल रेकॉर्डप्रमाणे

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| आ) | २६८/२क | ०–४८ | १–७१ |

यापैकी मा.महसुल प्रशासनाच्या ७/१२ दप्तरी असलेल्या संपूर्ण क्षेत्रापैकी विद्यमान मालक यांच्या सामाईकातील कायदेशीर अविभाज्य हिश्यात व प्रत्यक्ष कब्जे वहीवाटीच्या आणि वागणुकीच्या रस्त्यासह कोणतेही हक्क राखुन ठेविता असलेल्या संपूर्ण ० हे. ३२ आर मिळकतीबाबत.

यांसी चतु:सिमा – महसुल रेकॉर्डप्रमाणे

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| इ) | २६८/२ड | ०–४९ | १–७२ |

यापैकी विद्यमान मालक यांच्या सामाईकातील कायदेशीर अविभाज्य हिश्याची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या आणि वागणुकीच्या रस्त्यासह कोणतेही हक्क राखून ठेविता असलेल्या संपूर्ण ० हे. ३२.६६६७ आर मिळकतीबाबत.

यांसी चतु:सिमा – महसुल रेकॉर्डप्रमाणे

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ई) | २६८/२इ | ०–४९ | १–७२ |

यापैकी विद्यमान मालक यांच्या सामाईकातील कायदेशीर अविभाज्य हिश्याची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या आणि वागणुकीच्या रस्त्यासह कोणतेही हक्क राखुन ठेविता असलेल्या संपूर्ण ० हे. ३२.६६६७ आर मिळकतीबाबत.

यांसी चतु:सिमा – महसुल रेकॉर्डप्रमाणे

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| उ) | २७०/२/१अ/२७०/ १०/ब/२/२ | ०–५७ | २–७७ |

यापैकी विद्यमान मालक यांच्या सामाईकातील कायदेशीर अविभाज्य हिश्याची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या आणि वागणुकीच्या रस्त्यासह कोणतेही हक्क राखुन ठेविता असलेल्या संपूर्ण ० हे. ३२ आर मिळकतीबाबत.

यांसी चतु:सिमा – महसुल रेकॉर्डप्रमाणे

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ऊ) | २४०/१अ/३ | ०–३२ | १–३७ |

यापैकी विद्यमान मालक यांच्या सामाईकातील कायदेशीर अविभाज्य हिश्याची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या आणि वागणुकीच्या रस्त्यासह कोणतेही हक्क राखुन ठेविता असलेल्या संपूर्ण ० हे. २१.३३३३ आर मिळकतीबाबत.

यांसी चतु:सिमा – महसुल रेकॉर्डप्रमाणे

येणेप्रमाणे चतु: सिमापूर्वक शेतजमीन मिळकत यातील तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे हक्कांसह व सामाईक जाणे–येणेचा रस्ता हिस्सेनुरूप सामाईक हक्कासह काहीही एक राखून न ठेविता.

**मिळकतीचे विद्यमान मालक–**
**१.श्री. कन्हैयालाल लधाराम नवलाणी,**
**२. सौ. मधु अशोकलाल नवलाणी उर्फ माधुरी अशोक नवलाणी**
**३. श्री. राकेश कन्हैयालाल नवलाणी,**
**४. श्रीमती लविना सुरेशकुमार नवलाणी,**
**५. श्री. पियुष सुरेश नवलाणी ६. पलक सुरेश नवलाणी,**
रा. सिंधु मंगल कार्यालय जवळ, ३ नंबर बंगला, भुतकरवाडी, बालिकाश्रम रोड, अ. नगर,

दि. २३/०१/२०२५

**ॲड. संदिप दादासाहेब पाखरे**
**नोटरी पब्लिक, भारत सरकार**
६२७०, लॉयर्स ऑफिस, लक्ष्मी दिप निवास,
बालिकाश्रम जवळ, अहमदनगर
मो. नं. ९८५०१८१७१७



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकतीत आमचे अशिल १. भूषण भागचंद भिंगारदिवे २. भावना भागचंद भिंगारदिवे ३. शोभा भागचंद भिंगारदिवे, सर्व रा– माळीवाडा, ता. जि. अहमदनगर (अहिल्यानगर) सब डि.ता.नगरपैकी अहमदनगर (अहिल्यानगर) महानगरपालिका हद्दीतील, तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे माळीवाडा येथील सर्व्हे नं. ०९/२ मधील शेती मिळकत चे एकूण क्षेत्र ० हे ५२ आर ही संपूर्ण मिळकत (० हे ०३ आर पो.ख. सह) यासी चतु: सीमा–

पूर्व– नाला, दक्षिण– सर्व्हे नं. ०९/३,
पश्चिम– रस्ता, उत्तर– सर्व्हे नं. ०९/१.

येणेप्रमाणे चतु:सीमा पूर्वक शेत मिळकत यामधील तदंगभूत वस्तूसह वागणुकीचे हक्कास काही एक राखून न ठेवता नमूद केलेली मिळकत ही आमचे आशील यांची वडिलोपर्जित मालकी हक्क व वहिवाटीची असून सदर मिळकतीबाबत अहमदनगर येथील मे. दिवाणी न्यायाधीश, व स्तर यांचे कोर्टात रे.मु.नंबर ३४०/२०२२ हा मनाई हुकूम व वाटपासाठी दावा प्रलंबित आहे. सदर दावा प्रलंबित असतानाही सदर दाव्यामधील प्रतिवादी हे त्यांच्या नावाची ७/१२ च्या उतारा वरील पोकळीस्त आणि बेकायदेशीर असलेलेल्या नावाच्या आधारे सदर मिळकत ही कोर्टामध्ये वाद मालकी हक्क, वाटप, मनाई हुकूमसाठीं प्रलंबित असतानाही बेकायदेशीरपणे तिऱ्हाईत लोकांशी विक्री, साठेखत इ. व्यवहार करू पाहत आहे याची आमचे अशीलास खात्रीलायक माहिति मिळालेली आहे.

सदर व्यवहार हा पूर्णपणे बेकायदेशीर होणार असल्याने व कोणाशीही फसगत होऊ नये म्हणून सदर जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकती संबधी आमचे अशिलाचा मालकी, हक्क व आधिकार असल्याने इतर कोणीही काही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बोजा, तारण, लिन, लीज, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जमीन, जप्ती, करारनामा, कुळवारास, जनरलमुखत्यारपत्र, विसरपावती, साठेखत अगर इतर कोणताही कसलाहीकाहीही हक्क हितसंबंध सदर मिळकतीशी करू नयेत. अगर कोणीही केल्यास आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. इतर कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदर जाहीर नोटीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :– २३/०१/२०२५

**ॲड. अभिषेक विजय भगत**
**भगत ॲन्ड असोसिएट्स**
**ॲडव्होकेटस् नोटरी पब्लिक**
जगदंबा कोर्ट यार्ड, गोविंदपूरा नाका,
नविन जिल्हा न्यायालय शेजारी,
अ. नगर– ४१४००१, मो. ९४०५९१९९९९



## जाहिरातीस प्रतिउत्तर

आमचे अशिल नामे इम्रान अयाज शेख, रा. दक्षिण मुखी हनुमान मंदिर जवळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर (अहमदनगर) दि. १८/०१/२०२५ रोजी च्या दै. नवा मराठा या वर्तमानपत्रात हॉल विकणे आहे मोनालिसा हाईटस् कराचीवाला बेकरीसमोर सर्जेपुरा रोडटच पहिल्या मजल्यावरील १२०० स्के. फुट हॉल सर्व सोयी– सुविधांयुक्त हॉल योग्य किंमतीमध्ये विकणे आहे. मो. नं. ८९८३०३२३३९,९८२२५००९५६ अशी जाहिरात आमचे अशील यांच्या नुकतीच वाचण्यात आली आहे. वास्तविक पाहता सदर जाहिरातीमध्ये मिळकतीचे वर्णन हे पुर्णपणे चुकीचे व बेकायदेशीर नमुद करुन सदरची फ्लॅट मिळकत गैर मार्गाने विक्री करण्याचा प्रयत्न चालु आहे. सदर फ्लॅट मिळकतीबाबत आमचे अशिल यांनी यापुर्वी दि. ३१/०८/२०२४ रोजी ॲड. समीर वखारे यांच्या मार्फत दै. नवा मराठा या वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन सदर मिळकतीबाबत आमचे अशिल यांनी चालु असलेले वाद–विवादाची पुर्ण माहिती लोकांना दिलेली होती व आहे. आमचे अशिल यांनी दिलेल्या जाहिर प्रगटनास नदीम दाऊद शेख व आसमा नदीम शेख तसेच हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी यांनी ॲड. फारुक बी. शेख व ॲड. नुमेर एफ. शेख यांच्या मार्फत दि. ०३/०९/२०२४ रोजी जाहिर प्रगटनास उत्तर दिलेले असुन सदर जाहिर प्रगटनास उत्तर मध्ये मिळतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

डि. अहमदनगर सब डि. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे शहरनगर येथील सर्जेपुरा भागातील सि. स. नं. ६४४८/२ चे क्षेत्रफळ १६०.६० चौ. मी. यावर बांधलेले मोनालीस हाईटस् यापैकी फर्स्ट फ्लोअरवरील फ्लॅट नं. १ याचे बिल्टअप क्षेत्र १००.५५ चौ. मी. असे मिळकतीचे वर्णन नमुद केलेले आहे. यावरुन असे सिध्द होते की नदीम दाऊद शेख व आसमा नदीम शेख हे सदर विवादीत फ्लॅट मिळकतीची चुकीची व दिशाभुल करणारी जाहिरात दि. १८/०१/२०२५ रोजी च्या दै. नवा मराठा या वर्तमानपत्रात हॉल विकणे आहे. असे नमुद करुन लोकांची फसवणुक व दिशाभुल करुन सदर विवादीत फ्लॅट मिळकत विक्री करण्याचा गैर प्रयत्न करीत आहे. आमचे अशिल यांना यापुर्वी देखील खात्रीशीर माहिती मिळाली असल्यामुळे त्यांनी दि. ३१/०८/२०२४ रोजी सदर विवादीत मिळकत कोणीही खरेदी करु नये विवादीत मिळकत खरेदी घेणार यांना स्वच्छ व बाजारी टायटल प्राप्त होणार नाही व सदर विवादीत फ्लॅट मिळकत खरेदी घेणार यांना भविष्यात दिवाणी व फौजादारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. लोकांची अर्थिक फसवणुक होऊ नये म्हणुन जाहिर प्रगटन प्रसिध्द केले होते.

सदर हॉल विकणे आहे या जाहिरातीस आमचे अशिल यांची सक्त हरकत व तक्रार असुन सदर जाहिरातीस प्रतिउत्तर व्दारे तमाम लोकांस विशेषता: नदीम दाऊद शेख व आसमा नदीम शेख यांना कळविण्यात येते की. तसेच मिळकत खरेदी घेणार यांना स्वच्छ व बाजारी टायटल प्राप्त होणार नाही व मिळकत खरेदी घेणार यांची आर्थिक फसवणुक होईल याची नोंद घ्यावी

येणेप्रमाणे जाहिरातीस प्रतिउत्तर दिले आहे.
दि. २३/०१/२०२५

**ॲड. शेख नाजिम अहमद इस्माईल**
जी.पी.ओ. रोड, कलेक्टर ऑफिस जवळ, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७७०९७८६३१३



## जाहीर नोटीस

तमांम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेली मिळकत ही विद्यमान मालक नामे श्री. तुकाराम रामदास कोतकर, रा. सोनेवाडी रोड, केडगाव, ता. जि. अहिल्यानगर यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जात असलेली मिळकत त्यांनी आमच्या अशिलाबरोबर विक्री करण्या बाबतचा व्यवहार ठरविलेला आहे व त्याअनुशंगाने खरेदीखत करण्याचे ठरलेले आहे. विद्यमान मालकांनी मिळकत निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याचा विश्वास व भरोसा आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत अथवा गहाण, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकूम, वहिवाट, कुळ, बोजा, कर्ज अथवा इतर कोणचाही हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दहा दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी भेटुन खात्री पटवुन द्यावी मुदतीत कोणाचीही कोणतेही हरकत न आल्यांस आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील मग कोणाचीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे बुरूडगांव येथील सर्व्हे नं. १०६/२ मधील प्लॉट नं. ३ मधील विद्यमान मालकांचे मालकीचे संपुर्ण क्षेत्र ८८२.८९ चौ.मी. ही ओपन प्लॉट मिळकत.

**यांसी चतु:सीमा -**
पूर्वेस : प्लॉट नं. ४ दक्षिणेस : रोड,
पश्चिमेस : प्लॉट नं. २, उत्तरेस : सर्व्हे नं. १०६ पैकी

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत त्यामधील तदंगभुत वस्तु, वाग वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखून न ठेविता.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.
दिनांक :– २३/०१/२०२५
अहिल्यानगर.

**स्वप्नील आर. देवकर**
**ॲडव्होकेट अँड नोटरी पब्लिक**
शमी गणपती मंदिर मागे, दिल्लीगेट जवळ,
अहमदनगर. मो. ७५८८६९५८३०, ९४०५०३४५४०



## जाहीर नोटीस

दि. २३/०१/२०२५

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर व्यवहारापोटी आमचे आशिलांनी विद्यमान मालकांना विसार रक्कम दिलेली आहे. सदर शेतजमिन निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे, परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर शेतजमिनीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष, लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास, ज्यांचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत वर्णन** :- जिल्हा तुकडी व पोट तुकडी तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगाव येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

| गट क्र./स. नं. | आकार | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ४९०/१ | ० रु. ४० पै. | ० हे. ५५.६० आर |

यापैकी विद्यमान मालक यांच्या खरेदी मालकीची संपुर्ण ० हे ५४.६० आर क्षेत्र

**यांसी चतु:सीमा -**
पूर्वेस : बायपास रस्ता,
दक्षिणेस : लागु गट क्र. / स.नं. ४९०/२,
पश्चिमेस : शिव व गट क्र./स.नं. ४८८,
उत्तरेस : गट क्र./स.नं. ४९१ पैकी.

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक**
**१) श्री. गुरुदेव हरीदास वाघचौरे,**
रा. हरीपार्वती निवास, कपिलेश्वर नगर, सारसनगर, अहिल्यानगर.
**२) श्री. उध्दव रामभाऊ पवार,**
रा. भांड्याचे अमळनेर, ता. आष्टी, जि. बीड.
**३) श्री. जगन्नाथ एकनाथ बजाज,**
रा. १३११, वंजार गल्ली, गोविंद गॅरेज जवळ, अहिल्यानगर.

**ॲड. शामसुंदर व्हि. भुतडा**
ऑफिस : शॉप नं. ९, पुजा अपार्टमेंट
सहकार सभागृह रोड, अहमदनगर.
मो.नं. ९४२३७९२९२२


# राज्यातील शाळा, महाविद्यालयातून रेन गेन बॅटरीचा प्रचार–प्रसार करणार

नगर – ग्लोबल वॉर्मिंग आणि सर्वत्र असणारी पाणीटंचाई यावर मात करण्यासाठी एकात्मिक ज्ञान सिद्धांतून पुढे आलेल्या ग्लोबल रेन गेन बॅटरीचा उपयोग निर्णायक ठरणार आहे. याच्या प्रचार–प्रसारासाठी पीपल्स हेल्पलाईनच्या पुढाकाराने शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र घेण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

सध्याच्या राज्यकर्त्यांना ग्लोबल वार्मिंग आणि दुष्काळावर मात करण्यासाठी शेती आणि पाण्याचा प्रश्न सोडवण्याबाबत फारशी आस्था नाही. त्यामुळे सत्याग्रह किंवा मोर्चा काढून उपयोग होत नाही. महाविद्यालय आणि विद्यापीठातील विविध शाखांमधील विद्यार्थ्यांच्या ज्ञान व व्हिजनचा उपयोग करुन ग्लोबल वॉर्मिंग आणि पाणीटंचाई याबाबतचा प्रश्न सोडवता येणार आहे. यासाठी रेने गेन बॅटरीवर नक्कीच शिक्कामोर्तब होऊ शकणार असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

आजपर्यंत सरकारने जलसंधारणासाठी प्रयत्न केला, परंतु त्यामध्ये भूपृष्ठावर पावसाचे पाणी साठविले जाते. त्यातून काही पाणी जमिनीत मुरते, मात्र बरेचसे पावसाचे पाणी वाहून जाते किंवा बाष्पीभवनातून नष्ट होते. एकंदरीत पडणाऱ्या पावसापैकी ७० टक्के पावसाचे पाणी वाया जात असल्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग व पाणीटंचाईचा प्रश्न खऱ्या अर्थाने सुटू शकला नाही. पावसाचे पडणारे पाणी तातडीने जमिनीखाली नेल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे प्रत्येक दोन एकर जमिनीमध्ये उताऱ्याच्या बाजूला २० फूट लांब व ५ फूट रुंद व ८ फूट खोलीचे खड्डे खोदून त्यामध्ये दगड गोटे भरून वरच्या बाजूला खडक मुरूम भरला जातो. अशा रेन गेन बॅटरीच्या माध्यमातून पावसाचे वाहून येणारे पाणी त्यामध्ये सोडले जाते. गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे पावसाचे ८० टक्के पाणी जमिनीमध्ये खालच्या बाजूला जाते आणि नंतर जमिनीखालच्या सर्व मुरुमामामध्ये हे पाणी पसरत सर्वत्र जमिनीखाली ओल तयार होते. या तंत्रामुळे जमिनीखाली सर्वत्र फळझाडे आणि पिकांच्या मुळांना सातत्याने वर्षभर ओल उपलब्ध होते. जमिनीखाली जमा झालेल्या पाणी साठ्यामध्ये शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी पाणी सहज उपलब्ध होऊ शकेल. या तंत्रामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना देखील मोठा फायदा होणार आहे. जमिनीवर पडणारे पाणी त्यांच्याच जमिनीखाली वर्षभर साठवले गेल्याने पिकांसाठी ओल कायम राहणार आहे. त्यामुळे पावसाने ओढ दिली, तरी फळबागांचे किंवा पिकांचे नुकसान होणार नसल्याचे म्हटले आहे.

महाविद्यालय आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून रेन गेन बॅटरी संदर्भात प्रचार–प्रसार संघटनेने सुरू केला आहे. शहरी भागात सगळीकडे सिमेंटची जंगले आहेत. डांबर किंवा सिमेंटचे रस्त्याच्या कडेला फरश्या बसविल्या जातात. त्यामुळे पाऊस पडल्यानंतर काही एक पाणी जमिनीत मुरत नाही. रस्त्याकडील झाडे पाण्याअभावी मरून जातात. त्यामुळे शहरी भागात प्रत्येक रस्त्याच्या कडेला तीन बाय तीन फुटाची रेन गेन बॅटरी तयार करण्याचा प्रस्ताव संघटनेने मांडला आहे. यामुळे पावसाळ्यात रस्त्यावरून वाहणारे पाणी रेन गेन बॅटरीत सोडले जाऊ शकणार आहे. त्यामुळे रस्त्याच्या कडेला झाडांना वर्षभर ओलावा टिकून राहिल आणि झाडे देखील जगणार असल्याचे ॲड. गवळी यांनी म्हटले.


# मार्केटयार्ड परिसरातून तरुण बेपत्ता; गुन्हा दाखल

नगर – महात्मा फुले चौकातून चक्कर मारुन येतो, असे सांगुन घराबाहेर गेलेला २५ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची घटना २० जानेवारीला रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास घडली. इर्शाद मुजाहीद सय्यद (वय.२५, रा.वेअर हाऊस गोडाऊन समोर, भवानीनगर, मार्केटयार्ड) असे या तरुणाचे नाव आहे. इर्शाद हा प्लम्बिंगचे काम करणारा तरुण रात्रीच्या वेळी महात्मा फुले चौकातून फिरुन येतो, असे सांगून घराबाहेर गेला. त्याच्या घरच्यांनी इर्शाद याची घरी येण्याची खुप वेळ वाट पाहिली. परंतु खुप वेळ झाला तरी तो घरी न आल्याने त्याच्या वडिलांनी त्यास फोन केला असता त्याचा फोन बंद लागल्याने त्याच्या घराच्यांनी त्याचा नगर शहरात व परिसरात शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. त्यामुळे त्याचे वडील मुजाहीद मुस्तफा सय्यद यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी हरवल्याची नोंद केली आहे.

Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL, UNLEASHING BRILLIANCE.
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon, Ahilyanagar 414006
नर्सरी ते दहावी पर्यंत
दर्जेदार शिक्षण प्रणाली
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल
अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387



वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
स्वत:बद्दल दृढ आत्मविश्वास
कार्याचा अविरत ध्यास
वाढदिवसाचा आपल्या
अभिमान आम्हास...
आपणास दीर्घायुष्य लाभो..
हीच प्रार्थना आमच्या मनी...!
मा. संदीपदादा कोतकर
(मा. महापौर) म.न.पा. अहिल्यानगर
शुभेच्छुक
भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, केडगाव (देवी)
मा. श्री. भानुदास एकनाथ कोतकर साहेब
संस्थापक
मा. सौ. सुरेखाताई भानुदास कोतकर — अध्यक्षा
मा. श्री. सचिन (आबा) भानुदास कोतकर — सचिव
मा. श्री. बन्सी सावळेराम नरवडे — मुख्याध्यापक
श्री रेणुकामाता प्राथमिक विद्यालय, केडगाव
सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद, केडगाव, ता. जि. अहिल्यानगर



वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
राजकारणा पलिकडचं व्यक्तिमत्व!
आपले दादा
मा.श्री. संदीप दादा कोतकर
हिऱ्याप्रमाणे चमकत राहावं
आपल्या कर्तृत्वाची ख्याती...
स्नेह जिव्हाळ्याने वृद्धिंगत व्हावी
मनामनाची नाती...!
आपणास दीर्घायुष्य लाभो..
हीच प्रार्थना मनोमनी...!
मा. संदीपदादा कोतकर
(मा. महापौर) म.न.पा. अहिल्यानगर
शुभेच्छुक
भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, केडगाव (देवी)
मा. श्री. भानुदास एकनाथ कोतकर साहेब
संस्थापक
मा. सौ. सुरेखाताई भानुदास कोतकर — अध्यक्षा
मा. श्री. सचिन (आबा) भानुदास कोतकर — सचिव
मा. श्री. हबीब चाँदभाई शेख — मुख्याध्यापक
भाग्योदय विद्यालय, भोयरे पठार
सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद, भोयरे पठार, ता. जि. अहिल्यानगर





आशादायी नेतृत्व..
"उगवता सुर्य तुम्हाला आशीर्वाद देवो,
बहरलेली फुले तुम्हाला सुगंध देवो,
आणि
परमेश्वर आपणांस सदैव सुखात ठेवो.
वाढदिवसाच्या
मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा.!"
माजी महापौर, म.न.पा, अ.नगर.
मा. संदिप (दादा)
भानुदास कोतकर
उदंड आयुष्य लाभावे आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
|| श्री स्वामी समर्थ ||
PROPERTY & DEVELOPERS
लिंक रोड, भूषणनगर, केडगांव, ता.जि. अ.नगर
मो. 702 013 0334 / ई-मेल : dipkale222@gmail.com

सर्व प्रकारचे लेदर
लेदर बेल्ट, वॉलेट, इनसोल, बुटांचे सोल, पॉलिश, शायनर, ब्रश, लेस, बक्कल, चैनचे रनर, रबर सुलोशन (Adhesive), या वस्तूंच्या ठोक व किरकोळ विक्रीचे एकमेव दुकान.
मे.जी.के. कवडे
पारशा खुंट, जुना कापड बाजार रोड, अहिल्यानगर.
9271609379
8378992511

कॅन्सर एड्स फूड सप्लिमेंट
* कॅन्सर एड्स
* वजन वाढणे
* जेवण जावे
* चालताना, उठताना होणारा त्रास
* एड्स CD4 वाढवा
* व्हायरल लोड कमी करा
7507718246



वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
आयुष्याच्या या पायरीवर
तुमच्या नव्या जगातील
नव्या स्वप्नांना बहर येऊ दे!
तुमच्या इच्छा, आकांक्षांना
उंच उंच भरारी घेऊ दे!
मनात आमच्या एकच इच्छा
आपणांस उदंड आयुष्य लाभू द्या..
मा. संदीपदादा कोतकर
(मा. महापौर) म.न.पा. अहिल्यानगर
शुभेच्छुक
भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, केडगाव (देवी)
मा. श्री. भानुदास एकनाथ कोतकर साहेब
संस्थापक
मा. सौ. सुरेखाताई भानुदास कोतकर — अध्यक्षा
मा. श्री. सचिन (आबा) भानुदास कोतकर — सचिव
मा. श्री. ज्ञानदेव अंबादास बेरड — प्राचार्य
भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय, केडगाव (देवी)
सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद, केडगाव (देवी), ता. जि. अहिल्यानगर



वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
आपल्या सद्कार्याचे
तेज चोहिकडे पसरावे
उत्तमोत्तम कार्यातून
क्षण प्रगतीचे जोपासावे...
मा. संदीपदादा कोतकर
(मा. महापौर) म.न.पा. अहिल्यानगर
आपणास दीर्घायुष्य लाभो..
हीच प्रार्थना सर्वांच्या मनी...!
शुभेच्छुक
भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, केडगाव (देवी)
मा. श्री. भानुदास एकनाथ कोतकर साहेब
संस्थापक
मा. सौ. सुरेखाताई भानुदास कोतकर — अध्यक्षा
मा. श्री. सचिन (आबा) भानुदास कोतकर — सचिव
मा. श्री. जयसिंग शंकर दरेकर — मुख्याध्यापक
जगदंबा विद्यालय, केडगाव
सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद, केडगाव, ता. जि. अहिल्यानगर

## भाड्याने देणे आहे

प्राईम लोकेशनमधील पॉश
3 BHK व 4 BHK बंगलोज व
तसेच नवीन 2 BHK व 3 BHK
नवीन लक्झरिअस फ्लॅटस भाड्याने देणे आहे.
कंपनी गेस्ट हाऊस, क्लास-१ अधिकारी फॅमिली,
बँक अधिकारी फॅमिलीसाठी प्राधान्य.
प्रेमदान चौक, गुलमोहररोड, पाईपलाईन रोड, सावेडी,अ.नगर
9119922177 / 7796099890

## जिम विकणे आहे

8999956401

## बाई/मुलगी पाहिजे

मुंबई येथे घरकामासाठी
वय १८ ते ५० वयाची
बाई/मुलगी पाहिजे
8888576576

## कामासाठी पार्टटाईम मुले पाहिजेत

9552445100

## पाहिजेत

अकौंटींग
+
सेल्ससाठी
मुलगा किंवा मुलगी पाहिजे
(शिक्षण-बी.कॉम आवश्यक)
हुशार, उत्तम संभाषण कौशल्य आवश्यक
7038477393

## सेल्समन पाहिजेत जागा - ३

नुतनीकरण झालेल्या किड्सवेअर दालनासाठी
अर्जासह समक्ष भेटा, भेटण्याची वेळ : दुपारी २ ते ४
खुशबू बेबी स्टोअर झोपडी कॅन्टीन, सावेडी रोड, अहिल्यानगर
संपर्क : 8888181781

## पाहिजेत

एम.आय.डी.सी मधील एका नामांकित औषधाच्या सि. अँड एफ. (डेपो) साठी खालील जागा भरणे आहे.
* कॉम्प्युटर ऑपरेटर : जागा - २
* औषधे पॅकिंगकरिता मुले : जागा - २
संपर्क : अॅबट पेट्रोलपंप | फ्रेंड सर्व्हिस स्टेशन, पेट्रोलपंप, कोठला रोड, अहमदनगर


कारखानदार, उद्योजक आणि
आय एस ओ कंसल्टंट्स यांच्यासाठी
अहिल्यानगरमध्ये सुरु झाले आहे,
**डी के कंसल्टंट्स**
**चार्टड इंजिनियर**
आम्ही देत आहोत, क्रेन आणि
होइस्ट टेस्टिंग आणि सर्टिफिकेशन,
प्रेशर व्हेसल, रिॲक्टर्स टेस्टिंग
आणि सर्टिफिकेशन अल्ट्रा
थिकनेस टेस्टिंग, बॉयलर ऑपरेशन
आणि मेन्टेनन्ससाठी सेवा
**डी के कंसल्टंट्स**
गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर
9423750387

## डेली कलेक्शन करा आणि लोन मिळवा

₹10,000/- ते
₹1,00,000/-
8983184399
ऑफिसबॉय पाहिजे

## शेड किंवा हॉल पाहिजे

5 ते 10 हजार स्के. फुट
मंगलकार्यालय सुद्धा चालेल
9822254190



## डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

**अक्षय (गिते) हॉस्पिटल**
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
**एशियन नोबल हॉस्पिटल** प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

## पाहिजेत

**फार्मासिस्ट पाहिजेत**
मेडीकल कामासाठी
फार्मासिस्ट पाहिजेत
( फुलटाईम )
नेप्ती रोड, केडगाव, अ.नगर
9763767767

## अर्जन्ट विकणे

पाथर्डी रोड, करंजी
पासुन पुढे ३ कि.मी.
रोडटच २ मजली
इमारतसह ४ गुंठे
जागा हॉटेल किंवा
हॉस्पिटलसाठी उपयुक्त
9373499168

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मी माझे नाव ओमकार प्रकाश सुगंधी, रा. वंदे मातरम पार्क, शिवाजी नगर, नगर-कल्याण रोड, अहिल्यानगर माझे मालकीची मौजे नालेगाव येथील सर्व्हे नं. २३५/२अ मधील प्लॉट नं. २४/२ याचे क्षेत्रफळ १०७.०८ चौ. मी. या मिळकतीचे मुळ खरेदीखत दस्त क्र. ४३११/२०१४ दिनांक २०/१०/२०१४ रोजीचे खरेदीखताचा मुळ दस्त, इंडेक्स II व नोंदणी पावती आणि खरेदीखता सोबतची इतर कागदपत्रे असा २५ पानांचा दस्त जुना बाजार, पंचपीर चावडी, जुनी महानगरपालिका रस्ता या भागात दिनांक १५/०१/२०२५ रोजी माझ्याकडुन गहाळ झालेला आहे. सदर खरेदीखताचा मुळ दस्त, इंडेक्स II, नोंदणी पावती व इतर कागदे कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणुन द्यावे अथवा खाली दिलेल्या फोन नंबरवर संपर्क साधावा ही नम्र विनंती. सदर खरेदीखत आणुन देणाऱ्यास योग्य ते बक्षीस दिले जाईल.

अहिल्यानगर
दिनांक :- २३/०१/२०२५

ओमकार प्रकाश सुगंधी
रा. वंदे मातरम पार्क, शिवाजी नगर,
नगर-कल्याण रोड, अहिल्यानगर मो.क्र. ९९७५६३६४०१

## बंगला भाड्याणे देणे आहे

आगरकर मळ्यातील
ग्राउंड फ्लोअर 2 BHK व
वरच्या मजल्यावर 2 BHK
बंगला भाड्याणे देणे आहे
संपर्क
77760 21515




2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स

**DCGA**
Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-

MS-OFFICE | TALLY PRIME
GST | CORELDRAW
ILLUSTRATOR | PHOTOSHOP
WEB PAGE DESIGNING
BASIC HARDWARE
Duration : 6 Months

Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769

Old ST stand Branch
1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar
9371151769


Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

## क्लिनिकसाठी डॉक्टर पाहिजे

(सर्व सुविधायुक्त सेटअप)
नेप्ती रोड, केडगाव येथे
9763767767

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater

SHOW TIMING - 20 JAN - 23 JAN 2025



गेम चेंजर 10.15AM
आझाद 09.10AM | 12.15PM 04.15PM
इमर्जन्सी 09.30 AM | 04.30PM 07.15PM | 10.00PM
पुष्पा - 2 The Rule Reloaded 12.10PM | 8.00PM
ये जवानी है दिवानी 07.00PM
सत्या 01.15PM | 10.00PM
मुफासा (3D) Hindi 05.30PM
फतेह 03.00PM

टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar.
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX

## प्लॉट विकणे

हॉटेल सिटीप्राईडजवळ
एकविरा चौक येथे
प्राईम लोकेशनमध्ये
१४२० स्के. फुट
पुर्वमुखी प्लॉट विकणे आहे.
9834637850

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात | दिनांक : 16 जानेवारी ते 23 जानेवारी 2025

Monday To Thursday
Rs.99/-* Only
Offer valid till 23 Jan 2025



SANGEET MANAPMAA 0305P M
Y J Y D 0815 A M | 04:45 PM
JILBI 05:00 PM
GAME CHANGER 08:30 AM | 12:00 06:10 PM
PUSHPA-2 08:00 PM 09:15 PM
EMERGENCY 11:15 AM | 02:00 PM 07:45 PM | 10:30 PM
AZAAD 11:30 AM | 02:15 PM 07:15 PM | 10:00 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow | CONNPLEX SMART THEATRE | AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001



**सौ.आशाताई निंबाळकर**
यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या
महिला **जिल्हा अध्यक्षपदी**
निवड झाल्याबद्दल
**हार्दिक अभिनंदन** व पुढील
वाटचालीस **हार्दिक शुभेच्छा...!**

**श्रीराम लॅण्ड ॲण्ड डेव्हलपर्स मित्र परिवार**



तुमच्या वाढदिवसाचे हे,
सुखदायी क्षण तुम्हाला सदैव आनंददायी ठेवत राहो,
आणि या दिवसाच्या अनमोल आठवणी
तुमच्या हृदयात सतत तेवत राहो. हीच मनस्वी शुभकामना.

कार्यसम्राट माजी महापौर

# मा.संदिप (दादा) भानुदास कोतकर

आपणास
**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**

* शुभेच्छुक *

**गणेश सातपुते | कुमार होळकर**
**कुलदिप भिंगारदिवे**